# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ३० मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







# डावे अन् काँग्रेसमुळे राज्ये उद्ध्वस्त!

## केरळमध्ये प्रचार प्रारंभ; भाजपच सत्तेत येणार असल्याचा विश्वास

**पलक्कड (केरळ)/ वृत्तसंस्था-**; वृत्तसंस्था : काँग्रेस



आणि डावे जिथे सत्तेत असतात तिथे राज्ये उद्ध्वस्त करतात, अशी घणाघाती टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी रविवारी केरळमध्ये पलक्कड येथे सभा घेतली. यावेळी ते बोलत होते. मोदींनी त्रिशूर येथे रोड शोदेखील केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, केरळमध्ये सध्या बदलाची लाट आहे. राज्यातील तरुण वर्ग एनडीए आणि विशेषतः भाजपच्या धोरणांकडे आकर्षित होत आहे. या वेळेस केरळमध्ये वेगळेच वातावरण आहे. बदलाचा संदेश स्पष्टपणे दिसत आहे. हा बदल केवळ राजकीय नाही, तर जनतेच्या आशा-अपेक्षांचा परिणाम आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमामुळे आणि जनतेच्या पाठिंब्यामुळे हा बदल शक्य होत आहे.

दरम्यान, राजकीय हिंसाचारात प्राण गमावलेल्या कार्यकर्त्यांना मोदींनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी केरळमधील प्रमुख आघाड्यांवर म्हणजेच लेफ्ट डेमोक्रेटिक फ्रंट (एलडीएफ) आणि युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ) यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, या दोन्ही आघाड्यांनी (पान २ वर)

# कोल्हापूरची अमृता पुजारी डबल महाराष्ट्र केसरी

## वेदिका सासणेला दाखवले अस्मान

**सोलापूर/वृत्तसंस्था-** सोलापुरात झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेत चित्तथरारक अंतिम लढतील कोल्हापूरच्या अमृता पुजारीने वेदिका सासनेला आस्मान दाखवत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवला. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि निर्जरा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर रविवारी (दि. २९) रात्री महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेची अंतिम लढत अमृता पुजारी विरुद्ध वेदिका सासणे यांच्यात झाली.

सुरुवातीपासून अमृताने आक्रमक चाल खेळत वेदिकाला कब्जात ठेवले. पहिल्या दीड मिनिटात २ गुण मिळवत आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा तीन गुण मिळवून पहिल्या सत्रात ५-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात वेदिकाने आक्रमक चाल खेळली परंतु

### महिलाकुस्ती स्पर्धेसाठी ५० लाख रुपये देण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांना देणार : पालकमंत्री गोरे

अमृताने संयम दाखवत पुन्हा २ गुण घेतले आणि विजय पक्का केला. शेवटचे २ मिनिटे अमृताने बचाव करत वेदिकाला थोपवून ठेवले. ७-० या फरकाने अमृताने वेदिकाचा पराभव करत डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विजेत्या अमृता पुजारी हिला चांदीची गदा, रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व किया सोनेट कारची चावी प्रदान करण्यात आली. उपविजेत्या वेदिका सासनेला २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि बुलेट बक्षीस देण्यात आली.

दरम्यान, अमृता पुजारीने वेदिका सासनेवर मात केल्यानंतर समर्थक महिला कुस्तीपटूंनी अमृता पुजारी आणि प्रशिक्षक दादासो लवटे यांना खांद्यावर घेऊन कुस्तीच्या मैदानामधून हलगीच्या कडकडाटात मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला. फटाक्यांची मोठी आतषबाजी करण्यात आली.

यावेळी महापौर विनायक कोंड्याल, हिंद केसरी योगेश दोडके, आयोजक स्वाती अळळीमोरे साखरे, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जन्मेनजयराजे विजयसिंहराजे भोसले, ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फड, महाराष्ट्र केसरी मुन्नालाल शेख, समाधान



घोडके, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले, मौला शेख, उमेश सूळ, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, स्थायी (पान २ वर)


# आसाममध्ये UCC लागू करणार, चार विवाहांवर बंदी घालणार; अमित शाहांची मोठी घोषणा

**नलबारी/वृत्तसंस्था-** आसाम विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नलबारी येथील सभेत मोठी घोषणा केली. भाजप सरकार आसाममध्ये समान नागरी संहितालागू करणार असून, चार विवाहांवर बंदी घालणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील घुसखोरांना देशाबाहेर पाठवण्याचेही आश्वासन त्यांनी दिले.

नलबारी येथे आयोजित सभेत बोलताना अमित शाह यांनी सांगितले की, आसाममध्ये भाजप सरकार पुन्हा सत्तेत आल्यास राज्यात समान नागरी संहिता लागू केली जाईल आणि चार विवाहांवर बंदी घालण्यात येईल. त्यांनी काँग्रेसवर आरोप करताना म्हटले की, मतांसाठी काँग्रेसने आसामचे लोकसंख्यात्मक स्वरूप बदलले आणि घुसखोरीला प्रोत्साहन दिले.

### घुसखोरांविरोधात कारवाईचा इशारा

अमित शाह यांनी सांगितले की, पुढील पाच वर्षांत प्रत्येक



घुसखोराची ओळख पटवून त्यांना देशाबाहेर पाठवले जाईल. त्यांनी दावा केला की, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली सरकारने सीमारेषा मजबूत केल्या असून, घुसखोरांनी बळकावलेली सुमारे १.२५ लाख एकर जमीन परत मिळवली आहे.

### आसाममध्ये शांतता प्रस्थापित केल्याचा दावा

शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आसाममध्ये शांतता प्रस्थापित केल्याचा दावा केला. ते म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत बोडो शांतता करार, कार्बी आंगलोंग करार, DNLA करार आणि ULFA संघटनेसोबत करार करण्यात (पान २ वर)

# लग्न आटोपून परतणाऱ्या वऱ्हाड्यांच्या गाडीला भीषण अपघात; ५ ठार, ११ जण जखमी

**गडचिरोली /वृत्तसंस्था-:** लग्न आटोपून वऱ्हाड्यांना परत घेऊन जाणारी स्कार्पिओ आणि ट्रॅव्हल्स यांच्यात झालेल्या भीषण अपघातात ५ जण ठार, तर ११ जण जखमी झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. ही घटना रविवारी (दि.२९) संध्याकाळी पावणेसातच्या सुमारास चामोर्शी-गडचिरोली मार्गावरील कुरुड-कढोली गावादरम्यानच्या नाल्याजवळील वळणावर घडली. जखमींना गडचिरोली येथील जिल्हा सामान्य



रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

स्कार्पिओ क्रमांक (एमएच ४६-पी ५३९२) ही १६ वऱ्हाडी घेऊन रामपूर येथून दुपारी ३ च्या सुमारास लग्न सोहळा आटोपून भाडभिडी (मोकासा) येथे जात होती. दरम्यान, गडचिरोलीकडून चामोर्शीकडे जाणाऱ्या (एमएच १५ सीके ५००५) या ट्रॅव्हल्सची स्कार्पिओला जोरदार धडक बसली. या ट्रॅव्हल्सवर त्रिवेणी अर्थमूव्हर्स असे लिहिले होते. या अपघातात स्कार्पिओचे प्रचंड नुकसान झाले. अपघातानंतर जखमींना चामोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार केल्यानंतर गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. उपचारासाठी नेताना वाटेत दोघांचा मृतयू झाला. उर्वरित जखमींवर उपचार सुरु असून, काही जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. अपघात एवढा भीषण होता की,स्कार्पिओच्या पुढच्या भागाचा चक्काचूर झाला होता.काही प्रवासी वाहनातच अडकून पडले होते. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेऊन मदत कार्य सुरु केले.

दरम्यान, या भीषण अपघाताशी लॉयड्स मेटल्स किंवा त्रिवेणी अर्थमूव्हर्स कंपनीशी कोणताही संबंध नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. ही बस त्रिवेणी (पान २ वर)

# शूटिंगवेळी समुद्रात बुडून प्रसिद्ध अभिनेत्याचं निधन

**ओडिशा /वृत्तसंस्था-** बंगालमधील प्रसिद्ध अभिनेता राहुल अरुणोदय बॅनर्जी याचं आकस्मिक निधन झालं आहे. तो ४३ वर्षांचा होता. शूटिंगदरम्यान, झालेल्या दुर्घटनेत राहुल अरुणोदय बॅनर्जी याचं निधन झाल्याच सांगण्यात येत आहे. त्याच्या निधनामुळे मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार राहुल अरुणोदय बॅनर्जी ओदिशामधील तालसरी येथे शूटिंग करत होता. त्यावेळी तो समुद्रात उतरला. तसेच अचानक पाण्यात बुडाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या तंत्रज्ञांनी त्याला बाहेर काढले आणि त्वरित रुग्णालयात नेले. मात्र त्याचे प्राण वाचू शकले नाही.

राहुल अरुणोदय बॅनर्जी हा भोले बाबा पार करेगा नावाच्या मालिकेचं चित्रिकरण करत होता. याच मालिकेच्या चित्रिकरणासाठी तो दीघा (पान २ वर)

# बंगालमध्ये काँग्रेस स्वबळावर लढणार- भाजपा, ममतांना आव्हान देणार, २८४ जागांवर दिले उमेदवार

**कोलकाता/वृत्तसंस्था-** संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार हे आता स्पष्ट झाले आहे. काँग्रेसने बंगालमधील विधानसभेच्या २९४ पैकी २८४ जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे. तसेच काँग्रेस पक्ष बंगालमध्ये एकाचवेळी भाजपा आणि ममता बॅनर्जी यांना आव्हान देणार आहे. आज जाहीर केलेल्या उमेदवार यादीमधून काँग्रेसने आपल्या मुर्शिदाबाद आणि मालदा या पारंपरिक बालेकिल्ल्यांवर विशेष लक्ष केंद्रित केलं आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा




निवडणुकीसाठी काँग्रेसने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी प्रदेशाध्यक्ष अधीररंजन चौधरी यांना त्यांच्या पारंपरिक बहरामपूर मतदारसंघामधून उमेदवारी दिली आहे. तर हल्लीच तृणमूल काँग्रेसमधून काँग्रेसमध्ये आलेल्या मौसम नूर यांना मालतीपूर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने भवानीपूर विधानसभा मतदारसंघामधून मुख्यमंत्री ममता बॅनर्जीविरोधात प्रदीप प्रसाद यांना उमेदवारी दिली आहे. येथे भाजपाने शुभेंदू अधिकारी यांना रिंगणात उतरवले आहे. त्याशिवाय काँग्रेसने हेमताबाद येथून अनामिका राय यांना, तर जंगीपूर येथून मोहम्मद इमरान अली यांना उमेदवारी दिली आहे. तर तुफानगंज येथून देबेंद्रनाथ यांना आणि दिनहाटा येथून हरिहर राय यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने पश्चिम बंगालमधील उमेदवारांची निवड (पान २ वर)






# अमेरिकेचं 'उडतं रडार' इराणने पाडलं? सौदीतील एअरबेसवर महाकाय AWACS विमान उद्ध्वस्त केल्याचा दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्यपूर्वेतील युद्ध आता अत्यंत स्फोटक वळणावर पोहोचले आहे. इराणने रविवारी (२९ मार्च २०२६) एक खळबळजनक दावा करत अमेरिकेला मोठा धक्का दिला आहे. सौदी अरेबियातील 'प्रिन्स सुलतान एअर बेस'वर तैनात असलेले अमेरिकेचे अत्याधुनिक विमान मार पाडल्याचे इराणने म्हटले आहे. या विमानाला 'आकाशातील उडतं रडार' मानले जाते, जे शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाचे शस्त्र आहे. इराणची सरकारी वृत्तसंस्था ने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर काही फोटो शेअर केले आहेत. यामध्ये हे विमान पाडण्यापूर्वीचे आणि पाडल्यानंतरचे दृश्य दाखवण्यात



आले आहे. एका फोटोत विमानाचा मागचा भाग पूर्णपणे तुटलेला दिसत आहे. इराणने या फोटोंद्वारे अमेरिकेच्या एअर डिफेन्स सिस्टमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'अमेरिकन यंत्रणा त्यांच्या सर्वात महत्त्वाच्या लष्करी संसाधनांचे संरक्षण करण्यासही सक्षम नाहीत, हे या फोटोंवरून स्पष्ट होते,' असे इराणने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. विशेष म्हणजे, हा दावा करण्याच्या एक दिवस आधीच, (पान २ वर)

# इराणची चार क्षेपणास्त्र निर्मिती केंद्रे उद्ध्वस्त

**तेहरान; वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इस्त्रायलने गेल्या चार आठवड्यांत केलेल्या तीव्र हवाई हल्ल्यांमुळे इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. वॉशिंग्टन पोस्टने उपग्रहाद्वारे



मिळालेल्या छायाचित्रांच्या आधारे केलेल्या विश्लेषणानुसार, इराणमधील क्षेपणास्त्र उत्पादनाशी संबंधित ४ प्रमुख केंद्रे आणि किमान २९ प्रक्षेपण स्थळांना लक्ष्य करण्यात आले आहे.






# पाकचे माजी लष्करप्रमुख कमर बाजवा यांचे निधन

## बाथरूममध्ये घसरून पडल्याने झालेले जखमी

**इस्लामाबाद; वृत्तसंस्था :** पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. फेब्रुवारी महिन्यात घरी बाथरूममध्ये घसरून पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्यांच्यावर रावळपिंडी येथील लष्करी रुग्णालयात उपचार सुरू होते आणि ते अतिदक्षता विभागात (आयसीयू) होते.



डॉक्टरांनी त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली होती; मात्र त्यांची प्रकृती गंभीरच (पान २ वर)

# होर्मुझ पार केले...; ९४ हजार मेट्रिक टन LPG घेऊन दोन जहाजे भारताकडे रवाना

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धामुळे जागतिक ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. इराणच्या ताब्यात असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेलवाहू जहाजांच्या वाहतूकीवरही मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र, अशा तणावाच्या परिस्थितीत भारतासाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. सुमारे ९४,००० मेट्रिक टन एलपीजी



घेऊन दोन जहाजे सुरक्षितपणे होर्मुझ पार करून भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, BW TYR आणि BW ELM, ही दोन एलपीजी जहाजे सुरक्षितपणे होर्मुझ सामुद्रधुनी पार करून भारताकडे येत आहेत. BW TYR जहाज ३१ मार्च रोजी मुंबईत पोहोचण्याची अपेक्षा आहे, तर BW ELM जहाज १ एप्रिल रोजी न्यू मंगळूरू येथे पोहोचण्याची अपेक्षा आहे. या जहाजांमुळे भारतातील एलपीजी पुरवठ्यावर होणारा संभाव्य परिणाम (पान २ वर)

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आमसभेत ९३५ कोटी २० लक्ष रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकाला मंजूरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील द्वितीय क्रमांकाच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या आमसभेत वर्ष २०२६-२०२७ करिता ९३५ कोटी २० लक्ष रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकाला मंजुरात देण्यात आली. येत्या वर्षाच्या अंदाजपत्रकात संस्थेच्या शाळा आणि महाविद्यालयांच्या विकासावर व सक्षमीकरणावर अधिक भर देण्यात आला आहे. यामध्ये भौतिक विकासासोबतच डीजीटलायझन सारख्या सुविधांचा समावेश आहे. नव्या वर्षात गडचिरोली जिल्ह्यातील एक अनुदानित महाविद्यालय संस्थेला हस्तांतरित होत असून तसा हस्तांतरण प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.






श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी सन २०२५-२०२६च्या कार्याचा लेखाजोखा सादर करण्यासोबतच नवीन आर्थिक वर्षाचे ९३५ कोटी २० लक्ष रुपयाचे अंदाजपत्रक सादर केले.सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी या अंदाजपत्रकाला एकमुखाने मंजुरात दिली.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने मान्यता दिल्याबद्धल सभेत आनंद व्यक्त करण्यात आला.

तसेच यापूर्वी संस्थेचे कोणतेही शाळा – महाविद्यालय नसलेल्या गडचिरोली जिल्ह्यात वडसा देसाईगंज येथील मोहसीनभाई जव्हेरी हे अनुदानित महाविद्यालय नव्याने संस्थेस हस्तांतरणाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे सादर केल्याने आता गडचिरोली जिल्ह्यातही संस्थेचे महाविद्यालय असणार असल्याने सभेत आनंद व्यक्त करण्यात आला.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या ५० जागा वाढवून दोनशे करण्याचा आणि पदव्युत्तरच्या जागा वाढविण्याचा प्रस्ताव संस्थेतर्फे सादर करण्यात आला असून लवकरच या प्रस्तावाला मान्यता मिळेल,असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त केला.सन २०२२ मध्ये झालेल्या कृषी प्रदर्शनीच्या धर्तीवर डिसेंबर २०२६ मध्ये भव्य कृषी प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आणि उपस्थित सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. सभेत संस्थेच्या या वर्षातील दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आमसभेला संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे,सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.अमोल महल्ले, ठोकळ सर, आणि आजीवन सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वस्तीगृहात अनधिकृत प्रवेश, विद्यार्थिनींचे काढले फोटो

### -विरोध केल्यावर धमकी - गाडगेनगर पोलिसांत गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगेनगर परिसरात असलेल्या एका वस्तीगृहात घडलेल्या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे. वस्तीगृहात अनधिकृतपणे प्रवेश करून विद्यार्थिनींचे फोटो काढल्याचा आणि धमकी दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ मार्च २०२६ रोजी फिर्यादी महिला वस्तीगृहात कर्तव्यावर असताना चारचाकी वाहनातून चार इसम परिसरात दाखल झाले. त्यांनी थेट प्राचार्यांच्या कार्यालयाकडे जाऊन वस्तीगृहाची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. यानंतर संशय निर्माण झाल्याने कर्मचाऱ्यांनी त्यांची विचारणा केली असता, संबंधित व्यक्तींना कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले. प्राचार्यांनी त्यांना तात्काळ परिसर सोडण्यास सांगितले. मात्र, बाहेर जाताना आरोपींनी वस्तीगृह परिसरात फिरून पाहणी करण्याचा बहाणा करत विद्यार्थिनींचे फोटो काढल्याचा आरोप आहे. कर्मचाऱ्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी वाद घालत धमकी दिल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात शुभम जंवजाळ याच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे वस्तीगृहातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवरही चर्चा सुरू झाली आहे.

# राम रंगी रंगीले भक्ति व भावगीत स्वरगंगा कार्यक्रम मंगळवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री हनुमान जन्मोत्सव २०२६ वर्ष ९३ च्या निमित्ताने मंगळवार दि ३१ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता माधुरी अकोलीकर-नाईक ( मुंबई ) व साक्षी अकोलीकर-देशपांडे ( पुणे ) यांचा राम रंगी रंगीले भक्ति व भावगीताचा सदाबहार गायनाचा कार्यक्रम श्री बजरंग मंडळ , बजरंग चौक ,बुधवारा येथे संपन्न होत आहे. सर्व रसिकांनी या कार्यक्रमाला आपली उपस्थिती दर्शवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

साक्षी अकोलीकर-देशपांडे अमरावती येथील मूळनिवासी असून सद्यस्थितीत पुणे येथे वास्तव्य आहे. त्यांनी कुमुद हिरूरकर (पद्माताई गोखले यांच्या शिष्या) यांच्याकडून ४ वर्षे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. विविध संगीत समारोहात 'सर्वोत्कृष्ट गायिका' पुरस्कार ,युवा महोत्सवातील पश्चिम विभाग व राष्ट्रीय स्तरावरील गायन स्पर्धेत सुवर्णपदक तर संगीत नाटक



अकादमी, नवी दिल्ली तसेच सांगली येथे 'सर्वोत्कृष्ट गायन अभिनेत्री' पुरस्काराने त्या सन्मानित आहेत.

प्रसिद्ध संगीतकार अनिल मोहिले यांचे संगीत दिग्दर्शनाखालील अल्बममध्ये गायनाची संधी, 'माधव स्मरणम्' आणि 'लतिकांच्या सावलीत' हे अल्बम स्वतः संगीतबद्ध केले आहेत.भावगीत, भजन, नाट्यगीत, गझल यांवर आधारित , रणरणात गेली बाई, शील सूर मधुर बरसे ,आनंदमयी यासारख्या विविध कार्यक्रमाचे सादरीकरण त्यांनी केले. अलीकडेच त्यांचे दोन स्वरचित ( संगीतबद्ध ) गाणी पद्मश्री सुरेश वाडकर यांनी गायलेली आहेत.

माधुरी अकोलीकर - नाईक या देखील अमरावती येथील मूळनिवासी असून सद्यस्थितीत मुंबई येथे त्यांचे वास्तव्य आहे. संगीतकार गायिका म्हणून गेली तीस वर्षे संगीतक्षेत्रात त्या कार्यरत आहेत. motherworks multimedia productions निर्मित आनंदमयी स्त्री संगीतकारांचे स्वरविश्व कार्यक्रमाचे शिल्पकार , शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या जाणता राजा या महानाट्यात स्वतंत्र संगीत स्त्री संगीतकार , नितीन चंद्रकांत देसाई दिग्दर्शित प्रसिद्ध ऐतिहासिक मालिका राजा शिवछत्रपती या मालिकेत संगीतकार गायिका , चंद्र चंदनाचा या सागरीका प्रकाशित अल्बम करता झी मराठी गौरव तर्फे पाच मानांकने त्यांना मिळाली आहे.

# ज्येष्ठ साहित्यिक शिवा प्रधान यांना 'उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार' जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीतील ज्येष्ठ साहित्यिक, कवी आणि समीक्षक शिवा प्रधान यांच्या 'समतेची प्रभात' या काव्यसंग्रहाला २०२६ चा प्रतिष्ठित 'मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्र पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार' जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अनुदान प्राप्त असलेल्या या काव्यसंग्रहाची निवड स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्र पोटे ट्रस्टच्या पुरस्कार समितीने केली आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव प्रदान केला जाणार आहे. शिवा प्रधान हे सध्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्यांना यापूर्वी 'बहुजन रत्न जीवनगौरव' आणि 'समतेचे प्रभातकार' अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



शिवा प्रधान यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यामध्ये प्राचार्य डॉ. शोभा रोकडे, डॉ. कुमार बोबडे, डॉ. अनुप्रिता देशमुख, प्राचार्य डॉ. संतोष बनसोड, डॉ. अशोक इंगळे, डॉ. अभिजित प्रधान, डॉ. वसुधा प्रधान, सुनील उमाटे, डॉ. टी. एम. रामटेके आणि डॉ. देविदास मेंटांगे यांचा समावेश आहे. तसेच डॉ. रेखा पर्वतकार, उमेश शहारे, भीमराव गजभिये, डॉ. इंद्रजीत ओरके, प्रा. छाया खोब्रागडे, पद्माकर मांडवधरे, नरेंद्र गुळघाने, शरद गोरे, डॉ. अनिता धुर्वे, प्रतिभा प्रधान, डॉ. विलास आखरे, प्रा. अनिता निर्गुळे, प्रा. कल्पना डोंगरे, प्रा. एस. कुमार मेश्राम, प्रा. सपना मेश्राम, डॉ. रजनी गेडाम, विजय जीतकर, राज इंगळे, प्रा. संजय धांडे, स्नेहल अभ्यंकर, शोभा वाले, माधुरी कुलकर्णी आणि डॉ. सुजाता पुरी आदींनी त्यांचे कौतुक केले आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### डावे अन् काँग्रेसमुळे राज्ये उद्ध्वस्त!

वर्षानुवर्षे सत्तेची अदलाबदल करून राज्याचा विकास रोखला. कम्युनिस्ट आणि काँग्रेस, केवळ मतदारसंघाच्या राजकारणात अडकले आहेत. राज्यात एनडीएचे सरकार आल्यास केरळचा वेगाने विकास केला जाईल. विकसित केरळ घडवणे ही आमची बांधिलकी आहे. दोन्ही पक्ष एकमेकांना भाजपची 'बी टीम' म्हणत आहेत; पण जनतेने ओळखले आहे की, खरी पर्याय शक्ती भाजपचीच आहे.

### कोल्हापूरची अमृता पुजारी डबल

समिती सभापती रंजिता चाकोते, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जि.प. उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, रमेश बारसकर, सागर कल्याणशेट्टी, पैलवान लोखंडे, उद्योजक सागर कत्ते, प्रकाश वानकर, सुधा अळळीमोरे, योगेश बोंबाळे, श्रीदेवी फुलारे, युवराज सरवदे, यांच्यासह कुस्ती क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

महिलाकुस्ती स्पर्धेसाठी ५० लाख रुपये देण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांना देणार : पालकमंत्री गोरे

पुरुष कुस्ती स्पर्धेसाठी राज्य शासन एक कोट रुपयांचा निधी देते. परंतु महिला कुस्तीसाठी कोणतीही तरतूद नाही. पुढील वर्षीपासून महिला कुस्ती स्पर्धेसाठी राज्य शासनाने ५० लाख रुपये द्यावेत असा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

### आसाममध्ये UCC लागू करणार,

आले, ज्यामुळे हजारो लोकांनी शस्त्रे टाकली. भाजपच्या शासनकाळात राज्यातील हिंसाचार आणि बॉम्बस्फोट थांबले असून राज्यात स्थिरता निर्माण झाल्याचा दावाही त्यांनी केला.

९ एप्रिलला मतदान

आसाममधील सर्व १२६ विधानसभा जागांसाठी ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. तर, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. या निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील ॐ आणि काँग्रेस यांच्यात मुख्य लढत होणार असून, मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजप सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे.

### लग्न आटोपून परतणाऱ्या वऱ्हाड्यांच्या

अर्थमूव्हर्स कंपनीसाठी २०२६ पूर्वी चालवली जात होती. मात्र, त्यानंतर ती एका खासगी ऑपरेटरकडून चालवली जात होती. त्याच्याकडून कंपनीच्या बॅनरचा बेकायदेशीरपणे वापर केला जात होता. या दुर्दैवी घटनेबाबत कंपनी शोकमग्न असल्याचे त्रिवेणी अर्थमूव्हर्स कंपनीने म्हटले आहे.

### बंगालमध्ये काँग्रेस स्वबळावर लढणार,

करताना मालदा आणि मुर्शिदाबाद या पक्षाचा पारंपरिक प्रभाव असलेल्या भागात पक्षाची पकड भक्कम करण्याच्या रणनीतीवर भर दिला आहे.

### शूटिंगवेळी समुद्रात बुडून

येथील तालसरी समुद्र किनारी गेला होता. त्याचदरम्यान रविवारी ही दुर्घटना घडली. राहुल याला गंभीर अवस्थेत दीघा येथील जनरल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारांदरम्यान, त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार चित्रिकरण संपल्यानंतर राहुल समुद्रात उतरला. तसेच यादरम्यान, अचानक तो पाण्यात बुडाला. सुमारे तासाभरानंतर खूप खटपटी करून त्याला बाहेर काढण्यात यश आले. त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तिथे त्याचा मृत्यू झाला.

### अमेरिकेचं 'उडतं रडार' इराणने पाडलं

म्हणजेच शनिवारी (२८ मार्च), इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने अमेरिकेचे इ-१६ फायटर जेट पाडल्याचा दावा केला होता. एकापाठोपाठ एक दोन मोठी विमाने पाडल्याचे सांगून इराणने आपली लष्करी ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**अमेरिकेने दावे फेटाळले** दुसरीकडे, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इराणचे हे सर्व दावे फेटाळून लावले आहेत. 'इराणची सेना खोटा प्रचार करत असून अमेरिकेचे कोणतेही विमान पाडण्यात आलेले नाही,' असे स्पष्टीकरण अमेरिकेने दिले आहे. मात्र, इराणने शेअर केलेले फोटो सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, यामुळे दोन्ही देशांमधील तणाव शिगेला पोहोचला आहे.

### पाकचे माजी लष्करप्रमुख कमर

राहिली आणि सतत वैद्यकीय देखरेखीखाली ठेवण्यात आले. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. बाजवा हे २०१६ ते २०२२ या कालावधीत पाकिस्तानचे लष्करप्रमुख होते.

### होर्मुझ पार केले...; ९४ हजार

टळण्याची शक्यता आहे. सरकारने या भागात कार्यरत भारतीय जहाजे आणि नाविकांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. गेल्या २४ तासांत भारतीय ध्वज असलेल्या जहाजांबाबत कोणतीही घटना घडलेली नाही. सध्या पश्चिम पर्शियन आखात क्षेत्रात १८ भारतीय ध्वज असलेली जहाजे, तर ४८५ भारतीय नाविक कार्यरत आहेत.

### जंगलात तरुणीवर अत्याचार तरूणाला

मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत या गंभीर गुन्ह्यातील पाच संशयीत आरोपींना रविवारी (दि.२९) ताब्यात घेतले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

### भरधाव टिप्परची दुचाकीला

टीव्हीएस स्कुटी (क्र.एमएच-२७-एएन-६५१५) ने एमआयडीसी येथे कामासाठी जात होते. दरम्यान, नवीन बायपास चौकात बडनेरा रोडकडून भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने (क्र. एमएच ३४ बीझेड २२२३) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गजानन पिंगळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी टिप्पर चालक लक्ष्मण किशोरी भगत (वय ३४, रा. हरीहर नगर, कन्हान, जि. नागपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियात २.९५

निधीचा अपहार केल्याचा आरोप आहे. आरोपींनी आपसी कट रचून बँकेसोबत विश्वासघात केला. बँकेच्या वरिष्ठ अधिका-यांच्या बनावट स्वाक्ष-या करून खोटे दस्तावेज तयार केले आणि ते खरे सांगून बँकेच्या शासकीय निधीतून २ कोटी ९५ लाख ४९ हजार ४२१ रुपयांचा घोटाळा केला आणि सदर रक्कम ही खासगी आर्थिक लाभासाठी खर्च करून बँकेची फसवणूक केली, असा आरोप तक्रारीतून करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### कुटुंबियांना घरात डांबून अडीच

सीसीटीव्ही फुटेज तपासणे तसेच संशयितांची माहिती गोळा करण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, या घटनेमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये संताप व्यक्त होत असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करून चोरीचा उलगडा करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### शेतातील नाल्यात आढळला तरुणाचा

करून पुरावे नष्ट करण्याचा प्रकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने पोलिसांनी त्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची ३ आणि वरुड पोलिसांची २ अशी एकूण ५ पथके गठीत करण्यात आली आहेत. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे वरुड तालुक्यात खळबळ उडाली असून, पोलीस तातडीने मृतदेहाची ओळख पटवण्याचे प्रयत्न करत आहेत. या घटनेप्रकरणी, वरूड पोलिसांनी रविवारी सायंकाळी अज्ञात मारेकऱ्यांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

### जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने

ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी प्रकाशराव काळबांडे, येतेशाम नबील, नामदेव तनपुरे, जाहीर बेग, अस्लम वंजारा, सुनील गावंडे, राजेंद्र नागपुरे,शब्बीर भाई, मुरलीधर नाईक, साहेबराव भदे, किस्मत भाई,श्रीकांत झोडपे, अनिल देशमुख, किशोर देशमुख,मतीन भाई,जलील भाई, कदीर पहेलवान, भूषण कोकाटे, मयूर देशमुख,शोएब खान, प्रमोद दाळू, राहुल गवई, राहुल गाठे, सच्चिदानंद बेलसरे,अतिश शिरभाते, ईश्वर बुंदेले, रामेश्वरराव अभ्यंकर,दिलीप चव्हाण,उद्धवराव नळकांडे, रामेश्वर मालपाणी, बिट्टूभाऊ मंगरोळे,राहुल बोडखे,श्याम बेलसरे, शंतनु सोलव, अरविंद पखान,भैय्यासाहेब मेटकर, नंदकिशोर यादव,समाधान दहातोंडे, प्रदीप देशमुख,कलीम भाई,अमोल धवसे उपस्थित होते.

### मध्यवर्ती कारागृहात कर्मचाऱ्यावर

झाले आहे. घटनेनंतर कारागृह प्रशासनाने तात्काळ नियंत्रण मिळवले असून, या प्रकरणी कारागृह अधिकारी राजपाल चरणदास लोखंडे यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार संबंधित बंदीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे.

### ३१ मार्च अंतिम मुदत; मालमत्ता कर

३ टक्के सवलत मिळणार आहे. नागरिकांना घरबसल्या डिजिटल पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता करातून शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, आरोग्य सुविधा व इतर विकासकामे राबविली जातात. त्यामुळे कर वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे.

प्रशासनाने इशारा दिला आहे की, थकबाकीदार मालमत्तांवर जप्ती, सिलिंग, दंडात्मक कारवाई तसेच कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता त्वरित कर भरणा करावा.

'शहर विकासासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक असून सवलतीच्या कालावधीत सर्वांनी मालमत्ता कर भरावा,' असे आवाहन महानगरपालिका आयुक्तांनी केले आहे.

Paytm, Google Pay, BHIM, PhonePe, QR कोड तसेच डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### कॅन्सरच्या आजाराला कंटाळून

त्यानंतर नातेवाईक आणि पोलिसांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून तात्काळ शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार, दीर्घकाळ आजारपण आणि मानसिक तणावामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी नितीन भोंडेंच्या माहितीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

अत्याचार केला. या अत्याचारातून पीडिता दोन महिन्यांची गर्भवती राहिल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६४ (२) (एम) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान आरोपी मनमाड परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मात्र तो अजींठा एक्सप्रेसने पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे समजताच पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर सापळा रचला. स्थानिक जीआरपीएफच्या मदतीने आरोपीला ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनीता हुलावडे करीत आहेत.

### विकसित भारत, समृद्ध

आहे, भारत माता सर्वश्रेष्ठ कशी होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत २०४७ ची घोषणा करत जागतिक स्तरावर ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी आम्ही अहोरात्र झटत आहोत. जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत मोदीजींच्या नेतृत्वाखाली सक्षमतेने पुढे जात आहे. युद्धजन्य स्थितीतही नागरिकांपर्यंत सर्व सोयीसुविधा पोहोचवण्याची क्षमता हीच भारताची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. बोंडे यांनी अमरावतीच्या विकासाची रूपरेषाही स्पष्ट केली. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कच्या माध्यमातून अमरावतीत रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या असून अमरावती विमानतळाच्या रूपाने महत्त्वाचे दळणवळण साधन साकार झाले आहे. प्रस्तावित माहिती तंत्रज्ञान पार्कसाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली युद्धपातळीवर पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सर्वव्यापी संघटना उभारण्यासाठी डॉ. बोंडे यांनी पदाधिकाऱ्यांना ठोस दिशा दिली. आरोग्य शिबिरे, गुणवंत विद्यार्थी सत्कार, देशी खेळांचे आयोजन, सलून व्यावसायिक व ऑटोरिक्षा चालकांचे जाळे विणून किरकोळ व्यावसायिकांना संघटनेशी जोडणे, आदर्श शिक्षक व आदर्श कर्मचारी सत्कार तसेच 'वीक एरिया-वीक पॉईंट' या तत्त्वानुसार संघटना कमकुवत असलेल्या भागात अधिक लक्ष केंद्रित करणे, विजयी झालेल्या आणि पराभूत अशा दोन्ही लोकप्रतिनिधींनी या भागात पोहोचणे आवश्यक आहे.

या माध्यमातून सर्वसमावेशक संघटन बळकटीकरणाचे उद्दिष्ट साध्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. 'सर्व समाजघटकांना एकत्रित केल्याशिवाय भौगोलिक व्याप्ती वाढणार नाही. नागरिकांच्या सेवेसाठी संघटनेचे विस्तारीकरण हीच आजची खरी गरज आहे' असे डॉ.अनिल बोंडे यांनी ठामपणे सांगितले. या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद मंडळाचे अध्यक्ष ललित मंदुरकर, महापालिकेच्या शहर सुधार समितीच्या सभापती राधा राजू कुरील, नगरसेविका स्मिता दिनेश सूर्यवंशी, पद्मजा कौडीन्य, नूतन भुजाडे, माया कांबळे, राजेंद्र मेटे, बरखा बोचे, संतोष कावरे, प्रदीप हिवसे, ममता चौधरी, सुधा तिवारी, रुपेश दुबे, श्रीकांत धानोरकर, राजू कुरील, कल्याणी मुदलियार, रजनी आमले, अलका सरदार, मोहनदास मंदानी, ओमप्रकाश पुनशी, सुधीर पावडे, कमल मालवीय, सुनील माळोदे आदी मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### नियमांचे पालन न करणाऱ्या तीन बँकांना दंड

**मुंबई-**बँकिंग नियमांचे पालन न करणाऱ्या तीन बँकांना आरबीआयने दंड ठोठावला आहे. या बँकांमध्ये युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकाचा समावेश आहे. तसेच फिनटेक कंपनी पाइन लॅब्सवरही आरबीआयने कारवाई केली आहे. यूनियन बँक इंडियावर ९५.४० लाख रुपये, सेंट्रल बँक ऑफ इंडियावर ६३.६० लाख रुपये, बँक ऑफ इंडियावर ५८.५० लाख रुपये आणि पाइन लॅब्सवर २.१० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. यूनियन बँकेने २४ तास तक्रार सुविधा उपलब्ध केली नाही तर सेंट्रल बँकेने केवायसी नियमांमध्ये उल्लंघन केल्याचा आरोप आहे. बँक ऑफ इंडियाने खात्यातून अतिरिक्त शुल्क वसूल केल्याने दंड ठोठावला आहे.



### डिजिटल पेमेंटसाठी येणार टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन

**मुंबई-**१ एप्रिल २०२६ पासून डिजिटल पेमेंट करण्याची पद्धत पूर्णपणे बदलणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने ऑनलाईन फ्रॉड रोखण्यासाठी पावले उचलली असून यासाठी नवीन नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता यूपीआय, नेट बँकिंग आणि मोबाईल वॉलेटद्वारे होणा-या प्रत्येक व्यवहारांसाठी टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन लागू केले जाईल.नव्या नियमांतर्गत आरबीआयने डिजिटल पेमेंटसाठी टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (२एफए) बंधनकारक केले आहे. त्यामुळे आता कोणत्याही ऑनलाईन पेमेंटसाठी यूजर्सला दोन वेगवेगळ्या टप्प्यात आपली ओळख पटवणे आवश्यक असणार आहे. यामुळे डिजिटल ट्रान्झॅक्शन आधीच्या तुलनेत आणखी सुरक्षित होईल. आतापर्यंत अनेक प्लॅटफॉर्मवर सिंगल क्लिक किंवा एक पिन टाकल्यानंतर पेमेंट होत होते. परंतु, आता सिस्टम बदलणार आहे. नव्या नियमानुसार, प्रत्येक ट्रान्झॅक्शसाठी कमीत कमी दोन ऑथेंटिकेशन फॅक्टर आवश्यक असतील. यात एक फॅक्टर प्रत्येक वेळी बदलणारा हवा.



### रशियावर २५ वर्षांनंतर केंद्रीय बँकेतील सोने विकण्याची वेळ

**नवी दिल्ली-**युद्धामुळे लष्करी खर्च वाढल्याने रशियावर केंद्रीय बँकेतील सोने विकण्याची वेळ आली आहे. अर्थसंकल्पीय तूट वाढल्याने रशियाला मागील २५ वर्षांपर्यंत सुरक्षित असलेले सोने बाहेर काढावे लागले आहे. सततच्या विक्रीमुळे रशियाचा सोन्याचा साठा आता चार वर्षांतील नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. आकडेवारीनुसार, रशियाने २०२२ ते २०२५ या दरम्यान १५ ट्रिलियन रूबल म्हणजेच १५० अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त किमतीचे सोने आणि परकीय चलन विकले आहे. २०२६ च्या पहिल्या दोन महिन्यातच अतिरिक्त ३.५ ट्रिलियन रूबल म्हणजेच ३५ अब्ज डॉलर्स किमतीचा साठा विकला आहे.



### रेमंड समुहाच्या विजयपत सिंघानियांचे निधन

**मुंबई-**रेमंड समुहाचे माजी अध्यक्ष (चेअरमन) विजयपत सिंघानिया यांचे मुंबईत निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. विजयपत सिंघानिया यांचे पुत्र उद्योगपती गौतम सिंघानिया यांनी ही माहिती दिली. मुंबईच्या चंदनवाडी स्मशानभूमीत रविवारी दुपारी विजयपत सिंघानिया यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत.विजयपत सिंघानिया हे एक दूरदृष्टी असलेले उद्योगपती, नेता, समाजसेवक होते. त्यांचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देईल, असा विश्वास उद्योगपती गौतम सिंघानिया यांनी व्यक्त केला.भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रात रेमंड हा एक नावाजलेला उद्योग समूह आहे. या समुहाचे नेतृत्व अनेक वर्षे विजयपत सिंघानिया यांनी केले.



### आज राज्यात वादळी पावसाचा इशारा

**नागपूर-**राज्यात ३० मार्चपासून ढगाळ हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. सोमवारी ३० मार्चला प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या 'एक्स' या सोशल मीडियावरून ही माहिती शेअर केली आहे. सोमवार, ३० मार्चच्या तुलनेत मंगळवारी ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

# राष्ट्रीय महामार्गांतील २८ हजार प्रलंबित दाव्यांसाठी ५७ लवादांची नियुक्ती



**मुंबई-**राज्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या अनेक प्रकल्पांच्या भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा वेगवान निपटारा करण्यासाठी केंद्र सरकारने ५७ नवीन लवादांची नियुक्ती केली आहे. या लवाद नियुक्तीमुळे अनेक वर्षांपासून मोबदल्याविना रखडलेले २८ हजारांहून अधिक प्रकल्पग्रस्तांचे दावे आता जलदगतीने निकाली निघणार आहेत. राज्यात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) अनेक प्रकल्प सुरू आहेत. त्यांच्यासाठी लागणाऱ्या भूसंपादनाच्या वाढीव मोबदल्याबाबतची सुमारे २८ हजारांहून अधिक प्रकरणे लवादांकडे प्रलंबित आहेत. यातील काही प्रकरणे ही तीनवर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहेत. प्रकल्पग्रस्तांचे हक्क, मोबदल्याची पद्धत व याविषयातील पारदर्शकता ही बाब लक्षात घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणांच्या जलद सुनावणीसाठी केंद्राकडे स्वतंत्र लवादांची मागणी केली होती. त्यानुसार आता महाराष्ट्रातील अतिरिक्त आयुक्त आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील ५७ अनुभवी अधिकाऱ्यांची 'लवाद' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नव्याने नियुक्त करण्यात आलेले ५७ लवाद कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर या सर्व विभागांतील जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहतील. महसूल विभागाने जारी केलेल्या पत्रात जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ 'एनएचएआय'चे प्रकल्प संचालक आणि भूसंपादन अधिकारी यांची बैठक घेऊन प्रलंबित प्रकरणांची या लवादांकडे वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामात सुसूत्रता राहावी यासाठी एकाच निवाड्याशी संबंधित सर्व दावे एकाच अधिकाऱ्याकडे सोपवण्यात येणार आहेत. या लवादांच्या कामकाजाचा दरमहा आढावा घेण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे. लवादांना आवश्यक मनुष्यबळ आणि कार्यालयीन खर्चासाठी 'एनएचएआय'मार्फत निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

राष्ट्रीय महामार्गांच्या प्रकल्पांमध्ये भूसंपादनाचे दावे प्रलंबित असल्याने अनेकदा शेतकऱ्यांचे मोबदले रखडतात. प्रकल्पांनाही विलंब होतो. ही गंभीर बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. आता ५७ नवीन लवादांची नियुक्ती झाल्यामुळे प्रलंबित २८ हजार प्रकरणे विशिष्ट कालमर्यादेत निकाली निघतील. महसूल विभागाच्या या निर्णयामुळे अनेक जुनी प्रकरणे आता मार्गी लागतील, प्रकल्पग्रस्तांना वेळेवर मोबदला मिळेल. राज्याच्या विकासाला गती मिळेल.असे बावनकुळे यांनी सांगितले.

# भोंदूबाबा अशोक खरातला ४ दिवसांची वाढीव पोलीस कोठडी

**नाशिक-**भोंदूबाबा अशोक खरात याच्या पोलीस कोठडीत न्यायालयाने ४ दिवसांची वाढ केली आहे. त्यामुळे आता खरातला १ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रहावे लागणार आहे.भोंदूगिरी, जादूटोणा आणि महिलांवरील अत्याचाराच्या गंभीर आरोपांखाली अटकेत असलेला अशोक खरात याला रविवारी नाशिकमधील सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष पथकाने अधिक माहिती मिळावी यासाठी खरातला पोलीस कस्टडी मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच यावेळी न्यायालयात खरात याची बंदूक, त्याच्या मोबाईलमधील डेटा व संपत्तीची कागदपत्रे सादर करण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने विशेष पथकाची मागणी मान्य करत खरातला १ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले.



भविष्य सांगण्याच्या बहाण्याने जाळ्यात ओढून भीती घालून महिलांवर लैंगिक अत्याचार करणा-या अशोक खरातचे दररोज नवीन प्रताप चव्हाट्यावर येत आहेत. महिलेवर अत्याचार केला, बनावट रत्ने व अंगठ्या देऊन आर्थिक फसवणूक केली, असे आणखी दोन गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, हवाला रॅकेट व व्याजाच्या धंद्यात त्याने शेकडो कोटींची उलाढाल केल्याचे विशेष तपास पथकाच्या चौकशीत समोर आले आहे. त्याच्या आर्थिक व्यवहाराची आता ईडीकडून चौकशी होणार आहे, यामुळे त्याच्याशी संबंधितांचे धाबे दणाणले आहे.

लैंगिक शोषणाच्या विकृतीचा कळस करणाऱ्या अशोक खरातचे आर्थिक फसवणुकीचे उलाढालीचे मोठे रॅकेट आहे, त्याच्या संपर्कातील विविध खात्यातील वरिष्ठ अधिकारी, व्यावसायिक आणि राजकीय नेत्यांचा काळा पैसा तो व्याजाने देत होता. हवालामार्फत देश-विदेशात तो शेकडो कोटींची हेराफेरी करीत होता, अशी माहिती तपासी पथकाकडे आली आहे.

त्याच्या आर्थिक व्यवहारांचा अहवाल ईडीकडे जाणार आहे, त्याच्याशी संबंधित सर्वांभोवती लवकरच ईडीचा फास आवळला जाण्याची शक्यता आहे, यामुळे त्यांची पळापळ सुरू आहे.

### १५० दिवसांच्या सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ प्रथम

**मुंबई-** राज्य शासनाच्या १५० दिवसांचा सेवाकर्मी प्लस कार्यक्रम अंतर्गत विविध शासकीय संस्था, महामंडळे, प्राधिकरणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले. या विशेष मोहिमेत राज्यातील इतर महामंडळांप्रमाणे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळानेही राज्यातील महामंडळांच्या वर्गवारीत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा संपन्न झाला.सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व्यवस्थापकीय संचालक विजय मगन देवराज आणि त्यांच्या संपूर्ण चमूचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात आकृतिबंध, सेवाप्रवेश नियम, ज्येष्ठता सूची, पदोन्नती, सरळसेवा भरती, बिंदुनामावली, अनुकंपा भरती, घ्दध्ऊ प्रशिक्षण आणि सेवापुस्तक या विविध घटकांच्या आधारे गुणांकन करण्यात आले.

# 'गर्व वाटायची गरज नाही, फडणवीसांनी आधीच कारवाई करायला हवी होती'

## अशोक खरात प्रकरणी अमृता फडणवीसांनी व्यक्त केली खंत

**मुंबई-** राज्यात अशोक खरात प्रकरणी प्रचंड चर्चा सुरू आहे. त्याला आज न्यायालयात हजर करण्यात आलं असून त्याच्याप्रकरणी आज सुनावणी होणार आहे. या प्रकरणावरून सर्वस्तरावरून प्रतिक्रिया येत असताना आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनीही यावर त्यांचे मत प्रदर्शित केले आहे.

अशोक खरातप्रकरणी प्रश्न विचारल्यावर अमृता फडणवीस म्हणाल्या, 'अशोक खरात प्रकरण भयानक प्रकरण आहे. या प्रकरणातून बऱ्याच गोष्टी बाहेर येणार आहेत. डोळे बंद करून बाबांवर विश्वास ठेवणे उचित नाही. अंधविश्वास करतो तेव्हा घात होतो. आपल्याला डोळे उघडे ठेवून जगणे आवश्यक



आहे. आपण आपल्या ग्रंथांचा आधार घेतला पाहिजे. सर्वकाही आपल्या आत आहे. आत आपण एकदम पूर्ण आहोत. आपले आत्पेष्ट किंवा आपल्या गुरुंपासून दूर जाऊन आपल्याला कोणाची गरज आहे असे मला वाटत नाही. स्वतःवर विश्वास ठेवा. आपल्याकडून अशा बाबा बुवाबाजीला प्रोत्साहन देऊ नका. असे पुढे आल्यावर त्यांना बहिष्कार करणे गरजेचे आहे. सरकार याविरोधात आपल्याला मदत करेलच.

अशोक खरात प्रकरणाविषयी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोर कारवाई करत मूळापर्यंत प्रकरण नेले. याविषयी अमृता फडणवीसांना विचारले असता त्या म्हणाल्या, 'याविषयी गर्व वाटायची गरज नाहीय. कारण एवढे झाल्यावर त्यांच्यापर्यंत पोहोचले. हे प्रकरण त्यांच्यापर्यंत आधीच पोहोचायला पाहिजे होते. जेणेकरून बऱ्याच गोष्टी टाळता आल्या असत्या. खूप स्त्रियांचे जीवन वाचलं असते. देवेंद्र फडणवीसांपर्यंत प्रकरण आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली, पण हे खूप आधीच व्हायला पाहिजे होतं', अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली.

### अभिनेता विजय तामिळनाडूमध्ये दोन जागांवर निवडणूक लढवणार

**चेन्नई-**अभिनेता आणि टीव्हीके प्रमुख विजय तामिळनाडूमध्ये दोन जागांवर निवडणूक लढवणार असून, उमेदवारांची नावे जाहीर करून तरुणांना एक मोठे आश्वासन दिले आहे. विजय स्वतः त्रिची पूर्व आणि पेरांबूर (चेन्नई) या दोन जागांवरून निवडणूक लढवणार आहेत. विजय यांनी असेही म्हटले आहे की, ते स्वतः सर्वत्र प्रचार करू शकणार नाहीत. त्यामुळे, त्यांनी अशा उमेदवारांची निवड केली आहे ज्यांच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे आणि जे पक्षाचे काम प्रभावीपणे पुढे नेऊ शकतील. विजय यांनी हेही स्पष्ट केले की, निवडणुकीत त्यांचे नाव 'सी जोसेफ विजय' असे वापरले जाईल. विजय यांनी आपली तयारी आधीच दाखवून दिली आहे आणि आपल्या टीमसह निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा आपला इरादा जाहीर केला आहे.



तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणुका होणार आहेत. निकाल ४ मे रोजी जाहीर होतील. तामिळनाडूमध्ये एकूण २३४ विधानसभा जागा आहेत. तामिळनाडूमध्ये अंदाजे ५.६ कोटी मतदार आहेत, ज्यात अंदाजे २.७ कोटी पुरुष आणि २.८ कोटी महिला मतदारांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ७,६१७ तृतीयपंथी मतदार या निवडणुकीत सहभागी होतील. तामिळनाडूचे राजकारण दीर्घकाळापासून दोन प्रमुख पक्षांभोवती फिरत आहे: एआयएडीएमके आणि डीएमके. या दोन पक्षांचे राज्याच्या राजकारणावर दीर्घकाळ वर्चस्व राहिले आहे आणि बहुतेक निवडणुका त्यांच्यातच लढल्या जातात.

विजयचे पूर्ण नाव जोसेफ विजय चंद्रशेखर आहे. तो तमिळ चित्रपटसृष्टीतील एक मोठा सुपरस्टार असून, त्याला प्रेमाने 'थलपथी विजय' म्हणून ओळखले जाते. त्याने अनेक यशस्वी चित्रपट दिले आहेत आणि त्याची लोकप्रियता केवळ चित्रपटांपुरती मर्यादित नाही; लोक त्याला एक खंबीर आणि प्रभावशाली व्यक्ती म्हणूनही पाहतात.

विजयने स्वतःचा राजकीय पक्ष, 'तमिळगा वेत्री कळघम' स्थापन केला आहे, जो २०२४ मध्ये सुरू झाला. विजयने राजकारणात पूर्णपणे सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा चाहता वर्ग प्रचंड मोठा आहे, जी त्याची सर्वात मोठी ताकद मानली जाते.

# गॅस टंचाईच्या अफवा गुजरातमधून; राज्याविरोधात गुन्हा दाखल करा-संजय राऊत

**मुंबई-**गॅसची टंचाई आहे की नाही याबाबत राज्याच्या मंत्रिमंडळातच एकमत नाही अशी टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केली. तसेच गॅस टंचाईबाबत जर गुन्हा दाखल करायचा असेल तर गुजरात राज्याविरोधात करा कारण या अफवा तिथूनच येत आहेत असेही संजय राऊत म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय की लॉकडाऊन, गॅस टंचाई वगैरेच्या अफवा पसरवणं हा अपराध आहे, त्याच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. पण महाराष्ट्रामध्ये ठीक ठिकाणी गॅसच्या रांगेमध्ये लोक आजारी पडतायत आणि स्वतः तुमचे अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणतात की गॅसची टंचाई आहे म्हणून. आधी कॅबिनेटमध्ये एकमत आहे की नाही ते पहा. मुख्यमंत्री म्हणतात सगळं ठीक आहे, अन्न नागरी पुरवठा मंत्री त्यांची वेगळी भूमिका आहे. त्यांनी म्हटले की विशिष्ट कालमर्यादेच्या पलीकडे आम्ही हा गॅस पुरवू शकत नाही. तुमच्या सरकारमध्येच मतभेद आहेत, तुमचेच लोक गॅसवर आहेत. पोलीस बंदोबस्तामध्ये तुम्हाला सिलेंडरचे वितरण करावं लागतं. मग या अफवा कोण पसरवतंय?



या अफवांचा उगम गुजरात मधून झाला आहे असे संजय राऊत म्हणाले. सगळ्यात जास्त रांगा या गुजरातमध्ये लागल्या आहेत. जसं नोटबंदी होण्या संदर्भातली पहिली माहिती ही गुजरातमध्ये कळली आणि गुजरातमध्ये आठ दिवस आधीच लोकांनी बँकेत रांगा लावून आपले काळा पैसा आत टाकला.

अमित शहा यांच्या बँकेमध्ये एका तासामध्ये पाचशे कोटी रुपये जमा झाले होते. गुजरातचे गृहमंत्री आणि पंतप्रधान असल्यामुळे त्यांना ही बातमी लवकर कळते. गुजरातमध्ये ज्या रांगा लागलेल्या आहेत त्याच्यामुळे महाराष्ट्रामध्ये लॉकडाऊन लागेल ही धास्ती आहे. ही गुजरातून आलेली हवा आहे. गुजरातमधल्या पेट्रोल पंपावरच्या किंवा गॅससाठी रांगा लागल्या आहेत. लोक मोठ मोठे पाण्याचे ड्रम घेऊन रांगेत उभे आहेत. देशभरामध्ये टंचाईच्या अफवा पसरवल्याबद्दल मुख्यमंत्र्यांना जर गुन्हा दाखल करायचा असेल तर गुजरात राज्याविरुद्ध करावा असेही संजय राऊत म्हणाले.

# चॅटबॉटमुळे नागरिकांना अचूक माहिती

## 'ई-गव्हर्नन्स' उपक्रमात शालेय शिक्षण विभागाचा गौरव

**मुंबई-**शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत तंत्रज्ञानाधिष्ठित उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना व्हॉट्सॲप चॅटबॉटच्या माध्यमातून २४×७ तत्पर, बहुभाषिक आणि सुलभ माहिती उपलब्ध करून देण्यात यश मिळवले आहे. या अभिनव आणि लोकाभिमुख कामगिरीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाचा गौरव करण्यात आला. डिजिटल प्रशासन, पारदर्शकता आणि सेवा वितरणात गती आणणाऱ्या या उपक्रमामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमात शालेय शिक्षण विभागाने डिजिटल परिवर्तन, डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शी सुसंगत प्रशासन यावर भर देत अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा राबविल्या. विभागाची अधिकृत संकेतस्थळ व्यवस्था अधिक सक्षम करून धोरणे, परिपत्रके, अधिसूचना, डॅशबोर्ड आणि नागरिकाभिमुख सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करण्यात आल्या. यामुळे माहितीची पारदर्शकता वाढली असून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकारी यांना माहिती सहज उपलब्ध होत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या सर्वांगीण गुणवत्तेत सुधारणा झाली असून ५७ विभागांमधून शालेय शिक्षण विभागाने सहावा क्रमांक मिळवल्याबद्दल प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी समाधान व्यक्त केले आहे. क्षेत्रीय पातळीवर संपूर्ण कामाची अंमलबजावणी करणारे शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह आणि मंत्रालय पातळीवर ई गव्हर्नन्स चे काम पूर्णत्वास नेणारे उपसचिव समीर सावंत यांचे त्यांनी विशेष कौतुक केले आहे .

ई-ऑफिस प्रणालीमुळे विभागातील फाईल्सची प्रगती, मंजुरी प्रक्रिया आणि प्रशासकीय कामे पूर्णपणे डिजिटल झाल्याने कार्यक्षमता, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढली आहे.'आपले सरकार' पोर्टलशी जोडून शिक्षणाशी संबंधित विविध सेवा आणि प्रमाणपत्रे ऑनलाइन, वेळेत आणि उत्तरदायी पद्धतीने उपलब्ध करण्यात आली आहेत. यामुळे नागरिकांच्या शासकीय कार्यालयांतील फेऱ्या कमी झाल्या असून सेवा हक्क कायद्याअंतर्गत सेवा वितरण अधिक



प्रभावी झाले आहे. विभागाने नोंदणी, उपस्थिती, शैक्षणिक गुणवत्ता, शालेय पायाभूत सुविधा, शिक्षक नियोजन आणि विविध योजनांची अंमलबजावणी यांसारख्या प्रमुख बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी परस्परसंवादी डॅशबोर्ड विकसित केले आहेत. या डॅशबोर्डच्या साहाय्याने सर्व प्रशासकीय स्तरांवर रिअल-टाइम आढावा घेऊन धोरणात्मक निर्णय अधिक अचूकपणे घेणे शक्य होत आहे.

**व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे परिणामकारक संवाद**

शालेय शिक्षण विभागाने राबविलेल्या बाबींमध्ये विशेष उल्लेखनीय म्हणजे विभागाने सुरू केलेला अधिकृत एआय-आधारित व्हॉट्स?प चॅटबॉट हा नागरिकांसाठी एक-खिडकी डिजिटल सहाय्यक ठरत आहे. शाळा व्यवस्थापन, विद्यार्थी कल्याण योजना, शिक्षकांच्या सेवाविषयक शंका, इयत्ता अकरावी प्रवेश, अपार आयडी, परीक्षा व निकाल, तसेच तक्रारी आणि अभिप्राय या सर्व बाबींवर मराठी आणि इंग्रजी भाषेत त्वरित माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे विभाग आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक झाला आहे.

**'एआय'मुळे मूल्यमापनाच्या गुणवत्तेत वाढ**

'निपुण महाराष्ट्र' एआय-सक्षम मूल्यमापन ॲपच्या संकल्पना चाचणीने पायाभूत शिक्षणातील मूल्यमापन प्रक्रियेत नवे पर्व सुरू केले आहे. मूल्यमापन पत्रिकांमधील माहितीचे स्वयंचलित संकलन, विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्याचे एआय-आधारित परीक्षण, वर्गस्तरीय तात्काळ विश्लेषण आणि वैयक्तिक शैक्षणिक गरजांनुसार बेंचमार्किंग यामुळे मूल्यमापनाची गुणवत्ता वाढली आहे. निवडक जिल्ह्यांतील पायलटमध्ये ९० टक्क्यांहून अधिक अचूकता आणि ३० ते ४० टक्के वेळ बचत नोंदविण्यात आली.

एकूणच या सर्व उपक्रमांमुळे शालेय शिक्षण विभागाने ई-गव्हर्नन्स, सेवा सुलभता, पारदर्शक प्रशासन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या चारही स्तरांवर उल्लेखनीय प्रगती साधली असून १५० दिवसांच्या कार्यक्रमात विभागाच्या कामगिरीला राज्यस्तरीय मान्यता मिळाली आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# पाकिस्तानच्या कुरापती

युद्धसमाप्तीबाबत पडद्यामागे इराणशी वाटाघाटी सुरू असल्याच्या अमेरिकेच्या दाव्याचे इराणचे परराष्ट्रमंत्री सईद अब्बास अरागची यांनी पूर्णपणे खंडन केले आहे. अमेरिकेच्या प्रस्तावाचा आम्ही आढावा घेत आहोत. मध्य पूर्वेतील अनेक देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. परंतु इराणची भूमिका तत्त्वाला धरून असून, ती ठाम आहे, असे अरागची यांनी म्हटले आहे. चर्चेसाठी तयार व्हा, अन्यथा परिणाम गंभीर होतील, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. एकीकडे असे वक्तव्य करतानाच, आमच्याबरोबर करार करण्यासाठी ते अक्षरशः विनवणी करत आहेत, असेही ट्रम्प म्हणाले. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड नौदलाचे प्रमुख कमोडोर अली रझा तांगझरी यांचा खात्मा केल्याचे इस्रायलने म्हटले आहे. मात्र यापूर्वी इराणचे सर्वोच्च धर्मगुरू अली खामेनी यांच्यासह अनेक बडे नेते आणि लष्करी अधिकारी यांचा मृत्यू होऊनदेखील इराण कोणत्याही प्रकारे माघार घेण्यास तयार नाही. इराणची होर्मुझ सामुद्रधुनीभोवतीची मूठ अद्याप घट्टच असून, युद्धविराम असतानाही इराण-इस्रायलचे परस्परांवरील हल्ले सुरूच आहेत. होर्मुझमधून जाण्यासाठी इराण शुल्क आकारत असल्याची माहिती आखाती सहकार्य मंडळाचे सरचिटणीस जासेम बुदैवी यांनी दिली आहे. बहारिन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीचा या मंडळात समावेश असून, बुदैवी हे या देशांच्या व्यवहारांवर देखरेख ठेवतात. अमेरिकेने इराणला जो पंधरा कलमी प्रस्ताव पाठवला आहे, त्याची प्रत दोन पाकिस्तानी अधिकारी इराणकडे घेऊन गेले. इस्रायल-अमेरिका विरुद्ध इराण या युद्धात मध्यस्थी करण्याची तयारी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी अगोदरच दर्शवली होती. अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध पुकारलेल्या युद्धात भारताने मध्यस्थी करावी, असा सूर उमटला असतानाच परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर सर्वपक्षीय बैठकीत म्हणाले की, इजिप्त, तुर्कस्तानसह पाकिस्तान व अन्य देश वॉशिंग्टन आणि तेहरानमध्ये मध्यस्थ म्हणून काम करण्याची धडपड करत आहेत. परंतु भारत स्वतःला पाकिस्तानप्रमाणे दलाल मानत नाही. १९८१ पासून अमेरिकेने पाकिस्तानचा वापर केला आहे आणि पाकप्रमाणे आम्ही दलालीचे उद्योग करत नाही. या संघर्षाचे परिणाम सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांवर होत आहेत. म्हणून हा तणाव त्वरित संपवला पाहिजे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांच्यापाशी व्यक्त केले आहे. आखाती देशांमधील भारतीय समुदायांची सुरक्षा आणि देशांतर्गत ऊर्जासुरक्षा ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता आहे आणि हे योग्यच आहे. उलट अफगाणिस्तानबरोबरच्या संघर्षात पाकिस्तान होरपळत असताना, जनतेचे हित जपण्याऐवजी त्या देशाला मध्यस्थीची नौटंकी करून स्वतःची इमेज वाढवण्यात रस आहे. १९७० च्या दशकात अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांनी चीनशी दोस्ती करण्याच्या दिशेने पावले टाकण्याचे ठरवले. त्यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि चीनचे अध्यक्ष माओ त्से तुंग यांची भेट घडवून आणण्यासाठी पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल याह्याखान यांनी प्रयत्न केला होता. त्याच्या बदल्यात १९७१ च्या बांगला देश मुक्ती संग्रामात अमेरिकेने पाकिस्तानची कड घेऊन फिट्टमफाट केली. अफगाणिस्तानात रशियन फौजा होत्या, तेव्हा अमेरिकेने सौदी अरेबिया व पाकमधील धर्मांध शक्तींना हाताशी धरून त्यांना शस्त्रास्त्रे व पैसा पुरवला. ही सारी मदत पाकिस्तानी लष्कर अफगाणिस्तानात पोहोचवत होते व स्वतः त्यातला 'वाटा' घेत होती. तालिबान व अल कायदासह पाकमधील इतर दहशतवादी संघटनांनी लष्करी प्रशिक्षण देऊन तयार केलेले जिहादी काश्मीरमध्ये हिंसाचार करत होते, त्याकडेही अमेरिकेने कानाडोळा केला होता. पाकिस्तानची निर्मितीच धार्मिक पायावर झाली. त्याचे निर्माते जिना यांनी धर्मातीत राज्यघटना आणण्याची ग्वाही दिली होती. परंतु त्यांचे निधन झाले आणि नंतरच्या राज्यकर्त्यांनी धर्मवाढीस प्रोत्साहन देणारी राज्यघटना राबवली. जनरल झिया उल हक यांना तर धर्मवादी प्रवृत्तींच्या सहाय्याने राजकीय पक्षांना नामोहरम करायचे होते. सौदी अरेबियाच्या मदतीने त्यांनी मदरशांची संख्या वाढवली. अमेरिकन राज्यकर्त्यांनी सौदी अरेबियाप्रमाणेच पाकच्या धर्मांधतेकडे कानाडोळा केला. अफगाणिस्तानात सोव्हिएत युनियनशी मुकाबला करण्याच्या काळात झिया यांना अमेरिकेनेच प्रबळ केले. पाकमुळेच अल कायदाचा प्रसार झाला आणि अनेक अतिरेकी संघटना आज तेथे बळकट बनल्या. अल कायदाची वाढ होत असताना पाकला अमेरिकेची आर्थिक व लष्करी मदत होत असून अण्वस्त्रांच्या प्रसारास पाकने हातभार लावला आहे. पण त्याबद्दल त्या देशावर कसलेच आंतरराष्ट्रीय बंधन आणले नाही. उलट नेटो देशांच्या बाहेरचा जवळचा दोस्त, अशा पद्धतीने आपण पाककडे पाहात असल्याचे अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी घोषित केले होते. ट्रम्प यांनी तर शरीफ व मुनीर यांना वॉशिंग्टनमध्ये आमंत्रित करून त्यांना शाही खानाही दिला. ट्रम्प यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळावा, अशी मागणी करून पाकिस्तानने चापलुसीचा कळस गाठला. वास्तविक युद्धखोर ट्रम्प यांना जगात अशांतता माजवल्याबद्दल वेगळाच 'पुरस्कार' देण्याची आवश्यकता आहे. पाकिस्तानने एप्रिलपासून अमेरिकेचे पुन्हा भजन म्हणण्यास सुरुवात केली. क्रिप्टो करन्सी आणि दुर्मीळ खनिजे यांसंबंधी ट्रम्प यांच्या निकटवर्तीयांबरोबर पाकिस्तानने 'डील' केल्याचे सांगण्यात येते. गेल्या मे महिन्यात 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी झालेल्या संघर्षात अमेरिकेने वेळीच मध्यस्थी करून पेचप्रसंग मिटवल्याबद्दल या देशाने ट्रम्प यांचे जाहीर आभार मानले होते. हा संघर्ष मीच मिटवला, अशी टिमकी ट्रम्प यांनी शंभरवेळा वाजवली. पाकमध्ये शिया लोकसंख्याही कमी नाही. त्यामुळे इराणने यूएई, सौदी अरेबिया, कतार, ओमान आणि बहारिन यांच्याप्रमाणे पाकमध्ये हल्ले केलेले नाहीत. इराण हा शेजारी देश असला, तरीदेखील जागतिक संघर्षात मध्यस्थी करण्याची पाकची योग्यता नाही. त्यांनी प्रथम स्वतःच्या अस्तित्वाची चिंता करावी. त्याला विश्वाची चिंता करण्याचे काहीएक कारण नाही!

# हॉर्मुझमधील नौदल संघर्ष



**इराण-अमेरिका संघर्षात अरबी आखात आणि हॉर्मुझ रस्ता हा नौदल आणि राजकीय संघर्षाचा केंद्रबिंदू बनला आहे. यासंदर्भात अमेरिकेच्या नौदलाचा, विशेषतः विमानवाहक युद्धनौकांचा वापर आणि इराणचा 'गनिमी कावा' व लहान वेगवान नावांच्या रणनीतीचे विश्लेषण, तसेच आखाती नौदलांची भूमिका आणि त्यातून मिळणारे युद्धाचे धडे यावर विश्लेषण अत्यंत गरजेचे आहे.**

अमेरिकन नौदलाचा मुख्य आधार हा अनेक विमानवाहक युद्धनौका आधारित स्ट्राईक ग्रुप्स (carrier strike groups) आहेत. या वेळी यूएसएनच्या अनेक सुपरकॅरियर्स- जसे की, यूएसएस जेराल्ड आर. फोर्ड, यूएसएस अब्राहम लिंकन आणि यूएसएस जॉर्ज एच. डब्ल्यू. बुश. यांना इराणजवळच्या पाण्यात तैनात करण्यात आले आहे, जिथून त्यांची विमाने इराणच्या लष्करी आधार, रॉकेट/मिसाईल साइट्स आणि नौदल सुविधांवर हल्ले चढवू शकतात.

या नौसेनेची भूमिका फक्त हल्ला करण्याची नसून अरबी आखातातील मित्रराष्ट्रांना सुरक्षा देण्याचीही आहे. विमानवाहक नौका ही एक भ्रमणशील/ हलणारे विमानतळ म्हणून वापरली जाते, जिथून फायटर जेट्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर विमाने, AWACS आणि स्ट्राईक ड्रोन यांच्या माध्यमातून वायुसेना, नौसेनेचा एकत्रित दबाव टाकता येतो. त्यामुळे अमेरिकेला दूरवर फायर करण्याची क्षमता मिळते.

हॉर्मुझची सामुद्रधुनी आणि पर्शियन आखात क्षेत्रात संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि बहारीन यांसारख्या देशांचे नौदल तैनात आहे. मात्र, या संघर्षात त्यांची भूमिका प्रामुख्याने 'सहकार्यात्मक आणि संरक्षणात्मक' राहिली आहे. हे देश अमेरिकन आणि आंतरराष्ट्रीय नौदलांना नियमित रसद पुरवतात. त्यांच्या हवाई तळांचा आणि बंदरांचा उपयोग अमेरिकन 'सुपर-कॅरिअर्स'साठी लॉजिस्टिक हब म्हणून केला जातो. त्यांनी आपली किनारपट्टी संरक्षण प्रणाली अधिक सक्षम केली आहे. इराणकडून येणाऱ्या छोट्या नौकांच्या धोक्यावर लक्ष ठेवण्यासाठी हे देश सातत्याने गस्त घालतात. या देशांच्या नौदलांनी इराणविरुद्धच्या थेट मोठ्या लष्करी कारवायांमध्ये सहभाग घेण्याचे टाळले असून त्यांचे लक्ष केवळ व्यापारी मार्गांच्या सुरक्षेवर केंद्रित आहे.

इराणकडे अमेरिकेसारख्या महाकाय युद्धनौका नसल्या तरी त्यांनी हॉर्मुझच्या क्षेत्रात 'असममित युद्धनीती' (Asymmetric Warfare) अवलंबली आहे. इराणचे 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' आणि इराणची नेव्ही यांच्याकडे शेकडो 'स्पीड बोट्स' आहेत. या नौका आकाराने लहान असल्या तरी त्या मशीनगन्स, रॉकेट लॉन्चर्स आणि जहाजविरोधी क्षेपणास्त्रांनी सज्ज आहेत.

**'स्वार्म अटॅक' (झुंडीचे हल्ले) आणि इराणची रणनीती :** इराणच्या रणनीतीचा मुख्य उद्देश अमेरिकन आणि आंतरराष्ट्रीय युद्धनौकांना दबावाखाली ठेवणे हा आहे. इराणच्या या वेगवान नौका आंतरराष्ट्रीय जहाजांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करतात किंवा त्यांच्या अगदी जवळ जाऊन चिथावणीखोर हालचाली करतात.

**झुंडीचे हल्ले :** या युद्धतंत्रात अनेक छोट्या नौका एकत्र येऊन एका मोठ्या युद्धनौकेला चहूबाजूंनी घेरण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी मोठ्या युद्धनौकेला आपली संरक्षक यंत्रणा, गोळीबार किंवा 'इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर'चा वापर करावा लागतो.

या छुप्या युद्धामुळे केवळ भौतिक नुकसानच नाही, तर मानसिक तणाव निर्माण करून जागतिक अर्थव्यवस्थेला खीळ घालण्याचा प्रयत्न इराणकडून केला जातो.

हॉर्मुझ मार्ग जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या चोक पॉइंट्सपैकी एक आहे. कारण त्यातून जगातील २० टक्के इतके कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू जातात. समुद्रामधील 'चोक पॉइंट' (Choke Point) ही संकल्पना जागतिक व्यापार आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. हा एक असा अरुंद समुद्री मार्ग असतो जिथून जहाजांची ये-जा मोठ्या प्रमाणात होते, पण तो मार्ग इतका अरुंद असतो की, तो सहजपणे रोखला जाऊ शकतो.

ज्याप्रमाणे रस्त्यावरील एखादा अरुंद पूल किंवा बोगदा बंद पडल्यास संपूर्ण वाहतूक ठप्प होते तसेच समुद्रात काही नैसर्गिक अरुंद मार्ग असतात. दोन मोठ्या जलमार्गांना जोडणाऱ्या या अरुंद पट्ट्याला 'सामुद्रधुनी' (Strait) किंवा 'चोक पॉइंट' म्हणतात. जर हा छोटा मार्ग बंद झाला तर जहाजांना हजारो मैलांचा वळसा घालून जावे लागते, ज्यामुळे वेळ आणि इंधनाचा खर्च प्रचंड वाढतो.

फक्त २१ मैल रुंदीचा हा समुद्रमार्ग जगातील तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. काही तेल वाहतूक जहाजे हानीग्रस्त झाली, विमा खर्च वाढले आणि व्यापारी जहाजे अडकली. युद्धनीतीमध्ये चोक पॉइंटवर नियंत्रण मिळवणे म्हणजे संपूर्ण जगाची 'लाईफलाइन' कापण्यासारखे असते. इराण आणि पश्चिम आशियातील तणावात 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' हा जगातील सर्वात धोकादायक चोक पॉइंट बनला आहे. इराण या अरुंद मार्गाच्या अगदी काठावर वसलेला आहे.

जेव्हा जेव्हा अमेरिका किंवा पाश्चात्य देशांकडून इराणवर निर्बंध लादले जातात किंवा लष्करी दबाव वाढतो, तेव्हा इराण 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' बंद करण्याची धमकी देतो.

जागतिक व्यापारावर परिणाम करून आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी किंवा दबाव टाकण्यासाठी चोक पॉइंटचा वापर 'स्ट्रॅटेजिक वेपन' म्हणून केला जातो. थोडक्यात, चोक पॉइंट हे समुद्रातील असे 'गळा आवळण्याचे' ठिकाण आहेत, ज्याचा ताबा ज्याच्याकडे असेल तो जागतिक अर्थव्यवस्था आणि युद्धभूमीवर वरचढ ठरू शकतो.

सध्याच्या संघर्षात इराणने अनेक व्यापारी जहाजांवर लहानमोठे हल्ले केले आहेत आणि धमक्याही दिल्या आहेत. इराणी वेगवान नौका आणि ड्रोन्स तेलवाहू जहाजांच्या अगदी जवळून घिरट्या घालत भीतीचे वातावरण निर्माण करतात. या प्रकारामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती भडकल्या आहेत. अनेक वाहतूक कंपन्यांनी आपले सागरी मार्ग बदलले आहेत. हा मार्गबदल तात्पुरता असला तरी त्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड आर्थिक आणि राजकीय दबाव निर्माण झाला आहे.

थोडक्यात सांगायचे तर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत (Strait of Hormuz) इराणच्या 'स्पीड बोट्स' तंत्रज्ञानाने जहाजांचे नुकसान करून आणि भीतीचे वातावरण निर्माण करून जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का दिला आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, भविष्यातील नौदलाच्या लढायांमध्ये 'चोक पॉइंट नाकेबंदी' आणि 'ड्रोन-बोट युद्ध' हे मुख्य तंत्र बनणार आहेत.

**ब्रिगेडियर हेमंत महाजन**

# संघ सरकार नव्हे शाखा चालवितो



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा राजीनामा, इफिस्टिन फाईल आणि केंद्र सरकारच्या धोरणाचा विरोध करण्यासाठी नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस पक्ष यांनी महाराष्ट्रव्यापी संयुक्तरीत्या मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. २३ मार्च रोजी देशात भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या बलिदानाचे स्मरण होत असताना नागपूर मध्ये प्रकाश आंबेडकर व हर्षवर्धन सपकाळ यांनी जनआक्रोश काढला. मॉरिस कॉलेज जवळ प्रकाश आंबेडकर व हर्षवर्धन सपकाळ यांची अशोभनीय भाषणे सुद्धा झाली. काँग्रेस आणि संघ यांच्या मध्ये वैचारिक मतभेद सर्वश्रृत असून ज्या काँग्रेसने संपूर्ण देशावर अनेक वर्ष एकछत्री अंमल असताना आपल्या राजकीय शक्तीचा वापर करून संघाला चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला त्याच कॉग्रेसला आज आपल्या अस्तित्वासाठी प्रादेशिक पक्षासोबत मोर्चा काढावा लागत आहे. आपल्या अस्तित्वासाठी संघ विरोधाचा आधार घ्यावा लागत आहे. हे दुर्दैवच म्हणावे लागेल. संघ कार्यालयावर मोर्चा काढणे ही आज सवंग प्रसिद्धी मिळविण्याची फॅशन ठरलेली दिसत असून हे फार मोठे षड्यंत्र म्हणावे लागेल. संघाच्या कार्यालयावरच मोर्चे का काढले जातात ?

याचे मूळ समजून घेणे आवश्यक आहे. यापूर्वी त्यांनी छत्रपती संभाजी नगर कार्यालयावर मोर्चा काढला होता. वामन मेश्राम यांनी सुद्धा तोच प्रयत्न नागपूरमध्ये केला आहे. असे मोर्चे काढून प्रसार माध्यमांमध्ये केवळ भांडवल करण्याचा त्यांचा डाव दिसत असून त्या मागे मोठे षड्यंत्र कार्यरत आहे. आज मध्य पूर्वेत इराण- इस्रायल यांच्या मध्ये प्रचंड रक्तरंजित संघर्ष सुरू असून जग चौथ्या महायुद्ध दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळेस भारत सुद्धा अशांत आहे हे जगाला दाखविण्यासाठी असे मोर्चे काढण्याचा प्रयत्न असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आरफा खानम शेरवानी, रवीश कुमार, पुण्य प्रसून वाजपेयी, सागरिका घोष, शेखर गुप्ता, करन थापर यांच्या टूल किट तथा द.वायर पासून द.स्क्रोल वामपंथी समुह राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील मिडिया मध्ये नागपूर मोर्चाची चर्चा घडवून भारत कसा अशांत आहे हा ग्लोबल अॅक्सिस देण्याचे षड्यंत्र म्हणावे लागले एकूणच नागपुरातील मोर्चा हा मोर्चा नसून 'भारत अस्थिर व अशांत' असल्याचा नॉरेटिव्ह प्रस्थापित करण्याचा षड्यंत्रकारी प्रयोग म्हणावा लागेल.

### संघ मुख्यालय लक्ष का?

केंद्र सरकारच्या धोरण विरोधात तथा एपिस्टीन फाईल मुद्द्या सह विविध प्रश्नावर काँग्रेस अध्यक्ष आणि वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. झालेल्या सभेत केंद्रातील मोदी सरकार संघ चालवित असून मोहन भागवत यांनी नरेंद्र मोदी यांचा राजीनामा घ्यावा अशी मुक्ताफळे केली आहेत. वास्तविक पाहता त्यांना नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची मागणी व केंद्र सरकारच्या धोरणांचा विरोधच करायचाच होता तर दिल्लीच्या संसद भवनावर मोर्चा काढायला पाहिजे होता. त्यासाठी न्यायालय सुद्धा उघडे आहेत. पण संघ मुख्यालय का लक्ष केले जात आहे ? संघाची देशात वाढलेली शक्ती आणि सामान्य माणसात संघ कार्या प्रति निर्माण झालेला विश्वास हे त्यांचे खर दुखणे आहे. अशा प्रयोगामधून त्यांना दोन गोष्टी साध्य करायच्या आहेत एक म्हणजे संघाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न आणि दुसरी म्हणजे जगात भारत सुद्धा अशांत आहे असा नॉरेटिव्ह प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. आणि त्यासाठीच संघ कार्यालयवर मोर्चा काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. संघासारख्या जगव्यापी संघटनेवर निराधार आरोप केल्याने प्रसार माध्यमातील चर्चा मध्ये राहण्याची संधी सुद्धा मिळत असल्याने संसद भवन ऐवजी संघ मुख्यालय लक्ष केले जात आहे. संघ सरकार नव्हे शाखा चालविते.

केंद्रातील सरकार संघ चालविते त्यामळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला आहे. प्रधानमंत्री यांचा राजीनामा संघ कार्यालयात मागण्याचा नवीन शोध त्यांनी लावला असून संघ कार्यालय व प्रधानमंत्री याचा कोणताही संबंध येत नाही. संघ केवळ व्यक्ती निर्माणाची साधी व सोपी कार्यपद्धती असलेल्या संघाच्या शाखा चालविते. संघाचे स्वयंसेवक केंद्र सरकार मध्ये आहेत सत्य आहे पण केंद्रातील भाजपच्या सरकारची आपल्या संघटने विषयी काम व विचार करण्याची स्वतंत्र पद्धत आहे ते आपले निर्णय घेण्यास स्वतंत्र आहेत त्यामुळे संघाला मोदी यांचा राजीनामा मागण्याचा प्रश्नच नाही. हे सत्य समजून घेण्याची आवश्यकता आहे.

देशाच्या राजकारणात एकेकाळी मुख्य भूमिकेत असणाऱ्या काँग्रेसला आता आपल्या अस्तित्वासाठी प्रादेशिक पक्षांसोबत मोर्चे काढण्याची दुर्दैवी वेळ आलेली आहे. सोबतच संघ मुख्यालयावर मोर्चा काढण्याचे षड्यंत्र सुद्धा करावे लागते आहे. इतिहासामध्ये कधीच व कोणत्याही संघटना किंवा राजकिय पक्षाच्या कार्यालयावर मोर्चा काढला गेलेला नाही. परंतू आता सवंग प्रसिद्धीसाठी संघ कार्यालयावरच मोर्चे काढण्याची नवीन फॅशन सुरू झालेली असून ही पद्धत अत्यंत घातक व नॅरेटिव्ह प्रस्थापित करणारी षड्यंत्रकारी पद्धत म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

**अशोक राणे**
मो. ९४२३६५८३८५

## अशोक खरातला फासावर लटकवा...

महाराष्ट्राच्या नाशिक जिल्ह्यातील भोंदूबाबा अशोक खरातच्या कारणाम्यामुळे अवघा महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. अशोक खरात हा एकच भोंदू बाबा नाही असे हजारो बाबा आपल्या देशात दुकाने मांडून आपल्या धंदा तेजीत चालवत आहेत याला खतपाणी घालणारे राजकारणी, समाजकारणी, उच्चपदस्थ अधिकारी असल्याने हजारो कोटींची मालमत्ता जमावल्याचे समोर आले आहे महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या आडून अशोक खरात कारनामे करत होता का ? असा देखिल सवाल उपस्थित होतो आहे. आज आपण डिजिटल जगतात वावरत असतांना आणि २१ शतकाकडे झेपावताना असल्या किळस वाण्या घटनेने उचल खाल्ली आहे. ही महाराष्ट्रासाठी शरमेची बाब म्हणावी लागेल कुठे तो शिवरायांचा महाराष्ट्र आणि आता हा राजकारण्यांचा महाराष्ट्र शिवरायांच्या राज्यकारभारात महिलांच्या केसालाही धक्का लागत नव्हता. मात्र, आता सर्वकाही गुंडाळून राजकारण्यांच्या आडून महिला, मुली पुरविल्या जात आहेत का ? असा प्रश्न पडला आहे. २०१३ हा महाराष्ट्रात जादूटोणा, अघोरी प्रथा आणि नरबळी यांसारख्या अंधश्रद्धेवर आधारित कायदा असताना महाराष्ट्रात मात्र हा कायदा चक्क धाब्यावर बसवून राज्यातील स्वयंमघोषित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने फसवेगिरी केली आह.

**राजू जाधव**

## आणखी किती वर्ष हे हल्ले?

दरवर्षी हिंदूंच्या मिरवणुकांवर केले जाणारे हल्ले हे प्रशासनाचे घोर अपयश आहे. अशा प्रकारच्या हल्ल्यानंतर विघ्नसंतोषी धर्मांधांची धरपकड केली जाते, यांना सोडवण्यासाठी वकिलांची फौज उभी राहते आणि काही दिवसांतच ही समाजद्रोही मंडळी हिंदूंच्या पुढच्या उत्सवांत विघ्न आणण्यासाठी उजळ माथ्याने बाहेर येतात. आणखी किती दिवस हे हल्ले हिंदूंनी सहन करायचे. देशातील बहुसंख्य समाजाने प्रत्येक ठिकाणी नमते घेत राहायचे आणि दुसऱ्या आक्रमक समाजद्रोही धर्मांध समाजाने त्यांच्यावर दहशत माजवायची यालाच पंथनिरपेक्षता म्हणतात का? आज देशात आणि राज्यात हिंदुत्ववादी विचारांचे सरकार असताना हिंदूंचे प्रत्येक वेळी दमन होत असेल तर सरकार करतेय तरी काय ?

**जगन घाणेकर**

## रोहित पवारांची बोलती बंद

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याकडून गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने आकांडतांडव सुरू आहे. या प्रकरणाची राज्य आणि केंद्र सरकारच्या संबंधित यंत्रणांमार्फत रीतसर चौकशी सुरू असून, या तपासातून चित्र स्पष्ट होईल की यात घातपात आहे की अन्य काही कारणांमुळे ही दुर्घटना झाली. मात्र, रोहित पवार वस्तुस्थिती समजून घेण्यास तयार नसल्याचे दिसते. अलीकडेच त्यांनी दिल्लीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, 'आप'चे अरविंद केजरीवाल आणि समाजवादी पक्षाच्या नेत्यांची भेट घेतली. राज्य सरकार या प्रकरणी एफ.आय.आर नोंदवून घेत नसल्याची मुख्य तक्रार त्यांनी या नेत्यांकडे केली होती. त्यानुसार, काँग्रेस शासित कर्नाटकात या प्रकरणी 'झिरो एफ.आय.आर' दाखल झाला असून नियमानुसार तो आता राज्य सरकारकडे वर्ग होईल.

जनमाध्यम संवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

आमदार रोहित पवारांनी उपस्थित केलेल्या या सर्व प्रश्नांवर आणि तक्रारींवर राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जे सडेतोड उत्तर दिले, त्यातून रोहित पवारांचा हा सर्व खटाटोप जनहितासाठी नसून निव्वळ राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे उघड झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी कायदेशीर प्रक्रिया आणि चौकशीचा वस्तुनिष्ठ अहवाल समोर ठेवून पवारांच्या प्रत्येक आरोपातील फोलपणा पुराव्यानिशी खोडून काढला. फडणवीसांच्या या आक्रमक आणि मुद्देसूद उत्तरामुळे रोहित पवारांची अक्षरशः 'बोलती बंद' झाली असून, हे उत्तर त्यांच्या राजकीय स्टंटबाजीला मिळालेली मोठी चपराक आहे. या अनुभवातून रोहित पवार आता तरी काही बोध घेतील का, हाच खरा प्रश्न आहे.

**अविनाश देशपांडे**

## सरकारच्या उपाययोजना काय?

इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाला तीन आठवडे पूर्ण झाल्यावर भारताची भूमिका काय, या प्रश्नावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर संसदेच्या दोन्ही सभागृहांत निवेदन केले, परिस्थितीची जाणीव झाल्यावर मोदींनी संसदेत निवेदन केले. सर्व पक्षीय बैठक बोलावली. कोरोना काळात आपण ज्या संकटांचा सामना केला तसाच पद्धतीच्या संकटासाठी आपल्याला तयार राहावे लागले असा इशारा दिला. परिस्थिती गंभीर आहे म्हणजे येत्या काही दिवसांत या युद्धाच्या बाबतीत काही सकारात्मक गोष्टी घडल्या नाहीत, तर ऊर्जेचा तुटवडा जाणवू शकतो. संकटाचा सामना करण्यासाठी सरकार काय उपाययोजना करीत आहे त्यांनी काहीही सांगितले नाही. आठ आखाती देशांमध्ये लाखो भारतीय अडकले आहेत, त्यांना परत आणण्याबद्दल काहीही सूतोवाच केले नाही. तसेच आपण अमेरिका आणि इस्त्रायलशी जवळीक का साधत आहोत, याचा काय फायदा? असाही एक प्रश्न निर्माण होतो. तेव्हा आजची परिस्थिती ही भारतासाठी परीक्षा आहे.

**लता पांडे**

## सल्लागाराच्या मार्गदर्शनाने गुंतवणूक करा

शेअर बाजारात युद्धामुळे निर्माण झालेले वातावरण निराशाजनक असून मार्केट वारंवार कोसळत आहे. अशा परिस्थितीत म्युच्युअल फंड चांगला पर्याय आहे असे सांगितले जात आहे. सल्लागाराच्या मार्गदर्शनाने गुंतवणूक करावी. सोने-चांदी घेणे सध्या तरी खूपच अवघड वाटत आहे.

**उषा आवारे**


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अवकाळी पावसाने आंबा बागा व गहू पिक उद्ध्वस्त !

## डिझेल टंचाईचा गहू काढणी वर परिणाम
## शेतकऱ्यांचा आक्रोश – शासन महोत्सवात खूश

**जनमाध्यम प्रतिनिधी**





यवतमाळ - अवकाळी पाऊस, गारपीट आणि सतत ढगाळ हवामानामुळे जिल्ह्यातील आंबा पिकावर भीषण संकट कोसळले आहे. मोहोर करपणे, फळगळ, फळे तडकणे, डाग पडणे आणि करपा रोगाचा वाढता प्रादुर्भाव यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे आंबा बागायतदार हवालदिल झाले असून लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे.शासनाकडून प्रगत शेतीचे आवाहन केले जाते, परंतु निसर्गाच्या सततच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे सर्व गणित कोलमडत आहे. विदर्भात विशेषतः यवतमाळ जिल्हा हा नैसर्गिक आपत्ती आणि शेतकरी आत्महत्येसाठी आधीच कुप्रसिद्ध असताना, यंदाच्या अवकाळी पावसाने परिस्थिती आणखी गंभीर केली आहे.

तिवसा येथील अल्पभूधारक शेतकरी संजय उत्तमराव राठोड यांनी पाच एकर शेतीमध्ये दोन एकर क्षेत्रात १८ ते २० आंब्याची झाडे लावून पर्यायी उत्पन्नाचा मार्ग निवडला होता. या बागेतून दीड ते दोन लाखांचे उत्पन्न अपेक्षित होते. मात्र अवकाळी पावसाने फुलोरा पूर्णपणे नष्ट केला आणि सुमारे दोन ते अडीच लाखांचे नुकसान झाले. ही परिस्थिती केवळ एका शेतकऱ्याची नसून संपूर्ण जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांची आहे.याचबरोबर खरीप हंगामातील सोयाबीन पीक आधीच हातातून गेले आहे. रब्बी हंगामातील गहू काढणीच्या उंबरठ्यावर असताना डिझेल टंचाईमुळे हार्वेस्टर शेतात पोहोचत नाहीत. परिणामी उभे पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्ती, तर दुसरीकडे बाजारपेठेतील अनिश्चितता आणि इंधन टंचाई या तिहेरी संकटात शेतकरी पूर्णतः हतबल झाला आहे.

शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही, पिक विम्याचा लाभ वेळेवर मिळत नाही आणि नुकसानीचे पंचनामेही विलंबाने होतात. अशा परिस्थितीत शासनाची भूमिका नेमकी काय, असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. "जगावे की मरावे?" हा प्रश्न आता एका कुटुंबापुरता मर्यादित राहिलेला नसून संपूर्ण जिल्ह्याचा आक्रोश बनत आहे. म्हणूनच शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे जलद गतीने पूर्ण करावेत, शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक भरपाई द्यावी, पिक विमा योजनेचा लाभ तत्काळ वितरित करावा आणि डिझेल पुरवठा सुरळीत करावा.

तसेच कर्जबाजारी शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करणे ही काळाची गरज आहे.अन्यथा, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शेतकऱ्यांचा आक्रोश अधिक तीव्र होऊन त्याचे गंभीर सामाजिक परिणाम दिसून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## उमरखेड पोलीसांची धडकेबाज कारवाई पुणे जिल्हयातुन आरोपी अटक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड़ - 18 जानेवारी रोजी फिर्यादीने दिलेले तक्रारी वरून आरोपी नामे सागर दशरथ पवार वय 19 वर्षे रा शिंद गाव ता तुळजापूर जि धाराशिव, हे युवक उमरखेड तालुक्यातील एका गावातील मुलीला लग्नाचे अमिष दाखवून पळून नेले होते. दिनांक 18 / 1 / 2026 पोलीस स्टेशन उमरखेड येथे अप क्र 32 / 26 कलम 137 (2) हे गुन्हा नोंद करण्यात आला होता या गुन्ह्यांचा तपास सुरू केला SDR .CDR तपसणी केल्याने व गोपनिय माहितीच्या आधारे उमरखेड पोलिसांची एक टीम पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील धामणगाव जवळील ठेणा गावाजवळ गेली व एका जंगलामधून 23 मार्च रोजी सदर आरोपीला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली हि कारवाई पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शना पोलीस उपनिरीक्षक गणेश मुंडे , नरेंद्र पुंड , पोशि संदीप जाधव , पोशि विष्णु राठोड यांनी कारवाई पार पाडली.

# सहारा पार्कमध्ये ३०० ब्रास वाळू जप्त..!

## 'घरबांधणी'चा दावा, पण अवैध साठवणुकीवर प्रशासनाचा कडक इशारा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - वसंतनगर पोलीस स्टेशन हद्दीतील सहारा पार्क परिसरात तब्बल ३०० ब्रास वाळूचा अवैध साठा जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. महसूल व पोलीस यंत्रणेच्या संयुक्त कारवाईत हा साठा उघडकीस आला असून, अवैध वाळू साठवणुकीवर प्रशासनाने कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. २८ मार्च २०२६) दुपारी नायब तहसीलदार वैभव खाडे, मंडळ अधिकारी मयूर मस्के, तलाठी कामराज चौधरी व निरंजन वानखेडे यांच्या पथकाने सहारा पार्कमधील डोंगरे लेआउट येथे छापा टाकला. या कारवाईत मोठ्या प्रमाणात वाळूचा साठा आढळून आला आणि तत्काळ जप्त करण्यात आला. प्राथमिक पंचनाम्यानुसार सुमारे ३०० ब्रास वाळू असल्याचे समोर आले असताना, संबंधित अब्दुल राजीक अब्दुल रौफ यांनी मात्र हा साठा केवळ ८० ते ९० ब्रास असून तो घरबांधणीसाठी आणल्याचा दावा केला आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणातील साठ्यामुळे प्रशासनाने या स्पष्टीकरणावर संशय व्यक्त केला आहे.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकाऱ्यांच्या पातळीवर तपास सुरू करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत साठ्याची अचूक मोजणी केली जाणार असून, रॉयल्टी भरली आहे की नाही याची पडताळणी होणार आहे. अंतिम अहवालानंतर संबंधितांवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### अवैध वाळू साठवणुकीवर कारवाईची गरज अधोरेखित

पुसद शहर व परिसरात अवैध वाळू साठवणुकीचे प्रकार वाढत असल्याची चर्चा असून, या कारवाईमुळे अशा प्रवृत्तींना लगाम लागेल का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाने सातत्याने अशा कारवाया केल्यासच वाळू माफियांना आळा बसेल, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वेचक

## कला वाणिज्य महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात



राळेगाव - येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून इंदिरा गांधी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वीरेंद्र बरडे व मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल दौलत्कार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. प्रस्ताविकात प्रा. अनिल दौलत्कार यांनी कला व वाणिज्य शाखेतील 66 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असल्याची माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ. बरडे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत समाजपरिवर्तनासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.यानंतर विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सावरकर यांनी पदवी ही जबाबदारी असल्याचे सांगत उज्ज्वल भवितव्यासाठी प्रयत्न करण्याचे मार्गदर्शन केले.संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब दायदार, सचिव बापूसाहेब भोयर व कोषाध्यक्ष नितीन सरदार यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रुपेश पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. शालिनी हटवार यांनी मानले.

## सावर येथे फाजल खान बाबा संदल मिरवणूक उत्साहात



बाभूळगाव - तालुक्यातील सावर येथे सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या फाजल खान बाबा यांच्या संदल मिरवणुकीचा सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी अलीम खान यांच्या निवासस्थानावरून मिरवणुकीला प्रारंभ झाला. ढोल-ताशांच्या गजरात निघालेली मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने फिरत दर्ग्यावर पोहोचली. येथे फुलांच्या व कापडी चादरी अर्पण करून भक्तांनी दर्शन घेतले. याप्रसंगी यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर उपस्थित होते. दर्गा ट्रस्टतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मिरवणुकीत ट्रस्टचे अध्यक्ष युनूस खान पठाण यांच्यासह विविध मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, 29 मार्च रोजी दर्गा परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. विविध ठिकाणांहून आलेल्या भक्तांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष रंगत आली.

# व्हिएतनाममध्ये 'स्पंदने हदयाची' काव्यसंग्रहाचे प्रकाशन




**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : येथील नवोदित कवयित्री शीलाताई सुरेश कदम यांच्या 'स्पंदने हदयाची' या पहिल्याच काव्यसंग्रहाचे भव्य प्रकाशन व्हिएतनाममधील अ-25 लक्झरी हॉटेलच्या सभागृहात आयोजित सहाव्या विश्व आंबेडकरी साहित्य संमेलनात पार पडले. जागतिक आंबेडकरी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजित या सोहळ्याला सुप्रसिद्ध नाटककार डॉ. सुनील रामटेके अध्यक्षस्थानी होते, तर उद्घाटन ज्येष्ठ कथाकार प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. जगन कराडे, महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे, संयोजक प्रा. डॉ. अनिल काळबांडे, प्राचार्य वैशाली प्रधान, प्राचार्य राहुल मस्के, प्रा. ज्योती काळबांडे, सुरेश कदम व बाळासाहेब सरसमकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. डॉ. अनिल काळबांडे यांनी काव्यसंग्रहावर भाष्य करताना, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात वाढलेल्या शिला कदम यांच्या लेखनाला घरातील सामाजिक संस्कारांची जोड मिळाल्याने त्यांच्या प्रतिभेला उत्तुंग भरारी मिळाल्याचे सांगितले. या काव्यसंग्रहाला प्रा. ज्योती काळबांडे यांची प्रस्तावना लाभली असून लेखक चंद्रशेखर शिखरे यांनी पाठराखण केली आहे. यापूर्वीही त्यांच्या कविता विविध वृत्तपत्रे व 'मराठा मार्ग' मासिकात प्रसिद्ध झाल्या असून त्यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक संघटनांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मोघे महाविद्यालयात 'शाश्वत विकास' विषयावर राष्ट्रीय परिषद

पांढरकवडा - शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दि. १ एप्रिल २०२६ रोजी प्रिन्स पॅलेस येथे "एकविसाव्या शतकातील शाश्वत विकास" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीमुळे पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि नैसर्गिक साधन संपत्तीवर होणारे परिणाम लक्षात घेता शाश्वत विकासावर व्यापक चर्चा घडवून आणण्याचा या परिषदेचा उद्देश आहे. या परिषदेस देशभरातून सुमारे १७५ शोधनिबंध प्राप्त झाले असून विविध संशोधक आपले निष्कर्ष सादर करणार आहेत. परिषदेत शाश्वत विकासाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन व विचारमंथन होणार आहे. कार्यक्रमास माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी खासदार प्रतिभाताई पाटील, विजयराव मोघे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच डॉ. मिलिंद बारहाते व डॉ. अविनाश आवळगावकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

# जांबबाज येथे वरली-मटक्याचा बेकायदेशीर सुळसुळाट !

## पोलिसांच्या भूमिकेवर संशयचिन्ह !

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पुसद - तालुक्यातील मौजा जांबबाजार येथे गेल्या अनेक महिन्यांपासून वरली-मटका या अवैध व्यवसायाने उघडपणे डोके वर काढले असून, हा प्रकार आता चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे हा व्यवसाय चोरीछुप्या नव्हे तर सर्रास दुकाने आणि काउंटर लावून सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. या संदर्भात विविध वृत्तपत्रांतून वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. परिणामी, या अवैध धंद्याला पोलिसांची मूकसंमती आहे का, असा सवाल सर्वसामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

पुसद पासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या जांबबाजारचा समावेश पुसद ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो. मात्र, येथे मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या वरली-मटक्याच्या जाळ्यावर आळा घालण्यात पोलिसांना अपयश येत असल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित व्यावसायिक आणि काही पोलीस अधिकाऱ्यांमध्ये 'अर्थपूर्ण संबंध' असल्याची चर्चा नागरिकांत रंगू लागली आहे.वरली-मटका खेळण्यासाठी परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, या ठिकाणी लाखोंची उलाढाल होत असल्याची माहिती समोर येते. काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या व्यवसायातून हप्ता पद्धतीने पैसे वसूल होत असल्याचीही चर्चा आहे.याहूनही गंभीर बाब म्हणजे या व्यसनाच्या विळख्यात पुरुषांसोबत महिलांची संख्या वाढत असून, काही शालेय विद्यार्थीदेखील या गैरप्रकारात अडकत असल्याचे चित्र आहे. परिणामी अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडून उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. अवैध धंद्यांवर कारवाई करणे ही पोलिसांची जबाबदारी असतानाही जांबबाजारात हा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.याकडे स्थानिक गुन्हे शाखा तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पोलीस अधीक्षक, पुसद यांनी तातडीने लक्ष देऊन कारवाई करणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# इद्रप्रस्थ नगर येथील अवैध व्यवसायीक गॅस सिलेंडरच्या २१ टाक्या सह ६०,०००/- रु मुद्देमाल जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - २७/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ कॅम्प पुसद येथील पोलीस अधिकारी व अंमलदार हे पुसद उपविभागात अवैध धंदे, अवैध गॅस सिलेंडर साठवणुक, बाबत गोपनिय माहीती काढत असतांना 13/00 वाजण्याचे सुमारांस माहीती मिळाली कि, इद्रप्रस्थ नगर येथील इसम नामे-सावरलाल मथुरालाल जाट यांच्या घरी अवैध व्यवसायीक गॅस सिलेंडर साठवणुक करुन आहे अशी माहीती प्राप्त झाल्याने पुरवठा निरीक्षक पुसद तसेच पंचा सह सदर ठिकाणी छापा कारवाई केली असता इसम नामे-सावरलाल मथुरालाल जाट यांच्या घरी अवैध व्यवसायीक इण्डेन, एचपी (HP) अशा वेगवेळ्या कंपनीचे एकूण 19 गॅस सिलेंडर 19Kg तसेच 02 गॅस सिलेंडर 5kg असे एकूण 21 व्यवसायीक गॅस सिलेंडर टाक्या मिळून आल्याने इसम नामे-सावरलाल मथुलाल जाट यांचे भाउ सुरेंद्र मथुलाल जाट रा. इद्रप्रस्थनगर पुसद ता. पुसद जि. यवतमाळ याचेकडे सदरचे गॅस सिलेंडर टाक्या बाबत विचारपूस केली असता उडवाउडवीचे उत्तरे देवून कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर केले नसल्याने सदरचे गॅस सिलेंडर हे अवैधरित्या साठवणुक करुन केले असल्याने एकूण 21 गॅस सिलेंडर असा अंदाजे ६०,०००/- रु मुददेमाल जप्त करुन ताब्यात घेवून निरीक्षक अधिकारी तसेच पुरवठा निरीक्षक तहसिल कार्यालय पुसद हे योग्य ती पुढील कारवाई करीत आहे. याव्दारे सर्व नागरीकांना अहवान करण्यात येते कि, कोणीही अवैध गॅस सिलेंडरचा साठा करुन ठेवू नये तसेच अवैध गॅस साठवणुक करुन जादा दराने विक्री करु नये अवैध गॅस सिलेंडर साठा करीत असल्याचे कोणाला माहीती असल्यास त्याबाबत माहीती दयावी त्याच्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात येईल. सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता (भा. पो.से) सा, मा. अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. अशोक थोरात (म.पो.से) सा, मा. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हर्षवर्धन बी जे सा, मा. पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, मा. तहसिलदार पुसद रेखा वाणी मॅडम यांचे मार्गदर्शनात सपोनि/ धिरज बांडे, पोउपनि/शरद लोहकरे, सफौ/ मुन्ना आडे, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा/ तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा/रमेश राठोड, पोहवा कुणाल मुंडोकार, पोशि/सुनिल पंडागळे, पोउपनि रविंद्र शिरामे, पोशि/राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, निरीक्षण अधिकारी अमोल महाजन, पुरवठा निरीक्षक आशिष पवार, संगिता तेर, अव्वल कारकून छाया जामकर, लिपीक अमित अजमिरे, छाया लोंढे, गोदाम व्यवस्थापक सतिष आळणे तहसिल कार्यालय पुसद यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# महागाव शहराला विकासाची मोठी झेप..! विविध कामांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - शहरातील दलित वस्ती, जलशुद्धीकरण केंद्र संरक्षण भिंत, समाजकल्याण शाळेकडे जाणारा रस्ता तसेच इतर मूलभूत सुविधांच्या विकासासाठी राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवसेना (उबाठा) उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, माजी नगराध्यक्षा करुणा शिरबिरे व नगरसेवक सुजितसिंह ठाकुर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे.

गेल्या तीन वर्षांपासून विविध विकास कामांसाठी निधी मिळावा यासाठी प्रयत्न सुरू होते. अडचणींवर मात करत अखेर शासनाने या मागण्यांची दखल घेत निधी मंजूर केला. आमदार किसनराव वानखेडे तसेच भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही यासाठी पाठबळ दिले. लो. अण्णाभाऊ साठे दलित वस्ती योजनेअंतर्गत २ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून प्रभाग १०, ६ व १७ मध्ये विविध कामे हाती घेतली जाणार आहेत. याशिवाय शहरातील इतर विकासकामांसाठी ७ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

घनकचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण केंद्र संरक्षण भिंत आणि शाळेकडे जाणारा रस्ता यांसारखी महत्त्वाची कामे लवकरच सुरू होणार आहेत.

या निर्णयामुळे महागावच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# गणित संबोध परीक्षेत कु. जानव्ही जामकर तालुक्यात प्रथम



**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - गणित संबोध परीक्षेत एच. ई. एस. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी कु. जानव्ही मुकुंद जामकर हिने महागाव तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला. यवतमाळ जिल्हा गणित अध्यापक मंडळ द्वारे २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत महागाव तालुक्यातील हिवरा(संगम)येथील एच. ई. एस. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील वर्ग ५वी मधील विद्यार्थिनी कु.जानव्ही मुकुंद जामकर हिने प्राथमिक गटातून सुयश प्राप्त करीत तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला. तिच्या नेत्रदिपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोरेश्वर पांडे,व्यवस्थापक सतीश पांडे,मुख्याध्यापक बा. प्र.घाटगे सर,पर्यवेक्षक वि.आ.भुसारे सर, परीक्षा मार्गदर्शक शिक्षक कु. अ.यु.कांबळे मॅडम,उपाध्ये सर यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जानव्ही ने आपल्या यशाचे श्रेय आपले मार्गदर्शक शिक्षक व आई वडील यांना दिले आहे.

# टिपेश्वर ESZ मधील १५ बेकायदेशीर रिसॉर्ट्सना नोटीस..!

## अंकित नैताम यांच्या पाठपुराव्याला यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - टिपेश्वर वन्यजीव अभयारण्या लगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रातील बेकायदेशीर रिसॉर्ट्स, हॉटेल्स व कृषी पर्यटन प्रकल्पांवर वन विभागाने अखेर कारवाईचा बडगा उगारला आहे. २८ मार्च रोजी पांढरकवडा वन विभागाने १५ पेक्षा अधिक प्रकल्पांना नोटीस बजावत, जिल्हा मॉनिटरिंग कमिटीची परवानगी नसताना सुरू असलेले बांधकाम व व्यावसायिक व्यवहार तात्काळ थांबवण्याचे आदेश दिले.

नोटीसमध्ये अनेक प्रकल्प ESZ नियमांचे उल्लंघन करून परवानगीविना सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही ठिकाणी जमीन वापराची परवानगी असली तरी व्यावसायिक वापर सुरू असल्याचेही निदर्शनास आले. संबंधितांना परवानगी मिळेपर्यंत सर्व व्यवहार बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.या कारवाईसाठी ट्रायबल फोरमचे जिल्हा उपाध्यक्ष अंकित नैताम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. त्यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षकांकडे तक्रार दाखल करत पर्यावरणीय उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित केला होता. या प्रकरणाची दखल घेत आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेतही लक्षवेधी सूचना मांडली. दरम्यान, तक्रारकर्त्यांनी संयुक्त तपासणी, बेकायदेशीर प्रकल्पांवर गुन्हे दाखल करणे व संपूर्ण अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

वन विभागाच्या या कारवाईमुळे पर्यावरण संरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, पुढील काळात मोठे निर्णय अपेक्षित आहेत.

## जिल्ह्याच्या तापमानाचा पारा ३९.५ अंश सेल्सिअसवर

यवतमाळ : गत दोन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळी वातावरण होते. यामुळे वातावरणात चांगलाच उकाडा जाणवत होता. अशातच काही भागांत अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे शनिवारी वातावरणात चांगलाच बदल झाल्याचे दिसून आले. शनिवारी जिल्ह्याच्या तापमानात १.८ अंशांनी वाढ झाल्याने तापमानाचा पारा ३९.५ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. उन्हाची दाहकता दिवसेंदिवस वाढत असल्याने शहरातील चौकाचौकात थंडपेयाची दुकाने विक्रेत्यांनी थाटली आहे. अशातच वीजपुरवठाही खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे.

# अतीक अफजल शेख यांची यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - महा मायनॉरिटी NGO फोरमच्या वतीने हज हाऊस, मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय NGO कॉन्फरन्स व अल्पसंख्यांक समाज विकास परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेत सामाजिक कार्याची दखल घेत अतीक अफजल शेख यांची यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली.

संस्थापक अध्यक्ष जाकीर शिकलगार व अब्दुल बारी यांच्या हस्ते शेख यांना नियुक्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांची विशेष उपस्थिती होती. राज्यातील 36 जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरली. उपस्थित मान्यवरांनी शेख यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळ जिल्ह्यात अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. परिषदेमुळे सामाजिक कार्याला नवी दिशा मिळणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# झेडपी शाळांचा होणार कायापालट

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत समावेश
## पाच तालुक्यातील शाळांना प्राधान्य

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' योजनेच्या पुढील टप्प्यात अमरावती जिल्ह्यातील तब्बल ८ शाळांची निवड करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने २७ मार्च २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जाहीर केला. राज्यातील एकूण ४०५ शाळांना या टप्यात आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मंजुरी देण्यात आली असून त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शाळांचा समावेश आहे.

### दर्जेदार शिक्षणाची संधी



दरम्यान, या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्लक्षित भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार असून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक प्रशासनाने योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.शासनाच्या या निर्णयाचे प्राथमिक शिक्षक समितीने स्वागत केले आहे.पण या प्रमाणे इतर शाळेचा सुध्दा विकास करावा तसेच भौतिक सुविधा पुरवण्यात याव्यात यामुळे ग्रामिण भागातील जिल्हा परिषद शाळा टिकतील आणि ग्रामिण भागातील विद्यार्थी दर्जेदार,सुविधा असल्याचा लाभ घेतिल आणि पालकाचा ओढा वाढेल,पटसंख्या वाढेल अशी अपेक्षा आहे.

**राजेश सावरकर,**
राज्य प्रसिध्दी प्रमुख,म.रा.प्राथमिक शिक्षक समिती

अमरावती जिल्ह्यात चांदुर बाजार,मोर्शी,वरुड,चांदुर रेल्वे,अमरावती,मनपा अम या तालुक्यांतील शाळांना प्राधान्य देण्यात आले आहे. या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देताना पायाभूत सुविधा, स्वच्छतागृह, पिण्याचे शुद्ध पाणी, डिजिटल शिक्षण साधने तसेच विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र 'पिंक रूम'ची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात एक शाळा 'क्रीडा प्रबोधिनी' म्हणून विकसित करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले असून,अमरावती जिल्ह्यातही या अंतर्गत क्रीडा सुविधा वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

क्रीडा प्रबोधिनी संकल्पना या योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वतंत्र नियोजन आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निधी उपलब्ध करून देत टप्प्याटप्प्याने कामे पूर्ण केली जाणार आहेत., दरम्यान, या निर्णयामुळे अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्लक्षित भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल अपेक्षित आहे.

### 'पिंक रूम' म्हणजे काय?

शाळांमध्ये इयत्ता सातवीपासूनच्या पुढील मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज विश्रांती कक्ष, मासिक पाळीदरम्यान स्वच्छता व आरोग्याची काळजी घेण्यासाठी सुविधा, सॅनिटरी नॅपकिन, डिस्पोजल यंत्रणा व स्वच्छ पाण्याची उपल उपलब्धता,मुलींमध्ये आत्मविश्वास वाढविणे व शाळेत उपस्थिती टिकविण्यावर भर देण्यात येणार आहे.

### या शाळांचा समावेश

जि.प.शाळा कारंजा बहीरम चांदुर बाजार,खेड मोर्शी,गव्हाणकुंड वरुड,नेरपिंगराई मोर्शी,माहुली जहागीरी अमरावती,शिरजगाव कसबा चांदुर बाजार, तसेच शासकीय विद्यानिकेतन मनपा अम.व झेडपी हायस्कूल चांदुर रेल्वे या शाळांचा समावेश आहे.

### योजनेतून मिळणाऱ्या सुविधा

-इयत्ता १ ते १० पर्यंत शिक्षणाची सोय
-आधुनिक वर्गखोल्या व डिजिटल शिक्षण
-मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
-शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
-विद्यार्थिनींसाठी 'पिंक रूम'

# एकाच दिवशी पोहरा जंगलासह तीन ठिकाणी आग

**अमरावती/का.प्र.**

पोहरा येथील जंगलात शनिवार, २८ मार्च रोजी दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना उघडकीस आली. आग मोठी असल्याने महापालिकेच्या अग्निशमन मुख्यालयासह प्रशांतनगर उपकेंद्रातील अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले होते. दरम्यान, तापमानाचा पारा वाढला असल्याने आगीच्या घटना वाढत असून शनिवारी एकाच दिवशी तीन ठिकाणी घटना घडल्या.

अग्निशमन मुख्यालयातील पाळी प्रमुख किशोर शेंडे व केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या आदेशानुसार अग्निशमन दलाचे पथक तातडीने पोहरा जंगलात रवाना झाले. मात्र, आगीचा वणवा वाढल्याने आग नियंत्रणात येत नव्हती. त्यामुळे प्रशांतनगर उपकेंद्र येथूनही आणखी एक फायर लॉरी बोलाविण्यात आली. जवळपास एक ते दीड तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर पूर्णतः नियंत्रण मिळाले. फायरमॅन योगेश सावळे, सुमेध इंगोले, मनीष तंबोले, सागर माकोडे यांच्यासह वाहनचालक कासम खान, जावेद खान, साबीर खान यांनी ही आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. याशिवाय यशवंत लॉन साईनगर येथेही एका वडाच्या झाडाला आग लागली होती. त्यामुळे फायरमॅन गोकुळ मुंडे व वाहनचालक गोपाल भोकरे यांनी घटनास्थळी जाऊन आग विझविली.

जिल्हा शल्यचिकित्सकांच्या शासकीय बंगल्यातील आतील झाड-झुडुपांनाही आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. अर्धा तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर पूर्णतः नियंत्रण मिळाले. फायरमॅन आशीष चव्हाण, प्रणित पेठे व वाहनचालक गणेश राठोड यांनी ही आग आटोक्यात आणली.

# ऊर्जा परिवर्तनातून स्वस्त,शाश्वत विजेकडे वाटचाल

## महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा परिवर्तनाद्वारे विद्युत क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. त्यातून स्वस्त व शाश्वत विजेकडे वाटचाल सुरु झाली आहे. या कामगिरीचा सन्मान म्हणून नवी दिल्ली येथे शनिवारीस्कोच समूहाच्या वतीने महावितरणला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यकारी संचालक भुजंग खंदारे व कार्यकारी अभियंतारोहित जोगदंड यांनी हा पुरस्कार स्विकारला.



महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे. यात सन २०२९-३० पर्यंत सर्व वर्गवारीतील वीज दर कमी करण्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅनला अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत.ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांची 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' सुरु करण्यात आली. या योजनेतून ११ लाख ५६ हजार आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून ८ लाख ८० हजार अशा एकूण २० लाख ३६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ५ लाख २ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १९०४ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे व त्यांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

धामणगाव मतदार संघातील

# २४१ पाणी पुरवठा योजनेवर बसणार सोलर युनिट

## आ.प्रतापदादा अडसड यांचा पाठपुरावा;वीज बिलापासून मिळणार मुक्ती

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

तिन्ही तालुक्यातील जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्याची प्रक्रिया सुरू होणार असून आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.दरम्यान आता या पाणीपुरवठा योजना वीज बिलापासून मुक्त होणार आहे

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघात धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर हे तीन तालुके येत असून, तालुक्यातील ग्रामीण भागात जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहे. सदर पाणी पुरवठा योजनेचे विद्युत देयके ग्राम पंचायतीला मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे ग्राम पंचायत कडून ती देयके भरणे शक्य होत नाही काही ठिकाणी थकीत वीज देयकामुळे पाणीपुरवठा विद्युत खंडित करण्यात येते.

नांदगाव खंडेश्वर ११३, चांदूर रेल्वे ७६ ,धामणगाव रेल्वे तालुक्यातील ५२ जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्या साठी आमदार



प्रतापदादा अडसड यांनी राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत आगामी काळात तिन्ही तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्यात येणार आहे यासाठी प्रशासन स्तरावर ही प्रक्रिया सुरू आहे.

आमदार प्रतापदादा अडसड यांनी धामणगाव मतदार संघातील पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्यासाठी पुढाकार घेतल्याने तिन्ही तालुक्यातील सरपंच, उपसरपंच तसेच ग्रा.प सदस्य व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहे.

### प्रत्येक शासकीय कार्यालयावर आता सोलर युनिट

तिन्ही तालुक्यातील ग्रामपंचायत, तहसील कार्यालय ,पंचायत समिती, नगरपरिषद ,आयटीआय तालुका कृषी अधिकारी कार्यालय, एस डी ओ कार्यालय ,तसेच सर्व प्रशासकीय कार्यालयावर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मेढा मधून सोलर युनिट बसविण्यासाठी आमदार प्रतापदादा अडसड यांनी पुढाकार घेतला आहे ही प्रक्रिया धामणगाव मतदार संघात युद्ध स्तरावर राबविण्यात येत आहे. आगामी काळात या शासकीय कार्यालयावर सोलर युनिट बसविण्यात येणार असल्याने विज बिला पासून मुक्ती मिळणार आहे.

# भूतदयेतून साकारली 'पक्षांची पाणपोई'

## ज्ञानोदय विद्यामंदिरातील सहावीच्या विद्यार्थ्याचा अभिनव उपक्रम

**चांदूरबाजार/वार्ताहर**

उन्हाळ्याची चाहूल लागली की, माणसांसाठी सर्व दूर पाणपोई लावल्या जातात. बस स्थानक असो,की सार्वजनिक चौक.पाणपोई सुरू केल्या जाते. या पाणपोया कुठे सामाजिक,तर कुठे राजकीय असतात.त्यामुळे त्यांचे उद्धघाटन ही दणक्यात केल जात.मात्र मुक्या पक्षांच्या दाणा-पाण्याचा, सर्वांनाच सोईस्कर विसर पडतो. याला अपवाद ठरले ते,भक्तिधामच्या ज्ञानोदय विद्यामंदिरातील वर्ग सहावीचे विद्यार्थी.या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून, चक्क 'पक्षांची पाणपोई' साकारली.



या शाळेतील विद्यार्थ्यांना गीता,ज्ञानेश्वरी, संत श्री गुलाबराव महाराजांच्या अध्यात्मिक विचारांचा स्पर्श झाला आहे. गीता पठण करतांना गीतेतील,'ममै वांशो जीव लोके'. हे भगवंतांनी अर्जुनाला सांगीतलेले शब्द या विद्यार्थ्यांचे मनात होतेच.या शब्दांचा अर्थ म्हणजे, हे अर्जुना या पृथ्वीतलावरील प्रत्येक जीव हा माझाच अंश आहे.मग काय ?. हे पक्षी ही आपल्या सारखे परमेश्वराचाच अंश आहे.तर मग चैत्र व वैशाखाच्या रखरखत्या,या मुक्या पक्षांच्या दाणा-पाण्याची व्यवस्था करणे.ही आपली जबाबदारी आहे.याची जाणीव या विद्यार्थ्यांना झाली. या विद्यार्थ्यांनी पक्षांच्या पाणपोईची प्रेरणा घेतली ती,मराठीच्या पुस्तकातील पाणपोई या कवितेतून.

सहावीच्या अ,ब,क या तीन ही वर्गातील विद्यार्थ्यांच्या, या प्रेरणेला साकार रूप दिले ते मराठी च्या शिक्षिका मयुरी तट्टे यांनी.त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये पक्षा विषयी प्रेम,दया,तसेच पर्यावरण संरक्षण या विषयी जागृकता पुर्वक जाणिव निर्माण केली. विद्यार्थ्यांना पक्षांसाठी चारा व पाण्याची भांडी, कल्पकता पूर्वक घरीच कशी तयार करायची याबाबत मार्गदर्शन केले.त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपली कल्पनाशक्ती वापरून,पक्षांसाठी सुंदर अशी चारा व पाण्याची भांडी तयार केली.सहावीच्या विद्यार्थ्यांनी पक्षांसाठी केलेली,पाणी व चार्याची भांडी पाहून संपूर्ण शाळाच आश्चर्यचकित झाली.विद्यार्थ्यांच्या याच भूतदयेतून निर्माण झाली ती 'पक्षांची पाणपोई'. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका महानंदा खांडे व उप मुख्याध्यापक संदीप भुयार यांनी ही प्रोत्साहन दिले.

शाळेतील सहाव्या वर्गातील ११० विद्यार्थ्यांनी, पक्षांची पाणपोई या उपक्रमात सहभाग घेतला.या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या घरी,घराच्या परिसरात व शाळेच्या परिसरात, पक्षांसाठी पाणपोई सुरू केली.तसेच या पाणपोईच्या माध्यमातून पुढील दोन महिने,पक्षांना चारा व पाणी पुरविण्याची जबाबदारी ही स्विकारली.ज्ञानोदय विद्यामंदिरातील वर्ग सहावीच्या विद्यार्थ्यांचा, हा स्तुत्य व अत्यंत उपयोगी उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

## संक्षिप्त

### किसान, कामगार परिषद ३ एप्रिलला होणार

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या अमरावती शाखेतर्फे आगामी शुक्रवार, ३ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता किसान कामगार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद नमूना गल्ली चार स्थित भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयात होईल.

यावेळी 'भारत अमेरिका व्यापारी करार' या विषयावर प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. महेंद्र मेटे मांडणी करतील. यावेळी भाकप व किसान सभेच्या जिल्हा कौन्सिल, तालुक्का कौन्सिल आणि शाखा कौन्सिलच्या सर्व पदाधिकारी-सदस्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन किसान सभेचे जिल्हाध्यक्ष सतीश चौधरी आणि बांधकाम कामगार परिषदेचे पदाधिकारी राजेंद्र भोगे यांनी केले आहे.

### महावीर जयंती निमित्त आरोग्य तपासणी व औषधी वाटप

**अमरावती-**येथील मध्यवर्ती कारागृहात श्री भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्याने कैदी बांधवांची आरोग्य तपासणी करून औषधाचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम दिगंबर जैन महासमितीचे विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी यांच्यातर्फे आयोजित केले होत.या कार्यक्रमाचे अध्यक्ष कारागृह अधिक्षिका किर्तीताई चिंतामणी तर्फे अतिरिक्त अधिक्षक विलास भोईते तर प्रमुख अतिथी सर्वश्री डॉ. संदीप राव मुळव्याध,फिशर, भागदर तज्ञ, डॉ हितेश गुल्हाने किडनी विकार तज्ञ, डॉ स्वानंद लुंगे मधुमेह, हृदयरोग तज्ञ, डॉ जी बी चरपे एम डी, अभिनंदन पेंढारी, दिगंबर जैन महासंमिती चे उपाध्यक्ष उल्हास क्षिरसागर,प्रशांत गडेकर, शितल सिघवी,मनिष नानोटी एम आर, मंगेश जांभुळकर फार्मशिष्ट, डॉ मोहमद राजिक उपस्थित होते. अतिथीचे स्वागत अभिनंदन पेंढारी यांनी केले. कारागृहात बंदीजनासाठी आरोग्य तपासणी व औषधी वाटप करण्याचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे ही भुषणावह बाब आहे. अभिनंदन पेंढारी कारागृहात त्यांनी आजवर अनेक उपक्रम राबविले आहे गुरु महाराजांचे प्रवचन,उपदेश,रोग निदान शिबीरे, प्रबोधन आदी कार्यकम केले आहे. ह्यातुन अमरावतीतील नामवंत वैद्यकीय तज्ञ डॉक्टरर्स नी येऊन कैदी बांधवांची तपासणी केल्याबद्दल आभार व्यक्त केले कार्यक्रमाचे संचालन अभिनंदन पेंढारी तर आभार उल्हास क्षीरसागर यांनी केली यावेळी अंकुश कळसकर, ऋषिकेश काळे, संतोष राव,निकिता काळे, चेतन कडू,व कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


### तनसुखदास राठी विद्यालयात लसीकरण कार्यशाळा

**कुऱ्हा-**श्री.गणेशदास राठी छात्रालय समिती अमरावती द्वारा संचालित श्री. तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा येथे एचपीव्ही कार्यशाळेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षा शुभांगी कांडलकर होत्या. प्रमुख अतिथी म्हणुन विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय पाचंगे तसेच मंगेश भालेराव, आशा वर्कर अरुणा वानखडे, किरण टिंगणे, वंदना वाघमारे, कांता तालन, माया वाघमारे, विजया पुसाम व्यासपिठावर उपस्थित होते. व लसीकरण कार्यशाळेला मुख्य मार्गदर्शक म्हणुन प्राथमिक आरोग्य केंद्र वऱ्हा येथील वैद्यकीय अधीकारी डॉ. दीपाली थेटे लाभलेल्या होत्या. कार्यक्रमाची सुरवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.आपल्या प्रास्ताविकातून सचिन पांडे (क्रीडा शिक्षक ) यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात आरोग्य तपासणी करणे अंत्यत आवश्यकआहे. नियमित तपासणीने तसेच लसीकरण केल्यावर गंभीर आजारावर आपल्याला मात करता येते. असे मत व्यक्त केले. डॉ. दीपाली थेटे यांनी एचपीव्ही लसीकरण १४ ते १५ वर्षाच्या वयोगटातील मुलींसाठी असून त्यांचे लसीकरण करणे अति आवश्यक आहे. या लसीकरणा मूळे HPV संसर्ग आणि त्यामुळे होणारा धोका ९०% पेक्षा जास्त कमी करता येतो.मुलींचे कर्करोगापासून तसेच इतर होणाऱ्या आजारापासून पूर्णतःहा संरक्षण होते . आणि त्यांचे आरोग्य उत्तम राहते. या लसीचे किमान दोन डोस महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांच्याकडून शालेय स्तरावर मुलींना विनामूल्य स्वरूपात दिले जातात. याबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून शुभांगी कांडलकर यांनी लसीकरणाचे महत्व इतर पालकांना पटवून दिले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजन सुरेंद्र गणोरकर व रत्नप्रभा डोंगरे यांनी केले होते. आभार डोंगरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व इयत्ता ९ वी च्या सर्व विद्यार्थिनींनी मोलाचे परिश्रम घेतले.

# भरधाव ट्रॅव्हल्सच्या धडकेत माजी ग्रा.पं.सदस्याचा मृत्यू

## तिवसा पंचवटी चौकातील घटना

**तिवसा/वार्ताहर**




रोड ओलांडत असलेल्या एका ७२ वर्षीय वृद्ध माजी ग्रामपंचायत सदस्याचा भरधाव ट्रॅव्हल्सने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना आज(ता.२९)रोजी तिवसा येथील पंचवटी चौकात सकाळी १० वाजताचे सुमारास घडली.

बाबाराव वामन थोरात(वय ७२,रा.तळेगांव ठाकूर,तिवसा) असे अपघातात ठार झालेल्या वृद्धाचे नाव आहे.बाबाराव थोरात हे तळेगांव ठाकूर ग्रामपंचायतचे माजी सदस्य असून आज सकाळी ९ वाजताच ते गावातून डवरगाव येथे नातेवाईकाकडे जाण्यासाठी घरून निघाले होते.दरम्यान तिवसा येथील पंचवटी चौकातून सकाळी १० वाजताचे दरम्यान ते पोहचले व रोड ओलांडत असतांना नागपूरकडे भरधाव जाणाऱ्या ट्रॅव्हल्सची त्यांना धडक बसली.या धडकेत त्यांचा घटनास्थळीच जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर ट्रॅव्हल्सने घटनास्थळावरून पळ काढला.तिवसा पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी दाखल होत ठार झालेल्या वृद्धास रुग्णवाहिकेच्या मदतीने तिवसा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता दाखल केले.पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# जळो तयाची संगती !

**ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करूनी म्हणती साधू ।।**
**अंगी लावुनिया राख । डोळे झाकुनिया करती पाप ।।**
**दाखवुनिया वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।**
**तुका म्हणे सांगो किती । जळो तयाची संगती ।।**



संत तुकाराम महाराज आपल्या अभंगवाणीतून पाखंडी समाजाची कानउघडणी करतात. कुकर्म करून साधू ,संत, महंत, महाराज म्हणून मिरवणारे या जगात खूप निर्माण झाले आहे. दिवसा जनासमोर साधू बनण्याचा आव आणायचा आणि मागे मात्र कुकर्म करायचे,असे यांचे जीवन बनलेले असते. एकीकडे वैराग्य, सज्जनपणाचे सोंग मिरवायचे आणि अशा अंध झालेल्या भक्तांच्या मागे विषय सोहळा उपभोगायचा अशा तथाकथित भोंदूबाबांच्या नादी लागून त्याची संगत करून काही फायदा होणार नाही. कुणाचे भले होणार नाही अश्या संगतीला आग लागो असे संत तुकाराम महाराज १६ शतकात भोंदू गिरी विरुद्ध समाजाला जागे करण्याचे काम करतात. आज यांत्रिक व संगणकीय युगात वावरत असताना आजही मोठ्या श्रद्धेने प्रत्येक धर्मात, पंथात असे पाखंडी निर्माण झाले आहे. हे स्वत: शिक्षित असून ते समाजाला एका कर्मकांडी वृतीकडे घेवून जातात आणि शिकला सवरलेला वर्ग जातो तरी कसा?

सध्या विवेकी महाराष्ट्रात धार्मिक विधीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात नावाच्या नराधमास अटक केल्या पासून त्याचे नवनवे प्रताप बाहेर पडत आहे.अंकशास्त्रातून खरात लोकांना त्यांचे भविष्य सांगत असे. यामुळे त्यांच्या भक्तांमध्ये राजकारणी, प्रथम श्रेणी अधिकारी मोठमोठे उद्योजक, डॉक्टर अशी मंडळी त्याच्या दरबारात जात होती. शिकलेली व धनसंपन्न असलेली माणसे ही त्याची भक्त होती. सर्वसामांन्य माणसांना तो विचारत सुद्धा नव्हता. ज्यांना अंधश्रद्धा कळते व आपल्या बाबत काय घडतंय हे माहित असताना त्याच्या शिकारी जाळ्यात अडकले गेले. विकृत खरात सारखे अनेक महाभाग समाजात उघड माथ्याने वावरत आहेत.

अनेक धर्मातील धर्मांचे ठेकेदार हे भक्तांची पिळवणूक कशी करतात, याची अनेक उदाहरणे आहेत. ईश्वरी चमत्कार, भूत पिशाच्च, जादूटोणा करणी, नरबळी सारखे प्रकार घडत असतात. अनेकदा धार्मिक स्थळी चेंगराचेंगरी होऊन अनेक भाविकांचा मृत्यू झाला आहे. उत्तरप्रदेशातील हाथरस येथील जुलै २०२४ ची घटना सत्संगाला गेलेल्या ११५ जणांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाला. अशा घटना महाराष्ट्रातही घडल्या आहेत. या बरोबर अंगात येणे अशा अंधश्रद्धा आजही पाहायला मिळतात. अनेक बाबा, बुवा, महाराज लोकांना चमत्कार झाल्याचे सांगून किंवा स्वतःच्या स्वप्नात देवांनी येऊन दर्शन दिल्याचे सांगत श्रद्धाळू लोकांना ते फसवत असतात. अनेक महाराज हे स्वतःला ईश्वरी अवतार म्हणत असतात. ते स्वतःच्या चमत्काराची पोथी, पुराणे भटाकडून लिहून काढून त्याची पुस्तके भक्तांना देत त्याची पारायणे करायला लावतात. असे भक्त त्या गुरूच्या आदेशावरून वाटेल तेवढे धनदान करत असतात.

जो पर्यंत समाज आध्यात्माकडे डोळस प्रवृत्तीने पाहत नाही तो पर्यंत त्याचे डोळे उघडणार नाही. असा अंध झालेला भक्त कर्मकांडांच्या आहारी गेल्याशिवाय राहणार नाही. भारत देशात अनेक जाती, धर्म, पंथ व संप्रदाय अस्तित्वात आले. मागील शतकापर्यंत त्यांनी समाज प्रबोधनाचे कार्य केलेलं दिसून येईल पण आज सऱ्हासपणे अंधभक्तांसाठी एक पाखंडी वर्ग जन्माला येत आहे. असा वर्ग सत्संग करताना अनेक संत,महात्म्यांचे सद्गुणांचे दाखले देत असतो. असेच दाखले देता देता एक एक अंधभक्त जोडीत जातो. असा जोडलेला भक्त या साधूची महिमा सांगत गावभर हिंडत असतो. अश्या बुवांनी समाजाला पाखंड व कर्मकांडा पासून रोखण्याऐवजी ते कसे अंधश्रध्दाळू होतील, आपले अवडंबर कसे प्रस्तापित होईल यावर भर दिला जातो. सन्यास घेणाऱ्याचा सर्व इंद्रियांवर ताबा असला पाहिजे. त्याच्या कडे जीर्ण भगवे वस्त्र, हातात कमंडलू व भिक्षापात्र असले पाहिजे. सध्या विमान, हेलिकॉप्टर, अलिशान गाड्यातून येत असतात. त्यांचा हा बडेजाव पाहून भक्त गोळा होतात. त्यांचा एक संप्रदाय निर्माण करतात. हळूहळू यातून एक मोठा अनुयायी वर्ग निर्माण होतो. असा वर्ग संत साधुच काय देवसुद्धा या बाबांच्या पुढे गौण आहे असे ठणकावून सांगत उर बडवत हिंडत असतात.

१७ शतकातील जनकवी राम जोशी यांनी सुद्धा भोंदूगीरीवर प्रहार केले आहे. सरळ सरळ त्यांनी मठाची उठाठेव का करता असा सवाल त्यांनी आपल्या काव्यातून केला आहे. अगदी स्वतःला रंगवून साधू वेष धारण करून हरीचे नाव घेत जनाला फसवत आहे. अशी माणसे गळ्यात तुलसीच्या माळा घालून जगात मिरवीत असता. आतून तुम्हाला ईश्वर समजला नाही, तो या जगाच्या कल्यानाचा विचार करू शकत नाही. कपाळी गंधटिळा लावून, अंगाला राख फासून बिळात जप करणाऱ्यांच्या अंगी शिळा अर्थात दगड पडो, भगवंत भक्तीचा भुकेला आहे. अश्या साधूंना खरेतर कशात धर्म आहे. कर्म काय कळत नाही. रामजोशी एवढ्या प्रखरतेने सांगतात की अश्या मठातून कर्म नव्हेतर कर्मकांड शिकवली जातात. यांना वेळीच रोखले पाहिजे.

जादूटोणाविरोधी कायदा २०१३ लागू झाल्यापासून महाराष्ट्र राज्यात २ हजार भोंदूबाबांवर गुन्हे दाखल करण्यात राज्यशासनाला यश आले आहे. या भोंदूनी अनेक सामान्य लोकांना ठगवले आहे. कुणाला लग्न जमत नाही, मुलबाळ होत नाही, शेतजमीन ताबा मिळत नाही, भूत-पिशाच्च काढणे, गुप्त धनाची लालसा, नरबळी, पशुबळी, याशिवाय पुत्रप्राप्तीसाठी स्मशानातील राख खायला लावणे, मूत्र पाजणे असे अनेक माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना घडल्या आहेत.

याशिवाय लहानमुलांचा बळी देणे, कासव व मांडूळ यांची होत असलेली तस्करी ही आधुनिक विज्ञानवादी पिढीची शोकांतिका आहे. अशा अनेक घटना असताना लोक अशा मेळाव्यांमध्ये गर्दी करतात आणि त्यातून अशा मोठ्या दुर्घटना घडतात. काही भोंदू धर्मगुरू आता तुरुंगात सडत आहेत. त्यांचे भक्त इकडे त्यांचे निर्दोषपणाचे दाखेले देत असतात.

‘गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला’ असे भजन-कीर्तन करत अगदी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन जनजागृतीचे विलक्षण लोकशिक्षणाचे कार्य संत गाडगेबाबा यांनी केले. देव देवळात नसते, देवळात पुजाऱ्याचं पोट असते..! देवळात जाऊ नका, मूर्तीपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवर्षी, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका, असे प्रबोधन करत गाडगे बाबा महाराष्ट्र भर फिरले या आडाणी माणसांनी शिक्षणाची महती सांगितली. त्यांनी देव दीनदुबळ्यांच्या सेवेत आहे. स्वच्छतेत आहे हे सांगून जग शहाणे केले. त्यांच्या विचारांचा विसर आज जनतेला पडला आहे. हे दुर्दैव

धर्म, संस्कार, संस्कृतीचा खोटा झेंडा हाती घेवून भक्तीचा बाजार मांडणारे व ठगवणारे बुवा बाबा महाराज यांची संख्या काही कमी नाही. कांड व कुकर्म करून ते प्रसिद्धी जोतात येतात. ऋषी, साधू, संत व देवभूमी असलेल्या या भूमीवर असले अवतारी जन्मतात कसे, जन्मले तर त्यांना राज्यकर्ते, राजसत्ता, धर्मसत्ता अशांना थारा देतात्तच कसे. अनेकदा राजसत्ता सत्तेत येण्यासाठी असे धार्मिक स्तोम माजवनाऱ्यांना जवळ करुन त्यांना कायद्याचे संरक्षण देतात. सध्या जेलमध्ये अनेकांचे गुरु, महाराज आदर्श असलेली व्याभिचारी, बलात्कारी आणि स्त्रीयांचा अपमान करणारे आहेत.

असे चारित्र्यहीन लिंगपिसाट मंडळी जेल बाहेर सुटल्यावर पुन्हा अनुयायी भेटतातच कसे हेच कळत नाही.



**विठ्ठल वळसे पाटील**
पुणे - ८४८४०६६०४२

---

## पुण्यनगरीत घुमणार
# हिंदू राष्ट्राचा जयघोष!

**पुणे**, मुंबईपासून ते अहिल्या नगरपर्यंत आज लव्ह जिहाद, वक्फ बोर्डाचे अतिक्रमण आणि सुरक्षिततेचे प्रश्न गंभीर झाले आहेत. केवळ इंस्टाग्राम, फेसबुकवर संताप व्यक्त करून या समस्या सुटणार नाहीत. यासाठी गरज आहे ती ‘संघटित हिंदू शक्तीची’. हीच शक्ती प्रकट करण्यासाठी आणि प्रखर विचारांचा हुंकार ऐकण्यासाठी आमदार टी. राजासिंह, सद्गुरु स्वाती खाड्ये आणि सुनील घनवट यांच्या उपस्थितीत ५ एप्रिलला हडपसर येथे भव्य सभा होत आहे.

एकीकडे गोहत्या आणि अवैध पशुवधगृहांचे जाळे विस्तारत आहे, तर दुसरीकडे पुण्यात हजारो बांगलादेशी घुसखोरांची उपस्थिती सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. वक्फ कायद्याचा आधार घेऊन ऐतिहासिक बारव, देवस्थानच्या जमिनी, अगदी जिल्हाधिकारी कार्यालय आणि महापालिकेच्या जागांवरही दावे सांगितले जात आहेत. जर सरकारी जमिनी सुरक्षित नसतील, तर उद्या सामान्य नागरिकांच्या घरांचे काय? हा प्रश्न आज प्रत्येकाला सतावतो आहे.

‘अर्बन नक्षली’ टोळीकडून जाणीवपूर्वक हिंदू सण आणि परंपरांना लक्ष्य केले जात आहे. हिंदूंच्या श्रद्धास्थानांवर आघात होत असताना आणि मंदिरे असुरक्षित असताना, हे तथाकथित बुद्धिवंत मात्र सोयीस्कर मौन बाळगतात. चित्रपट आणि जाहिरातींतून होणारे देवी-देवतांचे विडंबन थांबवण्यासाठी हिंदूंना ‘धर्मशिक्षण’ मिळणे अनिवार्य झाले आहे. १९४७ मध्ये अल्पसंख्याक असलेली लोकसंख्या आज ज्या गतीने वाढत आहे आणि ‘पी.एफ.आय.’ सारख्या संघटना भारताला इस्लामिक राष्ट्र बनवण्याचे जे स्वप्न पाहत आहेत, ते हाणून पाडण्यासाठी हिंदूंनी आता छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल्य अभिमान डोळ्यांसमोर ठेवून संघटित व्हायला हवे.या सर्व राष्ट्रीय आणि सामाजिक संकटांना उत्तर देण्यासाठी आणि हिंदूंना संघटित करण्यासाठी हिंदु जन-जागृती समितीने पुण्यात ‘हिंदू राष्ट्र-जागृती सभा’ आयोजित केली आहे.

**अपर्णा जगताप**

---

# ‘एक्सपायरी डेट’

**उ**त्पत्ती, स्थिती आणि लय हे प्रत्येकासाठी लागू असते. जे जन्माला आलेले आहे किंवा ज्याची निर्मिती झाली आहे त्याला लय म्हणजे अंत निश्चित आहे मग ती कोणतीही वस्तू असली तरी नियमात पालट होत नाही. भेद इतकाच असतो की त्यांच्या स्थितीचा कालावधी वेगवेगळ्या असू शकतो.उत्पादक आस्थापन जेव्हा एखाद्या वस्तूवर उत्पादन आणि मुदत यांचा दिनांक टाकतो तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की त्या ठराविक दिवसापर्यंत त्यातील घटक सुरक्षित, प्रभावी आणि खाण्यायोग्य असतात पण एक्सपायरी डेट (मुदत संपणार असल्याचा दिनांक) उलटून गेल्यावर अन्नपदार्थात सूक्ष्म जीवांची वाढ होऊ शकते किंवा रासायनिक प्रक्रिया होऊन ते पदार्थ विषारी बनू शकतात.

औषधांच्या संदर्भात एक्सपायरी नंतर त्यांची तीव्रता कमी होते किंवा त्यांचे रूपांतर घातक रसायनात होऊ शकते. काही लोकांचा असा समज असतो की एक्सपायरी डेट उलटल्यानंतरही काही दिवस या वस्तू वापरता येतात. तांत्रिकदृष्ट्या काही कोरड्या पदार्थांच्या संदर्भात थोडी सवलत असू शकते परंतु प्रक्रिया केलेले अन्नघटक (प्रोसेस फुड) संदर्भात हा विचार अत्यंत धोकादायक आहे. हा दिनांक म्हणजे सुरक्षिततेची अंतिम सीमा आहे त्याचे उल्लंघन करणे म्हणजे स्वतःच्या आरोग्याशी जुगार खेळण्यासारखे आहे. भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण या सर्वांवर नियंत्रण करते. काही दिवसापूर्वी जयपुर (राजस्थान) येथे एक्सपायरी डेट उलटून गेलेली अमूल या नावाजलेल्या आस्थापनाची तब्बल दीड लाख किलो दुग्धजन्य उत्पादने जप्त करून नष्ट करण्यात आली . सणावारी दुग्धजन्य पदार्थांची मागणी जास्त असते.अनेकदा गोदामांमध्ये पडून राहिलेल्या माल फेकून देण्याऐवजी रसायनांचा वापर करून त्याची दुर्गंधी घालवली जाते. नवीन स्टीकर लावून किरकोळ बाजारात तो माल पाठवला जातो. त्याचा थेट परिणाम विषबाधा, यकृताचे आजार आणि दीर्घकाळात कर्करोगासारख्या व्याधींमध्ये होऊ शकते. नफेखोरीचा काळाबाजार करणारे अनेक लहान मोठी आस्थापने



असे कृत्य करतात. कायद्याने हा गुन्हा असून भेसळयुक्त किंवा कालबाह्य अन्य विकल्यास जन्मठेपेपर्यंत शिक्षेचे आणि दहा लाख रुपये पर्यंतच्या दंडाचे प्रावधान आहे. परंतु प्रत्यक्ष कार्यवाहीची आकडेवारी पाहता चित्र फारसे समाधानकारक नाही.

वार्षिक अहवालानुसार सहस्त्र नमुने पडताळले जातात त्यापैकी २५ ते ३० टक्के नमुने निकृष्ट असतात पण दोषींना प्रत्यक्ष कारावासाची शिक्षा झाल्याच्या घटनांची टक्केवारी अत्यंत अल्प आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये केवळ दंड भरून गुन्हेगार मोकळे होतात.एक्सपायरी डेट शी खेळणे म्हणजे थेट मानवी आयुष्याशी खेळणे आहे. जेव्हा मोठ्या आस्थापनांच्या संदर्भात असे काही घडते तेव्हा विश्वासाला तडा जातो आणि सामान्य माणसाचा यंत्रणे वरील विश्वास उडतो. सरकारने केवळ नमुने गोळा करण्यापुरते मर्यादित न राहता अशा प्रकरणांमध्ये जलद गती न्यायालयाद्वारे त्वरित निकाल लावून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. जोपर्यंत शिक्षा झाल्याची काही मोठी उदाहरणे जगासमोर येत नाही आणि कडक कारवाईची आकडेवारी वाढत नाही तोपर्यंत नफेखोर लोकांच्या जीवाशी खेळतच राहतील.

अशांच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद करून त्यांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे यात भेसळ करणाऱ्यांना ही अंतर्भूत केलं पाहिजे. अन्न हा जगण्याचा आधार असावा मरणाचे कारण नव्हे.

**लीना गाडगीळ**

---

# गोरगरिबांचे जीव कवडीमोल

**मा**गील ९ वर्षात म्हणजे २०१७ते२०२६ दरम्यान गटार व सेप्टिक टँक साफ करताना ६२२ सफाई कामगारांचा मृत्यू झाला आहे अशी धक्कादायक माहिती केंद्र सरकारने लोकसभेत दिली आहे. यातील अनेक मृत्यू सुरक्षा उपकरणांशिवाय काम केल्याने गुदमरुन झाले आहेत. विशेष म्हणजे यातील ५२ कामगारांच्या कुटुंबियांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नाही. मागील ९ वर्षात ६२२ सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती खुद्द केंद्र सरकारने लोकसभेत देऊनही त्याची दखल माध्यमांनी घेतली नाही. नाही म्हणायला प्रिंट मीडिया म्हणजे काही वर्तमान पत्रात ही बातमी छापून आली पण इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे न्युज चॅनलने या बातमीची दखलच घेतली नाही. एरव्ही कोणत्याही अदखलपात्र बातम्या ब्रेकिंग न्युज म्हणून दाखवणाऱ्या न्युज चॅनलवाल्यांना या बातमीची दखलही घ्यावीशी वाटली नाही हे विशेष.

आपल्या देशात गोरगरीब मजुरांचा जीव कवडीमोल आहे. हे गोरगरीब जगले काय नी मेले काय याचे कोणालाही काहीही सोयरसुतक नाही. अशा दुर्दैवी घटनेत अनेक मजुरांनी आपला जीव गमवला आहे. अनेक मजूर योग्य त्या सुरक्षेअभावी उंच बांधकामावरून पडून जीवाला मुकतात किंवा कायमचे अपंग होतात. काही मजूर पाण्याच्या, शौचालयाच्या टाकीत पडून मरतात. काही मजूर नाले सफाई करताना श्वास गुदमरून मरतात तर काही मजूर विजेच्या खांबावर चढून विजेचे काम करताना शॉक लागून मरतात. अशा प्रकारे अनैसर्गिक मृत्यू पावणाऱ्यांची संख्या शेकडोंच्या घरात असते पण त्याची दखल शासन, माध्यमे, समाज, पोलीस न्यायालय कोणीच घेत नाही कारण ते गरीब आहेत. सर्वसामान्य नागरिक आहेत तेच जर सुशांतसिंग राजपूत, पूजा चव्हाण यांच्यासारखे सेलिब्रिटी असते तर सर्व यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असत्या. माध्यमांनी २४ तास ब्रेकिंग न्युज चालवून टाहो फोडला असता. विरोधी पक्ष किंवा राजकीय नेतेमंडळींनी निदर्शने रास्ता रोको , धरणे आंदोलने केली असती. माणूस सामान्य असो गरीब असो की श्रीमंत असो प्रत्येकाचा जीव महत्वाचा असतो तथापि दुर्दैवी घटनांमध्ये गरिबांचे जीव हे बेदखल केले जातात, ही संतापाची बाब आहे. कोणत्याही निधनाच्या घटनेकडे सरकार बरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलपणे पाहण्याची गरज आहे. आज बदलत्या समाज व्यवस्थेमध्ये संवेदन शीलता हरवत चालली आहे हे देखील सत्य आहे. समाजाने अधिक संवेदनशील राहिले पाहिजे.


**श्याम ठाणेदार**

---

# नामदेवाचा भक्तीठाव ‘पंढरीचा ठाया मोडवीन’

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६.स्व. भाऊ साहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज,अमरावती येथे कामगार कल्याण केंद्र बुलढाणा यांनी संतशिरोमणी नामदेव महाराज यांच्या पांडुरंग-विठ्ठल भेदाचे रहस्य उलगडणारे ऐतिहासिक नाटक उत्तमरित्या सादर केले.**





## एक टक नाटक
### समीक्षण

तर्क व वास्तव असलेल्या दोन सूत्रधारकांमार्फत, नदी किनारी पुरातत्व व अभिलेखागार विभागवार चर्चा, ऐतिहासिक वेशात असल्याने तत्कालीन संदर्भ पुरावे यांची माहिती देण्याचा हेतू.तेराव्या शतकातील प्रसंगात संत नामदेवांच्या कार्याची माहिती.पायरीची पूजा व काकड आरती,एक म्हाताऱ्यारुपात काठी ठेकवत पंजाबी शुभ्र पगडीत प्रवेश करून पायरीवर बसतो.ब्रम्हवृंद असलेले तत्कालीन पूजक पायरीवर बसलेल्या म्हाताऱ्याला उठवत.अरे !अरे !!ही नामदेव पायरी आहे. या पायरीवर नामदेवाचे मुखवटा बसवून खाली संपूर्ण वंशाचे मुखवटे लावलेली,पूजन सुरू.सर्व वंशाचा परिचय पुजारी देत नामदेव असल्याचा दावा म्हातारा व्यक्ती करतो.रात्रीचे कीर्तन, कीर्तनकार कीर्तन संपल्यावर पायरीचे दर्शन घेऊन निघताना नामदेव प्रश्न करतो.कीर्तनकार चिडतो.पन्नास वर्षापूर्वी याच पंढरपुरात पांडुरंगाचे भक्ती प्रसारण करण्याचे काम केल्याचे सांगताना.येथे घडलेला प्रसंग उभा होतो.

नामदेव अवघ्या वयाच्या तेविसाव्या वर्षी अचानक गायब झाले.त्यांना डाकू संबंधून त्यांना त्यांच्या कुटुंबासह संपवले असल्याचा तर्क.शिंपी कार्य करणारे नामदेव औंढा नागनाथ येथे सुई,बाण अर्पण का करतात हा तर्क मांडत पंढरीचे पांडुरंग विठ्ठल कसे झाले.पंढरपुरात यादवांच्या काळातील पांडुरंगची मूर्ती पिठोरी असल्याचे पुरावे नंतर तो विठ्ठल व काळी मूर्ती कशी? यावर प्रकाश.नामदेव महाराज हे धर्मसत्ता असलेल्या काळात वर्ण व्यवस्थेचे बळी.शूद्रांना ब्रम्हज्ञान कसले? यावर तत्कालीन कृष्ण अवतार सांगणारे आचार्य केशवशास्त्री यांनी नामदेवाला बोलावून घेतले.

केशव शास्त्री राधा,रेवती या नर्तकीच्या नृत्यावर विलास क्रीडेत.तेवढ्यात त्यांचा शिष्य येऊन नामदेवाच्या प्रतापचे गुणगान सांगतो.आचार्य केशवशास्त्री हे नामदेवाचे कार्यामुळे विरोधक.कारण पंढरपूरच्या मंदिराचे अध्यक्ष म्हणून कर्मकांड व येथील सुखभोगविलास प्राप्तीसाठी नामदेव अडचणीचे.त्यामुळे नामदेवांची वाट लावावी असा बेत करून नामदेव यांना बोलावून घेऊन त्यांची समज काढताना, स्वयं कृष्ण अवतार व वैष्णव धर्माचा धर्माधीश भासवून, नामदेवाला प्रचारार्थ प्रवृत्त करणे. नामदेव पंढरीचा पांडुरंग पिठोरी असल्याचे सांगत,त्याचे स्वरूप श्वेत कमळाचेपरी असल्याचे पुरावे शंकराचार्य यांनी नोंदविण्याचे पटवून देत,पुढे याला काळा विठ्ठल करण्याचे कारस्थान उलगडत नामदेव पांडुरंग बहुजन सखा, व तो अद्वैत कसा आहे,त्यांचा एकच अवतार आहे,तो भिन्न नाही.नारायण विष्णू हे नामदेवाला मान्य नाही.त्यामुळे नामदेवाला काशी येथे जाण्याचं आयोजन केशव शास्त्री करतात.

ज्ञानदेव नामदेवाच्या भ्रमाचा भोपळा, फोडतील काशीला!अशी योजना करून; ज्ञानदेवाला नामदेवाचे भेटीस पाठवते. मुक्ताई नामदेव हा अहंकारग्रस्त असल्याचे आपल्या भावंडांशी चर्चा करताना दिसते. चौदाशे वर्षाचा चांगदेव गुरुविना कसा अपूर्ण होता याचा दाखला देत. मुंगी उडाली आकाशी या ओव्या गात मुक्ताईचे गूढ तत्त्वज्ञान. गोरोबा काकाच्या मार्फत नामदेवाला अनुग्रहीत करण्याचे नियोजन.नामदेव ज्ञानदेव मिलाप होताना ब्रह्मज्ञानावर चर्चा.नामदेव ज्ञानदेवाला ब्रह्मज्ञानापेक्षा चराचरातील पांडुरंग श्रेष्ठत्व पटवून देत. ज्ञानदेव नामदेवाला शरण. काशीला ब्रह्मवृद्धांच्या सांगण्यावरून नामदेवाला बोलावून घेतल्याचे ज्ञानदेव कबूल करून मध्यप्रांत सोडून कुठेही जा हा सल्ला देत.नामदेवांचा जीव वाचावा ही काकुळता करून पंढरपूरची जबाबदारी ज्ञानदेव पाहून घेतील असे आश्वासन देत, नामदेव स्व अभंगातील पंढरीचा ठाया मोडवीन !! ही ओळ स्पष्ट करून प्रस्थान करतात. पांडुरंग व विठ्ठल यांचे कोडे सोडवणारे नाटक नामदेवाच्या अस्सल प्राकृत भाषेत अभंगातून ओळीबद्ध संवाद,अभिनयाची पकड ठेऊन ऐतिहासिक दर्शन घडवून आणते.ज्ञानदेव (पत्र वाचताना हस्तलहर)निवृतीपेक्षा प्रौढ,नामदेव वीणे विना एकतारी चिपळी. टाळ मृदंग,वीणाविना कीर्तन करणारा महाराज,तर्क -वास्तव अनवाणी नदीकिनारी.अंतिम संगीत पांडुरंग विठ्ठला दक्षिणी रिधम,नेपथ्य पुरेसे, मात्र लेखक रवींद्र इंगळे चावरेकर यांनी संहिता अभ्यासपूर्वक ठेवली (बाराव्याशतकात देशात महाराष्ट्र हयात हो की ना?).इतिहासातील पुरावे नव्याने,विठ्ठल पांडुरंग दाखवणारा संदर्भ दर्शकांना देता आला. दिग्दर्शक विजय सोनोने यांनी योग्य अभिनायकमार्फत नाटकाला सजवले.

एक टक नाटक बघत रहावे अशी अभ्यासपूर्ण दोन अंकाची मालिका.

संगीत व प्रकाश योजनेचे,रंग व वेशभूषांचे नियोजन करून ऐतेहासिक नाटकाचा साज दर्शवून अभ्यासक दर्शक खुश.गणेश देशमुख यांनी नामदेवाचे भूमिकेत वारकरी संप्रदायचे दर्शन घडविले.त्यामुळे ‘नामदेवे रचिला पाया’ हे ज्ञानदेवे रचिला पायायांचे यांचे खंडन करणारे ठरले. केशवशास्त्री पराग काचकुरे, ज्ञानदेव आनंद संचेती, शिष्य डॉ.स्वप्नील दांदडे, मुक्ता वैष्णवी आहेर, बडवा/निवृत्ती प्रसाद दामले, कीर्तनकार चंद्रशेखर जोशी, प्रकाशयोजना लक्ष्मीकांत गोंदकर, संगीत विजय सोनवणे, नेपथ्य शितल मेहसरे, वेशभूषा आनंद संचेती, रंगभूषा प्रवीण इंगळे यांच्या सहकार्यातून पंढरीचा ठाया मोडवीन अभ्यासपूर्ण लेखन म्हणून सादर.

**कबीर फादर**
मो. ७७९८६४५५६५

# कोकर्डा रस्ता रखडला, अर्धवट कामामुळे नागरिकांचा जिव धोक्यात

## -रुग्णांना रूग्णालयात नेताना प्रचंड हाल

**खल्लार/प्रतिनिधीः-** कोकर्डा फाटा ते कोकर्डा या महत्त्वाच्या मार्गाच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामाला काही दिवसांपूर्वी मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली होती. मात्र, अचानक हे काम बंद पडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून अर्धवट कामामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. काही ठिकाणी खडी टाकून काम थांबविण्यात आले असून त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचाकीस्वार आणि शेतकरी यांना या मार्गावरून प्रवास करताना जिव धोक्यात घालावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की काम सुरू झाल्यानंतर काही दिवस कामाचा वेग चांगला होता मात्र अचानक कामगार व यंत्रसामग्री गायब झाल्याने काम पूर्णपणे ठप्प झाले आहे. यामुळे काम सुरू करून मध्येच का थांबवले असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

राज्यात अनेक ठिकाणी निधीअभावी किंवा प्रशासकीय कारणांमुळे रस्त्यांची कामे रखडल्याची उदाहरणे समोर आली आहेत. त्यामुळे कोकर्डा रस्त्याच्या कामालाही अशाच कारणांचा फटका बसला आहे का, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

दरम्यान अर्धवट कामामुळे धूळ उडणे, अपघाताचा धोका वाढणे आणि वाहतुकीत अडथळे निर्माण होणे अशा समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन काम पुन्हा सुरू करून रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

- रस्त्याचे काम सुरू असून ते पूर्ण करण्यासाठी सुमारे एक वर्ष एक महिन्याचा महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या निर्धारित मुदतीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. नोव्हेंबर २०२६ पर्यंत काम पूर्ण होऊन जाईल.

**-नरेश अगम, उपविभागीय अभियंता अंजनगाव**

- कोकर्डा फाटा–कोकर्डा रस्त्याचे काम सुरू झाले तेव्हा आम्हाला खूप आनंद झाला होता. वाटले की आता प्रवास सोपा होईल, पण काही दिवसांतच काम अचानक बंद पडले. अर्धवट रस्त्यामुळे आता परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक वाईट झाली आहे.

**-स्वर्गव माहोरे,स्थानिक नागरिक- कोकर्डा**


- या रस्त्यावरून रोज शाळकरी मुले, शेतकरी आणि कामगार प्रवास करतात. पण खड्डे आणि टाकलेली खडी यामुळे दुचाकी चालवणे अत्यंत धोकादायक झाले आहे. अनेक वेळा लहान मोठे अपघात घडण्याची भीती कायम असते.

**-सोमेश करणे, स्थानिक नागरिक**

# अस्वलीतल्या मातृत्वाने वेधले लक्ष

## -शावकांना पाठीवर घेऊन भ्रमंती

**अमरावती/प्रतिनिधीः-** माता कोणत्याही रूपातली असो तिचे आपल्या पिल्लांवर जिवापाड प्रेम असते. त्यांना थोडासाही त्रास ती होऊ देत नाही. त्यांच्या गरजा ओळखून पुर्ततेसाठी तिची धडपड असते. अशीच एक घटना मेळघाटातल्या जंगलात कॅमेऱ्यात कैद झाली. अस्वल आपल्या पिल्लांना पाठीवर घेऊन भ्रमंती करताना दिसले. तिने हा उन्हातला दोन किमीचा प्रवास पाण्याच्या शोधासाठी किंवा शावकांना सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी केला असावा, असा अंदाज जाणकारांनी वर्तविला.



मेळघाटातील हरिसाल बोरी मार्गावर सेमाडोह आणि बुरी दरम्यानचे दुर्मिळ दृश्य जंगल सफारी मार्गावर पाहायला मिळाले. सामाजिक कार्यकर्ते रोहीत पाल यांनी अस्वलीची ही भ्रमंती आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. मादी अस्वलाने आपल्या लहान शावकांना पाठीवर बसवून प्रवास केल्याचे हे दृश्य मायेचा ओलावा दर्शविणारे ठरले आहे. सुमारे २ किलोमीटरपर्यंत ती शावकांना घेऊन जाताना दिसली.

# डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावती येथे पदवी वितरण समारंभ

## -गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन केला सन्मान

**अमरावती/प्रतिनिधीः-** शैक्षणिक, संशोधन क्षेत्रात सदैव अग्रेसर असणारे डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावती तर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांबरोबरच त्यांचे नेतृत्वगुण, सृजनशीलता आणि व्यावसायिक क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरतात. यांमध्ये अकॅडमिक आणि संशोधन उपक्रम, तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्य विकास उपक्रम, व्यक्तिमत्त्व विकास आणि नेतृत्व प्रशिक्षण उपक्रम, सामाजिक आणि संस्कृतीक उपक्रम, तंत्रज्ञान आणि नवसंशोधनासाठी विशेष उपक्रमांचा समावेश आहे. हाच दृष्टीकोन लक्षात घेता आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीचा सन्मान करण्याकरिता संस्थेचे अध्यक्ष योगेंद्र गोडे यांच्या प्रेरणेतून तसेच सचिव तन्वी गोडे यांच्या मार्गदर्शनातून त्यासोबतच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावती येथे २०२४-२५ बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य पदवी वितरण समारंभ दिनांक २० मार्च २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. या समारंभात विविध विभागांतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

दिनांक २० मार्च २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता पदवी वितरण समारंभ कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमा प्रसंगी मंचावर डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावती चे प्राचार्य डॉ. सागर सी. जीरापुरे यांनी अध्यक्षिय स्थान भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन ए. कोळी, उपकुलसचिव, मोनाली तोटे (पाटील) हे होते. कार्यक्रमाचे आयोजक इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग च्या विभाग प्रमुख प्रा. कांचन पिंपळे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. नितीन एन. मोरे, त्यासोबतच डीन अकॅडेमिक्स डॉ. एच. आर. धनबर, सिव्हिल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. गौरव डी. धाडसे, मेकॅनिकल इंजिनीरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम. आर. धर्मे, कॉम्पुटर सायंन्स अँड इंजिनीरिंग विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. आर. एस. दुर्गे इत्यादी मान्यवर मंडळींची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची आराध्य देवी माता सरस्वती, संत गाडगेबाबा आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. राजेंद्र गोडे यांच्या प्रतिमांना अभिवादन करून विद्यापीठ गीताने झाली.

डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, अमरावतीचे प्राचार्य डॉ. सागर सी. जीरापुरे यांनी पदवी वितरण समारंभाच्या प्रारंभाची औपचारिक घोषणा करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले आणि प्रास्ताविक भाषण सादर केले. प्रास्ताविक भाषणामध्ये प्राचार्य डॉ. सागर सी. जीरापुरे यांनी पदवी वितरण समारंभाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे, विद्यार्थी आणि पालकांचे स्वागत केले. तसेच, विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमांची आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीची स्तुती केली.

याशिवाय, त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीबाबत थोडक्यात माहिती देऊन, संस्थेने मिळवलेल्या यशांचा उल्लेख केला. भविष्यातील आव्हाने आणि संधी याबाबत मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आणि सातत्याने शिकत राहण्याचा सल्ला दिला. शेवटी, संस्थेच्या प्राध्यापकवर्ग आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानून, पदवीधर विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन ए. कोळी यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांना संशोधनावर भर देण्याचा आणि आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्षात आणण्याचा सल्ला दिला. विद्यार्थ्यांनी उद्योग, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.

त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासानंतरच्या संधी आणि जबाबदाऱ्यांबद्दल मार्गदर्शन करताना संशोधन आणि नाविन्यपूर्ण विचारसरणीच्या महत्त्वावर विशेष भर दिला. ते पुढे म्हणाले की, आधुनिक युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही, तर उद्योग, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींची वाट पाहण्याऐवजी उद्योजकतेच्या संधी शोधून स्वतः रोजगार निर्माते बनावे. तसेच, नाविन्यपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसित करावे आणि त्यासाठी विविध शासकीय व विद्यापीठीय योजनांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सुचवले. यावेळी त्यांनी २० मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या पाण्याच्या हक्कासाठीच्या ऐतिहासिक चळवळीचा संदर्भ देत सांगितले की, समता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता हीच प्रगतीची खरी दिशा आहे. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी व्हावा, हीच खरी अपेक्षा असून, चुकीच्या वापरामुळे त्याचे दुष्परिणामही दिसून येतात, असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी उदाहरण देताना सांगितले की, तंत्रज्ञानाचा दुरुपयोग झाल्यास समाजावर विपरीत परिणाम होऊ शकतो. जगात घडलेल्या काही हिंसक घटनांमधून हे स्पष्ट होते की, अभियांत्रिकी ज्ञानाचा चुकीच्या पद्धतीने वापर होऊ शकतो. तसेच, अल्बर्ट आइनस्टाइन यांनी मांडलेले $E = mc^2$ हे तत्त्वज्ञान मानवजातीच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असले, तरी त्याच संकल्पनेतून अणुबॉम्बसारख्या विनाशकारी शक्तीचाही विकास झाला, हे वास्तव नाकारता येत नाही. शेवटी, त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने शिकत राहण्याचा, नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याचा आणि कठोर परिश्रम करून आपले ध्येय गाठण्याचा सल्ला दिला. तसेच, तंत्रज्ञानाचा वापर नेहमी मानवकल्याणासाठीच करावा, असा मौल्यवान संदेशही त्यांनी दिला.

समारोपीय भाषणात तेजस भटकर यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासातील अनुभव, आठवणी आणि संस्थेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यानंतर विभाग निहाय पदवी वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथी व प्राचार्यांच्या हस्ते पदवी वितरित करण्यात आले तसेच प्रत्येक विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. पदवी वितरणानंतर प्राचार्य डॉ. सागर जीरापुरे यांनी उपस्थित सर्व पदवीधारक विद्यार्थ्यांना पदवी-शपथ ग्रहण करवून दिले.

प्राचार्य डॉ. सागर जीरापुरे यांनी समारोपाची घोषणा केली. या समारंभाला विविध विभागातील विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सुयोग्य संचालन प्रा. सोनाली पवार आणि प्रा. राहुल शर्मा यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एच. आर. धनबर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# बस प्रवासात तरुणीचा विनयभंग

## -प्रवाशांच्या सतर्कतेमुळे आरोपी ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती–अचलपूर मार्गावरील इलेक्ट्रिक बसमध्ये प्रवास करणाऱ्या २७ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याची घटना समोर आली असून, या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २७ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान फिर्यादी तरुणी अमरावतीहून अचलपूरकडे जाणाऱ्या इलेक्ट्रिक बसमध्ये प्रवास करत होती. त्यावेळी तिच्या मागील सीटवर बसलेल्या एका अनोळखी व्यक्तीने सीटच्या बाजूने हात घालत तिच्या पाठीला लावून अयोग्य स्पर्श केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणीने तत्काळ आरडाओरडा केला. त्यानंतर बस चालकाने वाहन थांबवून संबंधित व्यक्तीला जाब विचारला व तरुणीची सीट बदलून दिली. पुढे चांदर नाका, अचलपूर येथे बस थांबताच आरोपी तिच्या मागे उतरला. यावेळी बसमधील प्रवाशांनी तत्परता दाखवत स्थानिकांना माहिती दिली. स्थानिक नागरिकांनी आरोपीला पकडून चांगलाच चोप दिला. त्यानंतर त्याची ओळख आकाश शामलाल कुरील (वय ३२ वर्ष) अशी पटली. या घटनेप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे सार्वजनिक वाहतुकीत महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रवाशांनी दाखवलेली सतर्कता कौतुकास्पद ठरत आहे.

**पाहिजे**

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.

शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

**पाहिजे**

गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत. तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# 'डिजिटल महाराष्ट्र'च्या स्वप्नाला अमरावतीचे बळ

## -ई-गव्हर्नन्स मानांकनात अमरावती महानगरपालिकेचा राज्यात पाचवा क्रमांक!

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कृती कार्यक्रमांतर्गत' राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India – QCI) यांच्या वतीने करण्यात आले. या अत्यंत महत्त्वाकांक्षी मूल्यमापनाचे निकाल प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या शुभहस्ते जाहीर करण्यात आले. या चुरशीच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमध्ये अमरावती महानगरपालिकेने २०० पैकी १७९.५० गुण मिळवत राज्यात पाचवा क्रमांक पटकावला आहे. ही नेत्रदीपक कामगिरी महानगरपालिकेच्या डिजिटल प्रशासन, तांत्रिक कार्यक्षमता आणि सेवा वितरणातील प्रगतीचे जिवंत द्योतक ठरली आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या सक्षम नेतृत्वाखाली डिजिटल उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, नाविन्यपूर्ण तांत्रिक प्रयोग आणि प्रशासनातील पारदर्शकता यावर विशेष भर देण्यात आल्याने हे यश संपादन करता आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री १५० दिवस ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री सभागृह, मुंबई येथे आयोजित समारंभात गौरव करण्यात आला.

कार्यपद्धतीत सुधारणा करीत थेट पाचव्या स्थानी झेप !

भारतीय गुणवत्ता परिषदेकडून करण्यात आलेल्या या सर्वंकष मूल्यमापनात सात प्रमुख निकषांवर कामगिरी तपासण्यात आली. यामध्ये महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्स ॲप चॅटबॉट, शासकीय कामकाजात AI (Artificial Intelligence) व Blockchain चा वापर तसेच GIS (Geographic Information System) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश होता. या सर्व निकषांवर अमरावती महानगरपालिकेने उत्कृष्ट अंमलबजावणी करत ई-गव्हर्नन्स क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या कार्यक्रमांतर्गत तर्फे विकसित करण्यात आलेल्या स्वतंत्र ऑनलाईन पोर्टलवर संबंधित माहिती व कार्यप्रगती सादर करण्यात आली होती. प्राथमिक छाननीनंतर भारतीय गुणवत्ता परिषदेकडून सखोल मुलाखती व प्रत्यक्ष अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यात आले. या यशाला विशेष महत्त्व आहे, कारण प्राथमिक मूल्यमापनात अमरावती महानगरपालिका आठव्या स्थानावर होती. मात्र, त्यानंतर प्रशासनाने कार्यपद्धतीत सुधारणा करत नव्याने नियोजन, तांत्रिक सक्षमीकरण आणि नागरिककेंद्रित उपक्रमांवर भर दिला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित म्हणून अंतिम मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने पाचव्या स्थानी झेप घेतली.



**आधुनिक तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण उपक्रम-**

'आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शासकीय प्रणाली - एक नवीन युगाची वाट' या ब्रीदवाक्याला अनुसरून अमरावती महानगरपालिकेने अनेक विशेष उपक्रम राबविले आहेत. या यशामागे ई-गव्हर्नन्स क्षेत्रात राबविण्यात आलेल्या 'माय अमरावती' व्हॉट्स ॲप चॅटबॉट व चॅनलद्वारे नागरिकांशी थेट संवाद, रिमोट सेन्सिंगवर आधारित 'कूल रूफ' उपविधी २०२५, GIS व ड्रोन मॅपिंगद्वारे सुधारित मालमत्ता कर मूल्यांकन, स्वच्छता वॉर रूम आणि ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी यांचा मोठा वाटा आहे. तसेच, शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Government Process Re-engineering) करून सेवा वितरण जलद करण्यात आले आहे. या यशाबाबत प्रतिक्रिया देताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक म्हणाल्या की, महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ व नागरिकाभिमुख करण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न असून, भविष्यातही नागरिकांना अधिक दर्जेदार आणि प्रभावी सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**स्वच्छ हवा गुणवत्ता सर्वेक्षणात अमरावती भारतात पहिल्या क्रमांकावर !**

ई-गव्हर्नन्ससोबतच स्वच्छ हवा गुणवत्ता सर्वेक्षण २०२५ मधील अमरावती शहराची कामगिरी अत्यंत सरस राहिली आहे. ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये अमरावती भारतात पहिल्या क्रमांकावर असून, शहराला सर्वेक्षणात २०० पैकी २०० गुण मिळाले आहेत. या कामगिरीसाठी वन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालयातर्फे अमरावती महानगरपालिकेला ७५ लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. याशिवाय, शहराचे तापमान कमी करण्याच्या उद्देशाने महापालिकेने नवीन शहरी नियोजन धोरणे सुरू केली आहेत. हवामान बदलांना तोंड देण्यासाठी आणि शहरातील 'शहरी उष्णता बेटे' प्रभाव कमी करण्यासाठी इमारतींवर 'कूल रूफ' (थंड छप्पर) अनिवार्य करणारे नवीन नियम लागू केले आहेत. हे उपनियम हवामान लवचिकता निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आले असून, या पर्यावरणीय उपाययोजनांची देखरेख करण्यासाठी दूरसंवेदन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे.

**नागरिक-केंद्रित विशेष तंत्रज्ञान उपक्रम-**

अमरावती महानगरपालिकेने नागरी सेवा सुधारण्यासाठी 'मुख्यमंत्री-१५० दिवस' कार्यक्रमांतर्गत अनेक विशिष्ट उपक्रम कार्यान्वित केले आहेत. यामध्ये व्हॉट्स ॲप चॅटबॉट सर्व नागरी सेवा मिळवण्यासाठी 'एकच खिडकी' म्हणून काम करत आहे. 'कामगार पोर्टल'द्वारे कामगार प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लागणारी हस्तलिखित कागदपत्रे कमी करून प्रक्रियेचे संपूर्ण डिजिटायझेशन करण्यात आले आहे. 'ब्लॉकचेन तंत्रज्ञान' चा वापर करून कागदपत्रांची पुनरावृत्ती टाळणे आणि महत्त्वाच्या प्रमाणपत्रांची सुरक्षा सुनिश्चित करण्यात आली आहे, ज्यासाठी दूरसंवेदन तंत्रज्ञानाची मदत घेतली जाते. तसेच, 'महापालिका संदेशिनी' हे अधिकृत वृत्त पोर्टल विश्वसनीय पालिका माहितीसाठी कार्यरत आहे. मोठ्या महानगरपालिका व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी यशस्वी स्पर्धा करत मिळवलेला हा पाचवा क्रमांक अमरावती महानगरपालिकेसाठी अत्यंत अभिमानास्पद असून, डिजिटल प्रशासनाच्या दिशेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना बळ देणारा आणि भविष्यासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. या यशामुळे अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे !

**-अपर्णा यावलकर, माहिती अधिकारी -जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मेळघाटात पाणी पेटले; मोथा गावाला टँकरचा आधार

**अमरावती/का.प्र.**
जिल्ह्याच्या ग्रामीण भागात, विशेषतः मेळघाटातील दुर्गम भागात मार्चच्या सुरुवातीपासूनच तीव्र पाणीटंचाईचे चटके बसू लागले आहेत. चिखलदरा तालुक्यातील मोथा गावाला सध्या तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून, वाढत्या उष्णतेमुळे जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतही विहीर अधिग्रहणाची प्रक्रिया वेगाने राबविली जात आहे. यंदा पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने १९ कोटी ७ लाख रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे.

जिल्ह्यात सध्या चार तालुक्यांतील आठ गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक व खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वाढोणा रामनाथ, पळसमंडळ, पिंप्री गावंडा; अचलपूर तालुक्यातील बोर्डी, परसापूर; मोर्शीतील गणेशपूर, दाभेरी आणि चिखलदऱ्यातील मोथा या गावांचा समावेश आहे.

भूगर्भातील पाणीपातळी घटल्याने अनेक गावांच्या नळयोजनांचे स्रोत कोरडे



पडले असून, ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे.यंदा फेब्रुवारी महिन्यापासूनच तापमानात वाढ झाल्याने पाणीटंचाईची तीव्रता अधिक जाणवत आहे. प्रशासकीय अंदाजानुसार, जिल्ह्यातील जवळपास ७५० गावे टंचाईच्या छायेत येण्याची दाट शक्यता आहे.टंचाई आराखड्यानुसार ५४५ संभाव्य गावांमध्ये नळयोजना आणि बंद हातपंपांची तातडीने दुरुस्ती. विहिरींचे खोलीकरण आणि गाळ उपसणे. अपूर्ण वीजपंपांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करणे, या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

विभागामार्फत काही गावांमध्ये टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, पाणीपुरवठा आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. संभाव्य टंचाईग्रस्त गावांमध्ये टंचाई भासू नये, यासाठी प्रशासन सतर्क असून मागणीनुसार टँकर उपलब्ध करून दिले जातील, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

**महिलांची पायपीट वाढली**

ग्रामीण भागात पाण्याचे स्रोत मर्यादित असल्याने उपलब्ध सार्वजनिक विहिरी आणि टँकरवर महिलांची मोठी गर्दी होत आहे. अनेक गावांमध्ये नागरिकांना गावाबाहेरून पाणी आणावे लागत असून, एप्रिल आणि मे महिन्यात ही स्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत.

---

## ‘पोट हिस्सा’ मोजणी पथदर्शी प्रकल्पासाठी पाच गावांची निवड

**तिवसा/वार्ताहर**
राज्यातील जमिनीचे नकाशे आणि सातबारा यामधील तफावत दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या साहाय्य योजना २०२४-२५ अंतर्गत महत्त्वाकांक्षी पोट हिस्सा मोजणी व नकाशा अद्ययावत करण्याचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्याची निवड करण्यात आली असून, तालुक्यातील पाच गावांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे.

सध्याच्या राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून तीन तालुके निवडून एकूण १८ तालुक्यांमध्ये हा प्रकल्प राबविला जाणार आहे. जमिनीच्या धारकानुसार अचूक मोजणी करून शासकीय अभिलेख अद्ययावत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यामुळे सात-बारा आणि नकाशा यातील विसंगती दूर होऊन जमीन व्यवहार अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहेत.

तिवसा तालुक्यातील सुलतानपूर, काटसूर, वणी, ममदापूर आणि इसापूर या गावांची पथदर्शी प्रकल्पासाठी निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जमिनीची अचूक मोजणी केली जाणार असून, प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा डिजिटल नकाशा उपलब्ध करून दिला जाणार आहे.या प्रकल्पामुळे जमिनीच्या सीमांवरून उद्भवणारे वाद मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असून, शेतकऱ्यांना त्यांच्या मालकीच्या जमिनीबाबत स्पष्ट व अधिकृत माहिती मिळणार आहे, तसेच जमीन खरेदी-विक्री व्यवहारही अधिक सुलभ आणि विश्वासार्ह होणार आहेत.

यामध्ये सातबारा व नकाशातील विसंगती दूर करणे, जमिनीचा अचूक डिजिटल नकाशा उपलब्ध करून मिळेल, सीमावादांमध्ये घट होईल, जमीन व्यवहार अधिक पारदर्शक व सुलभ होईल. ही योजना ग्रामीण भागातील जमीन व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल घडवून आणणारी ठरणार असून, शेतकऱ्यांसाठी दिलासादायक पाऊल मानले जात आहे.

---

## वडूरा पाणी प्रश्नाविषयी आ. प्रवीण तायडे यांचे सोबत चर्चा

**अमरावती/का.प्र.**
वडूरा गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून ग्रामस्थांना अजूनही गोड पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी आ. प्रवीण तायडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



गेल्या दोन वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी क्षारयुक्त पाण्याच्या समस्येबाबत आमदारांना निवेदन दिले होते. त्यावेळी वडूरा गावाचा विसरोळी धरणाच्या १०८ गावांच्या योजनेत समावेश करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी गावात पाहणी करून एका वर्षात धरणाचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पुढील पाठपुरावा न झाल्यामुळे ही योजना अद्यापही प्रलंबित आहे.या योजनेसाठी शासनाची मंजुरी, आराखडा व अंदाजपत्रक आवश्यक असून, दोन वर्ष उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे गावकरी पूर्णा धरणाच्या पाण्याची वाट पाहत असतानाच निराशा वाढत आहे.आ.प्रवीण तायडे यांनी सांगितले की, वाढीव पाणीपुरवठा योजनेतून सुटलेल्या गावांचा प्रश्न विधान भवनात उपस्थित करण्यात आला असून, यासंदर्भात मंत्री गुलाबराव पाटील यांच्याशीही चर्चा करण्यात आली आहे. हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गावातील पाण्याच्या टाक्यांमध्ये क्षार साचत असून घरगुती उपकरणांनाही नुकसान होत आहे. त्यामुळे आर.ओ. फिल्टर बसविण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. गावातील मूलभूत सुविधा, रस्ते व पाणीपुरवठा यांसारख्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याने सुशिक्षित गाव असूनही मागासलेली परिस्थिती निर्माण झाल्याची खंत व्यक्त केली जात आहे. या गंभीर समस्येवर महाराष्ट्र शासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेला मंजुरी

## शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचा निर्णय, मिळणार जागतिक दर्जाच्या सुविधा

**अमरावती/का.प्र.**
शासकीय शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा विकास कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जिल्हा परिषद आणि नगरपालिका) एकूण ४०५ शाळांना आदर्श शाळांमध्ये विकसित करण्यासाठी २७ मार्च रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. या योजनेमुळे आता ग्रामीण आणि शहरी भागातील शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील. राज्य सरकारने यासाठी ४९५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे

केवळ एक भव्य शाळा हीच आदर्श शाळा नसते. सरकारी धोरणानुसार, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उच्च दर्जाच्या भौतिक सुविधा, आधुनिक शैक्षणिक वातावरण आणि प्रगत तंत्रज्ञान असलेली शाळा एक आदर्श शाळा मानली जाते. खाजगी शाळांच्या बरोबरीने मोफत शिक्षण देऊन विद्यार्थ्यांची गळती कमी करणे, हे या शाळांचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

**या सुविधा शाळांमध्ये उपलब्ध**

राज्यभरातील ४०५ शाळांमध्ये उभारण्यात येणाऱ्या आधुनिक इमारतींमध्ये सुसज्ज वर्गखोल्या, आकर्षक रंगवलेल्या भिंती, डिजिटल शिक्षणासाठी संगणक प्रयोगशाळा, स्मार्ट क्लासरूम, हाय-स्पीड इंटरनेट आणि ई-लर्निंग सुविधा, सुसज्ज ग्रंथालय आणि आधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, खेळाची मैदाने आणि विविध क्रीडा साहित्याचा समावेश असेल. शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र आधुनिक शौचालय, सॅनिटरी नॅपकिन्स, व्हेंडिंग मशीन्स आणि कचरा जाळण्याची यंत्रे (इन्सिनरेटर्स) बसवण्यात येतील. डिजिटल शिक्षणासाठी संगणक प्रयोगशाळा, स्मार्ट क्लासरूम, ई-लर्निंग सुविधा आणि शारीरिक विकासासाठी खेळाची मैदाने व क्रीडा साहित्य, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि मुला-मुलींसाठी स्वतंत्र आधुनिक शौचालये बांधण्यात येतील.

या योजनेत राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ४०५ निवडक शाळांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामध्ये अमरावती, पूर्णा, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर यांसारख्या मोठ्या जिल्ह्यांसोबतच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

---

## शार्दूल गोळे यांची विदर्भ मीडिया प्रमुख म्हणून नियुक्ती

**अमरावती/का.प्र.**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना राष्ट्रीय कामगार सेनेत एक महत्त्वाची आणि चर्चेची नियुक्ती झाली आहे. अमरावती येथील ज्येष्ठ पत्रकार, अभिनेता, छायाचित्रकार आणि फिल्म मेकर शार्दुल गोळे यांची विदर्भ मीडिया प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.शिवसेना नेते नानासाहेब बच्छाव आणि बाबासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनात आणि विदर्भ प्रमुख आकाश हेरोडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.




महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या नियुक्तीसाठी विशेष संदेश पाठवला होता. त्यात त्यांनी शार्दुल गोळे यांच्या बहुआयामी अनुभवाचा उल्लेख करताना ‘विदर्भातील कामगार आणि शेतकरी वर्गासाठी मजबूत मीडिया पाठबळाची गरज आहे’ असे सांगितले.शार्दुल गोळे हे गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता, अभिनय, छायाचित्रकारिता आणि फिल्म मेकिंग या क्षेत्रात सक्रिय आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांमध्ये राजकीय सल्लागार म्हणून त्यांनी काम केले आहे.विदर्भातील आठ जिल्ह्यांमध्ये शिवसेना राष्ट्रीय कामगार सेनेच्या कार्याला गती देण्यासाठी शार्दुल गोळे यांनी लगेचच काम सुरू केले असल्याचे सांगण्यात आले. अमरावती, नागपूर, अकोला, वर्धा, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर आणि गडचिरोली या सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हानिहाय मीडिया टीम तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कार्यक्रमात स्थानिक नेते, कार्यकर्ते, पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. समारोपात सर्वांनी शार्दुल गोळे यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.शार्दुल गोळे यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ मीडिया पथक कशा प्रकारे काम करेल याकडे आता संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय आणि पत्रकारिता जगताचे लक्ष लागले आहे.

---

## शहीद भगतसिंह ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचे शहीद दिन

**चांदूरबाजार/वार्ताहर**
तालुक्यातील बेलोरा दोन दिवसीय शहीद स्मृती दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री दत्त मंदिर प्रांगणात हा सोहळा होईल. स्थानिक शहीद भगतसिंह ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाने, या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

यात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना, एकूण १ लाख ३ हजार रूपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. स्व.मंदाताई देशमुख मेमोरियल ट्रस्ट बेलोरा, स्व.गोपाळ, श्रीधर देशमुख एकलारेकर, स्व.रामराव पां. देशमुख व स्व.सुमित्रा रा. देशमुख,तथा स्व.माधवराव उर्फ दादाभाऊ जिवन देशमुख,या सर्वांचे स्मृती प्रित्यर्थ प्राप्त दान राशीतून देण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात ३१ मार्चला सकाळी ९ वाजता, रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता शहीद-ए-आजम भगतसिंह यांना, अभिप्रेत असलेला भारत आणि आजचे वर्तमान.या विषयावर यवतमाळ येथील सुप्रसिद्ध वक्ते,प्रा.प्रविण देशमुख यांचे व्याख्यान होईल. या सोहळ्याला बच्चू कडू, तहसीलदार सोनल सुर्यवंशी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ.सुरज मडावी, सहायक ग्रंथालय अधिकारी राजेश पाटील, ठाणेदार अशोक जाधव, सरपंच भैय्यासाहेब कडू, अतुल शिंगण व प्रदीप देशमुख हे अध्यक्ष, उद्धघाटक व अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

---

## संक्षिप्त

### शिवर बु.येथे धम्म मेळाव्याचे आयोजन



**काटपुर**-भारतीय बौद्ध महासभा केंद्र व राज्य शाखेच्या निर्देशानुसार जिल्ह्यात बौद्धाचार्य श्रामनेर शिबीर,धम्म उपासिका प्रशिक्षण शिबीर,व समता सैनिक दलाचे शिबीर लावण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार दर्यापूर तालुक्यात एक बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर, तीन समता सैनिक दल शिबिरे व पाच धम्म उपासिका प्रशिक्षण शिबिरे असे एकुण ०९ (नऊ) शिबीर पाच गावात सुरू झालेली आहेत.या पाच गावातील शिबिरांचा एकत्रित समारोप तथा दर्यापूर तालुकास्तरीय भव्य धम्म मेळावा ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता दर्यापूर तालुक्यातील ग्राम शिवर बुद्रुक येथे आयोजित केले आहे.

### आज जुटपाणी येथे आरोग्य शिबीर

**धारणी**-येथील माजी मंडळ अधिकारी स्व. दौलत पांडुजी पाटील यांच्या पाचव्या पाटील पुण्यतिथीनिमित्त परिवारातर्फे ३० मार्चला आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जुटपणी, ता. धारणी येथे आयोजित करण्यात आले असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग

**अमरावती**-तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोझरीस्थित एका मठात दोन १५ वर्षीय अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी ५२ वर्षीय आरोपीविरूद्ध विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. तथा त्याला अटक करण्यात आली.एफआयआरनुसार, पीडित दोन्ही मुली या एका वसतिगृहात राहून शिक्षण घेतात. मागील वर्षी रामनवमी उत्सवाच्या वेळी रांगोळी काढत असताना त्यातील एकीची ओळख संशयित आरोपी संजय बांते (वय ५२ वर्षे, रा. मोझरी) याच्याशी झाली होती. २२ मार्च रोजी सकाळी ७:३० ते ८:०० च्या दरम्यान, दोन्ही मुली मठात रांगोळी काढायला गेल्या होत्या. रांगोळी काढून झाल्यानंतर आरोपीने त्यांना वरचे मंदिर दाखवतो, असे सांगून एका खोलीत नेले.आणि त्यांच्याशी अश्लील चाळे करण्याचा प्रयत्न केला. दोघींनीही प्रसंगावधान राखून आरोपीला दूर लोटले आणि तिथून पळ काढत थेट वसतिगृह गाठले. घटनेनंतर पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी आरोपी संजय बांते याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविला.

### हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**अमरावती**-येथील बजरंग चौक, बुखारा परिसरातील किरी बजरंग मंडळाच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यंदा या उत्सवाचे ९३ वे वर्ष असून, दि. ३० मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.उत्सवाच्या पहिल्या दिवशी, दि. ३० मार्च रोजी सायंकाळी रामायण दर्शन या लघुनाटिकेचे सादरीकरण करण्यात येणार आहे. तसेच दि. ३१ मार्च रोजी ‘रामरंगी रंगीले’ या भक्तीगीत व अभंग गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, यामध्ये मुंबई येथील प्रसिद्ध गायिका माधुरी नाईक तसेच पुण्याच्या साक्षी देशपांडे सहभागी होणार आहेत.याशिवाय, उत्सव काळात हनुमान जन्मोत्सव विशेष कीर्तन, भजनी मंडळांचे भजन कार्यक्रम तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.या उत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बजरंग मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### आज मनपाची अर्थसंकल्पीय सभा

**अमरावती**- महानगर पालिकेत आर्थिक वर्ष २०२६-२७चाअर्थसंकल्प सोमवार ३० रोजी स. ११ वाजतापासून होणाऱ्या आमसभेपुढे मांडला जाणार आहे. सुरू यंदाचे एकूण बजेट हे गेल्या वर्षीपेक्षा केवळ ३१ लाखाने जास्त रकमेचे आहे. गेल्या वर्षी ८८७.६९ कोटीचे बजेट होते. यंदा ते ८८८ कोटींचे आहे. यंदा ४७३ कोटींचे महसुली, तर ४१५ कोटींचे भांडवली उत्पन्न गृहित धरण्यात आले आहे.२०२२ मध्ये मनपा नगरसेवकांना वार्ड विकास व स्वेच्छा निधी वर्षाला ५ लाख रुपये देण्यात आला होता. कारण, मागील तीन ते चार वर्ष शहरातील विकासकामे रखडल्याचे स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी सांगितले.

---

## जिजाऊ ब्रिगेडचे राज्य महाअधिवेशन शुक्रवारी

### मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते उद्घाटन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
महिलांचे सामाजिक, सांस्कृतिक



व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने ३ एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर,मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे. हे महाअधिवेशन एकूण चार सत्रामध्ये पार पडणार असून या भव्य कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते होणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीमा बोके असणार आहेत. तसेच आ. मंदा म्हात्रे,नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील आणि ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांची सुद्धा या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते यांचे मार्गदर्शन लाभणार असून जिजाऊ ब्रिगेडच्या विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे.या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य शिवमती रेखा खेडेकर तसेच मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि.विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहा खेडेकर आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुरा देशमुख,राष्ट्रीय अध्यक्ष निर्मला पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या अधिवेशनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजली भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारती पाटील, महासचिव सरिता सोमवंशी, कार्याध्यक्ष मनीषा देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनिता पाटील व मुंबईची सर्व टिम अथक परिश्रम घेत आहेत. तरी या भव्य अधिवेशनाकरिता मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष सीमा बोके यांनी केले आहे.

---

## आज डॉ.हरिश्चंद्र बोरकर होणार ‘साहित्यव्रती’ पुरस्काराने सन्मानीत

# स्व.सूर्यकांतादेवी पोटे उत्कृष्ट वाङमय निर्मिती पुरस्कारांचे वितरण

**अमरावती/का.प्र.**
मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट,अमरावती यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या २०२५ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण ३० मार्चला सकाळी १० वा. पी.आर.पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीट्यूट, मुख्य कार्यालय सभागृह, कठोरा रोड, अमरावती येथे एका शानदार सोहळ्यात करण्यात येईल. या सोहळ्यात सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक व विचारवंत डॉ.हरिश्चंद्र बोरकर, साकोली यांना ‘साहित्यव्रती’ पुरस्काराने सन्मानीत करण्यात येईल. विविध साहित्य प्रकारासाठी



राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे.

पी.आर.पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीट्यूटचे संचालक डॉ.पी.एन.खोडके यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सोहळ्याला ज्येष्ठ समीक्षक डॉ.मनोज तायडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून माजी राज्यमंत्री प्रवीणभाऊ पोटे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहील तर पी.आर.पोटे पाटील ग्रूप ऑफ एज्यूकेशन इन्स्टीट्यूटचे सचिव श्रेयस पोटे पाटील प्रामुख्याने उपस्थित राहतील.विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही मोठी पुरस्कार योजना आहे. या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार रश्मी पदवाड मदनकर, नागपूर यांच्या ‘कायांतर’ या कादंबरीला जाहीर झाला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार क्षितिज देसाई, ठाणे ‘शीतपेटीतून जेव्हा जाग येते’ या कथासंग्रहाला मिळाला आहे. रत्नागिरीच्या कविता मोरवणकर यांच्या ‘उद्याचा दहशतगर्द अंधार’ या कवितासंग्रहाला व गडचिरोली येथील प्रभू राजगडकर यांच्या ‘येथे आमचाही श्वास कोंडतो’ आहे यांना पुरस्कार जाहीर झाला. सोलापूरचे डॉ.शिवाजी शिंदे यांचा समीक्षाग्रंथ ‘निवडक स्त्री आत्मकथने-सामाजिक सत्व आणि स्वत्व’ हा समीक्षा ग्रंथ व उत्कृष्ट संपादनासाठी ’अक्षयआंदण’ (शिवा राऊत यांची कविता) या ग्रंथाची निवड झाली आहे.

या ग्रंथाचे संपादन बबन नाखले व अरूण मानकर यांनी केले आहे.

बालवाड्.मय प्रकारात नवी मुंबई चे मोहन काळे यांच्या ‘चला पुन्हा शाळेत जाऊ या’ या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. तीन हजार रूपये रोख, शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. शिरजगाव येथील युवा कवी नितीन पर्हाड याला ‘उभरती प्रतिभा’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. सदर पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे

# जंगलात तरुणीवर अत्याचार तरूणाला बेदम मारहाण

## पाच संशयीत आरोपी पोलिसांच्या ताब्यात, -भानखेडा जंगल परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** भानखेडा मार्गावरील जंगल परिसरात घडलेल्या संतापजनक घटनेने संपूर्ण अमरावती हादरली आहे. एका तरुणासह तरुणीला मारहाण करून लुटण्यात आले आणि त्यानंतर तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्यात आला.

ही घटना शनिवारी (दि.२८) रात्रीच्या सुमारास घडली. या घटनेमुळे शहरात संतापाची लाट उसळली असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याप्रकरणात फ्रेजरपुरा पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे.

माहितीनुसार, तरुणी व तिचा मित्र दुचाकीने प्रवास करत असताना पाच आरोपींनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली. केवळ १२० रुपयांसाठी त्यांची लूट करण्यात आली. मात्र यानंतर एका आरोपीने मानवी संवेदनांना काळिमा फासणारे कृत्य करत तरुणीवर लैंगिक अत्याचार केला.



दरम्यान, पोलिसांनी तत्परता दाखवत सर्व आरोपींना जेरबंद केले आहे.

दि. २८ मार्च रोजी रात्री सुमारे ०८.३० वाजता फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील भानखेडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जंगल परिसरात एका तरुणीला व तिच्या मित्राला अडवून मारहाण करत लुटमार करण्यात आली. आरोपी एवढयावरच थांबले नाही तर त्यांनी तरुणीवर बळजबरीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

पीडित तरुणी व तिचा मित्र ॲक्टिव्हा वाहनाने जात असताना अज्ञात पाच इसमांनी त्यांना भानखेडा जंगल परिसरात अडवले.

आरोपींनी दोघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्यांच्या जवळील रोख रक्कम हिसकावून घेतली. त्यानंतर एका आरोपीने तरुणीला बाजूला नेत तिच्यावर अत्याचार केला. घटनेची माहिती ☞(पान २ वर)

# कुटुंबियांना घरात डांबून अडीच लाखाच्या शेळया व बोकड लंपास



**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील मौजा मोझरी येथे अज्ञात चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने धाडसी चोरी केली. धनराज गोपालराव खराटे यांच्या घरालगत असलेल्या शेळीच्या गोट्यातून तब्बल अडीच लाख रुपये किमतीच्या २५ शेळ्या व काही बोकड लंपास केल्याची घटना रविवारी पहाटे २ ते ३ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## मोझरीत धाडसी चोरी

‘आम्ही रात्री घरात झोपलो होतो. चोरट्यांनी बाहेरून दरवाजा बंद करून आम्हाला अक्षरशः घरात डांबून ठेवले. पहाटे उठल्यावर दरवाजा उघडत नाही हे लक्षात आलं, तेव्हा शंका आली. बाहेर येऊन पाहिलं तर सगळ्या शेळ्या आणि बोकड चोरीला गेल्याचं दिसलं. आमचं मोठं आर्थिक नुकसान झालं असून उपजीविकेचा आधारच हिरावला गेला आहे. पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना पकडून आम्हाला न्याय द्यावा.

**-धनराज खराटे, शेळी मालक**

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी प्रथम खराटे यांच्या राहत्या घराला बाहेरून साखळीने कोंडा लावून कुटुंबीयांना घरातच डांबून ठेवले. त्यामुळे घरातील सदस्यांना बाहेर पडता आले नाही. त्यानंतर चोरट्यांनी घरालगतच्या शेळीच्या कोट्यात प्रवेश करून शांतपणे एकामागून एक शेळ्या व बोकड बाहेर काढत चोरी केली.

घटना रात्रीच्या अंधारात घडल्याने कोणालाही याची चाहूल लागली नाही. पहाटे सुमारे चार वाजताच्या सुमारास घरातील सदस्य जागे झाल्यानंतर दरवाजा बाहेरून बंद असल्याचे लक्षात आले. बाहेर पडताच शेळीच्या कोट्यातील सर्व जनावरे चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

या चोरीत शेळी मालकाचे सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी पहाटेच ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती देण्यात आली असून, अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे. ☞(पान २ वर)

# भरधाव टिप्परची दुचाकीला धडक; एकाचा जागीच मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बडनेरा रोड स्थित नवीन बायपास चौकात टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. गजानन पिंगळे (वय ५८, रा. चंदननगर, जुनी वस्ती, बडनेरा) असे मृताचे नाव आहे. ही घटना शनिवारी रात्री उघडकीस आली. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कार्तिक गजानन पिंगळे (२०, रा. चंदननगर, बडनेरा)




यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे वडिल गजानन पिंगळे (वय ५८, रा. चंदननगर, जुनी वस्ती, अमरावती) हे २८ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता त्यांच्या ☞(पान २ वर)

# सेंट्रल बँक ऑफ इंडियात २.९५ कोटींचा घोटाळा

**१० विरुद्ध गुन्हा दाखल**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सेंट्रल बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय कार्यालयात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचा प्रकार उघडकीस आला असून सुमारे २ कोटी ९५ लाखांहून अधिक रकमेचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी सुनिल देवस्वरुप पांडेय (वय ४९, रा. अमरावती) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अंकित ए. वर्मा, स्वप्निल डोले, राजेश भेडीराम डोंगरे, अतुल व्यंकटराव लांगे, कार्तिक कल्याण लांगे, अमोल लांगेसह तीन महिला अशा १० जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनिल देवस्वरुप पांडेय (वय ४९, रा. अमरावती) हे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अमरावती क्षेत्रीय कार्यालयात सहाय्यक महाप्रबंधक पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून बँकेच्या ☞(पान २ वर)

# शेतातील नाल्यात आढळला तरुणाचा अर्धवट जळालेला मृतदेह; हत्येचा संशय

## बेसखेडा शिवारातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या मौजा बेसखेडा शिवारात एका अज्ञात तरुणाचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना शेताला लागून असलेल्या एका नाल्यात उघडकीस आली असून, पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेसखेडा शेत शिवारातील एका नाल्यात अंदाजे ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला. हा मृतदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच वरुड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.



मृतदेहाच्या पायात प्लास्टिकचे बूट असून गळ्यात तुळशीची माळ असल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेचे गांभीर्य ओळखून वरुड पोलिसांच्या मदतीला स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. ही हत्या ☞(पान २ वर)

# जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

## काँग्रेस कार्यकारिणी बैठकीत संघटन मजबुतीवर भर

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी काँग्रेस भवन येथे जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील संघटनात्मक कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रणनीती निश्चित करण्यात आली.

बैठकीदरम्यान नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या काँग्रेसच्या सर्व नगरसेवकांचा मान्यवरांच्या हस्ते




सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी व्यासपीठावर खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, तसेच माजी आमदार राजकुमार पटेल, सुधाकरराव भारसाकळे, हरिभाऊ मोहोड, कांचनमाला गावंडे, राहुल येवले, अनिकेत डेंगळे, रामेश्वरराव अभ्यंकर, मुकद्दर खा पठाण, अब्दुल हैदर, शाह यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून पक्षाच्या बळकटीसाठी कार्यकर्त्यांनी एकजूट राखण्याचे आवाहन केले.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांचे वेध लागले असून, यासाठी आतापासूनच संघटनात्मक पातळीवर काम करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संघटन अधिक मजबूत करून गावागावात पक्षाची भूमिका पोहोचवण्याचे निर्देश दिले.

बैठकीत विविध राजकीय घडामोडींवरही चर्चा करण्यात आली. स्थानिक पातळीवर पक्षाचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. आगामी निवडणुकांच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ☞(पान २ वर)

# मध्यवर्ती कारागृहात कर्मचाऱ्यावर हल्ला

**फ्रेजरपुरा पोलिसांत गुन्हा दाखल**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मध्यवर्ती कारागृहात बंदी आणि कर्मचाऱ्यांमध्ये झालेल्या वादातून तणाव निर्माण झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत एका बंदीकडून कारागृह कर्मचाऱ्यावर हल्ला झाल्याने कारागृह परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.




मिळालेल्या माहितीनुसार, ऋतिक सुधीर बोरकर (वय ४२, रा. अमरावती) हा मध्यवर्ती कारागृहातील बंदी असून, शनिवारी सकाळी सुमारे ९.१५ वाजता त्याला नव्या बॅरेकमध्ये हलविण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी त्याने कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांशी वाद घालत उद्धट वर्तन केले. वाद वाढत गेल्यानंतर आरोपीने कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच त्याने पाण्याने भरलेली बादली कर्मचाऱ्यांच्या दिशेने फेकल्याचीही माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे कारागृहातील शिस्त व सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण ☞(पान २ वर)

# ३१ मार्च अंतिम मुदत; मालमत्ता कर भरा अन्यथा कारवाई अटळ

## २५% शास्ती सूटची शेवटची संधी

### महानगरपालिकेचा थकबाकीदारांना इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या शास्ती-दंड माफी योजनेचा अंतिम टप्पा आला असून नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत कर न भरल्यास कठोर वसुली कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या विशेष योजनेअंतर्गत थकबाकीसह




मालमत्ता कराची एकरकमी भरपाई करणाऱ्यांना शास्तीच्या रकमेवर २५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तसेच ऑनलाइन माध्यमातून कर भरल्यास अतिरिक्त ☞(पान २ वर)

# कॅन्सरच्या आजाराला कंटाळून वृद्धाने आयुष्य संपवले

## देवीनगर वडाळी परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील देवीनगर वडाळी परिसरात एक धक्कादायक घटना २९ मार्च रोजी उघडकीस आली. कॅन्सर आजारपणाच्या त्रासातून एका वृद्धाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिस सुत्रानुसार, भोशराव भामराव भोंडे (वय ४२, रा. देवीनगर वडाळी, अमरावती) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते मागील एका वर्षापासून कॅन्सर या गंभीर



आजाराने त्रस्त होते. तसेच काही महिन्यांपूर्वी त्यांच्यावर शस्त्रक्रिया देखील करण्यात आली होती. आजारपण आणि सततचा मानसिक ताण यामुळे ते नैराश्यात असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. घटनेच्या रात्री २८ मार्च रोजी सुमारे १०.३० वाजता ते कुटुंबासोबत घरात होते. त्यानंतर मध्यरात्री ते घरातच झोपले होते. २९ मार्च रोजी पहाटे सुमारे त्यांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. शेजारी राहणाऱ्या व्यक्तीने कुटुंबीयांना याबाबत माहिती दिली. ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणारा आरोपी जेरबंद

## संभाजीनगरातून अटक, राजापेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख वाढवत अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार करणाऱ्या आरोपीला राजापेठ पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीला छत्रपती संभाजीनगर येथून ताब्यात घेण्यात आले.

पोलिस सूत्रांनुसार, पीडित अल्पवयीन मुलीने १७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या



तक्रारीनुसार आरोपी रत्नदीप उर्फ बाळा प्रदीप गायकवाड (वय १९, रा. भिमरत्न नगर, मनमाड, जि. नाशिक) याने इन्स्टाग्रामद्वारे तिच्याशी ओळख निर्माण केली होती. यानंतर आरोपी अमरावतीतील धन्वंतरी नगर परिसरात आला. येथे पीडिता भाड्याने राहत असलेल्या ठिकाणी तो वारंवार येत होता. ‘तू १८ वर्षांची झाल्यावर मी तुझ्याशी लग्न करेन’ असे आमिष दाखवत आरोपीने तिच्यावर अनेक वेळा लैंगिक ☞(पान २ वर)

# विकसित भारत, समृद्ध महाराष्ट्र आणि सर्वसमावेशक संघटना निर्माणसाठी घरोघरी पोहोचा

## खासदार डॉ.अनिल बोंडे यांचा पदाधिकाऱ्यांशी संवाद

### -पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रसेवा हीच खरी पक्षसेवा या विचाराने प्रेरित होऊन स्वामी विवेकानंद मंडळाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राज्यसभेचे सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सखोल मार्गदर्शन केले.



संघटना बळकटीकरण, नागरिकसेवा, सामाजिक उत्तरदायित्व आणि विकासाची दिशा या सूत्रांभोवती त्यांचे संपूर्ण भाषण पहायला मिळाले. एकंदर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील विकसित भारत, समृद्ध महाराष्ट्र आणि सोबतच सर्वसामावेशक संघटना निर्माणासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घरोघरी पोहोचावे असे आवाहन डॉ.अनिल बोंडे यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ.बोंडे पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष वैयक्तिक आकांक्षा सोडून काम करतो. आमचा केंद्रबिंदू एकच ☞(पान २ वर)

# नयना गुंडे यांनी स्विकारला विभागीय आयुक्त पदाचा पदभार

**अमरावती/प्रतिनिधीः-** नयना गुंडे यांनी विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार डॉ. श्वेता सिंघल यांच्याकडून आज रविवारी (दि.२९) स्विकारला. नयना गुंडे ह्या यापूर्वी महिला व बालविकास आयुक्त म्हणून महिला व बालविकास आयुक्तालय पुणे येथे कार्यरत होत्या. त्या भारतीय प्रशासकीय



सेवेतील २००८ च्या तुकडीच्या महाराष्ट्र कॅडरच्या अधिकारी आहेत. यावेळी उपस्थित अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विभागीय आयुक्तालयाचे अपर आयुक्त सुरज वाघमारे, अजय लहाने यांनी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.